म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सं. नं. १८८६

म. ग्रं. सं. ठाणे

विषय कादंबरी

क्रमांक 735

लेखक नारायण के. चोवळ

सन १८८६

पुस्तकाचें नांव मोनूकेतन

नव मालिका

१.३५

नाट्य

# मीनकेतन नवमालिका.

हें लहानसें पुस्तक रसज्ञ मनरंजनार्थ

नारायण केशव चौबल,

क्लार्क म्युनिसिपल आफिस.

ह्यानें तयार केलें

मुंबई येथें

"माजगांव प्रिंटिंग" छापखान्यांत छापिलें.

१८८६

(सर्व हक्क मालकानें आपणाकडे ठेविले आहेत.)

किंमत १२ आणे.

To

Perpetuate the memory of my lamented Father

KESHAV JAGANNATH CHAVBAL Esqr.

the late Government Pensioner who always

showed to me great concern and

affection in discharging to-

wards me the duties

of father.

This work is dedicated as an humble token of filial respect, esteem and love by his dutiful son.

THE AUTHOR.

# PREFACE.

Of late very strenuous efforts are being made by the educated people of this part of India in the cause of promoting Maráthi Literature. The consequence is, that there have appeared many books some in the form of novels, others in the shape of dramas and essays. Notwithstanding this the language for its developement still requires many books on various subjects such as scientific, historical, literary &c. The labours of Messrs Chiplúnkars, Oke, Talékar and Godbole are beyond all praise and they could be safely regarded as being the greatest of benefactors of this long neglected language. The encouragement which many of the authors of less consequence have received at the hands of these and other educated people, induced me particularly to compose a novel in my Vernacular and to appear for the first time as an author before the Public.

2. This my work is an original compilation and not a rendering. To make the book easy and intelligible to the common masses I have tried to use as simple a language as possible. I am sure that there may be faults in this book as regards style &c but I hope to be excused for them and will most gratefully accept any suggestions that the Public may be pleased to make so that I may make corrections accordingly in the next edition.

3. In conclusion I hope that the Public, with whom it is to decide as to my success, will, without hesitation, afford me as much support as they can and encourage me in like undertakings in future. As they have now a days got a liking for Sangit Dramas, I beg to inform my readers that I have undertaken to compose one which will be shortly out. As my aim in publishing this book and others that may appear hereafter is to render assistance to Maráthi language I trust that the benevolent Public will not shrink from giving me their helping hand in my undertaking.

THE AUTHOR.

# मीनकेतननवमालिका.

## भाग पहिला.

श्लोक ( शा० वि० वृ०.)

कैलासीं विलसे सदैव गिरिजा अंकीं जयाच्या असे॥
व्यालाचीं वलयें विभूति वपुला जो नित्य लावीतसे॥
ज्या ध्याती सुमुनी निशी दिनि तरी जो आकळीला नसे॥
श्रीमत्स्थाणुपदां अशा नमुनिया ग्रंथा करीं घेतसे॥

पूर्वी मंदाकिनी नदीचे कांठीं हेमनगरी ह्या नांवाचें एक शहर होतें. तेथें शंखचूड नामक राजा राज्य करीत होता. ह्या शहरा समोंवतीं प्रचंड दगडी तट बांधिले असून मध्यें मध्यें उंच मनोरे होते; व त्यावरील कळसांस सोन्याचा मुलामा दिला असल्यामुळे प्रातःकाळीं सूर्य किरणें त्यांजवर पडलीं, ह्मणजे तें सर्व नगर सुवर्णमय दिसे. ह्या देखाव्याचा विचार केला कीं त्या शहरास हेमनगरी हें नांव यथार्थ शोभतेंसें दिसतें. हेमनगरीच्या पूर्वदिशेस तटास लागलेलें पर्वताग्र होतें, त्यास क्रीडाशैल असें नांव होतें. त्यावर विलासी जनांस जाण्यायेण्यास सुगम मार्ग बांधिले असून जागजागीं जलक्रीडा करण्यासाठीं नेमस्त जलपूरित असे पाण्याचे हौद बांधिले होते; कोठें कोठें जातलतिका कुंजविहार करण्यासाठीं तयार करविले होते व कोठें

तर बसावयास धवल संगमरवरी दगडाचे चौतरे बांधिले होते; त्यावरून असमंतात्भागीं पाहिलें तर तें सुंदर शहर त्याचें बाजूनें वाहणारी मंदाकिनी नदी व तिचीं सर्पाकृति अनेक वळणें, तसेंच हेमनगरीच्या दक्षिणबाजूचा सुशोभित उद्यान भाग व उत्तरबाजूचा समुद्राचा देखावा वगैरे चारही दिशांची रमणीय शोभा अनायासें एकदम नजरेस पडे. मंदाकिनीचे कांठीं सुंदर घांट बांधिले असून त्यांवर स्नानाच्या व संध्या वगैरे ब्रह्मकर्मांच्या उत्तम सोई केल्या होत्या. वर दक्षिण भागीं उद्यान प्रदेश होता ह्मणून जें लिहिलें ते राज सरदारांचे बागबगीचे होते; त्यांत नानाप्रकारचीं फळझाडें लाविलीं असून त्या प्रत्येक उपवनांत मध्यभागीं क्रीडामंदिर निर्मित केलें होतें व ह्या सर्व उपवना पलीकडे राजाचा विलासबाग होता; त्याचे सभोंवतीं मजबूद भिंती असून मध्यभागीं एक मोठा वाडा होता; त्याचे चारहि बाजूंस मोठमोठ्या हवा घेण्याकरितां गच्चा बांधिल्या असून पुढील बाजूस एक सुंदर संगमरवरी दगडाचा कारंजा तयार केला होता. विलासबागेंत नारळ, पोफळी, पेरू, निंबें, फणस, इत्यादि नामांकित फळझाडांचा तसेंच नानाप्रकारच्या फुलझाडांचा समूह दाट असल्यामुळें सूर्यकिरणांचा त्यांत अगदीं रिघाव होत नसे. नगरांत जागजागीं धर्मशाळा, अन्नछत्रें, रोगशांतिकशाळा वगैरे धर्मादाय कृत्यांची विपुलता असल्यामुळें थोरांपासून तों अकिंचन जनापर्यंत कोणासहि कशाची देखिल उणीव असल्याबदल कुरकुर करण्यास जागा नव्हती. तशांत तो राजा दयाळु, धर्मशील, नीतिसंपन्न असल्यामुळें व सर्व राज्यकारभार दक्षतेनें पहात असल्यामुळें प्रजेचें पालन उत्तम होत असे.

सारांश तें सर्वराष्ट्र केवळ सुखागारच आहेसें साधारण प्रेक्षकांसही वाटल्यावांचून रहात नसे.

जगांत तरी संतती व संपती ह्या दोन्ही गोष्टी सम मानानें प्राण्यास दिल्या आहेत, असे प्राणी पाहूं गेलें असतां फारच थोडे मिळतील. ज्यास्थलीं ह्या दोहों पैकीं एकीचें वास्तव्य आहे त्या स्थलीं दुसऱ्या गोष्टीचा कडकडीत अभाव असतो; ह्मणजे संतती असली तर संपदेची वाण असत्ये व संपदा असली तर संततीची वाण असत्ये. बहुतेक गोष्टी ह्याच मानानें दृष्टीस पडतात. ही गोष्ट शंखचूड यास लागू होती; ती अशी कीं जरी संपत्ती व सौख्याची त्यास उणीव नव्हती, तरी आपत्य सौख्य त्यास फारच कमी होतें. त्यास एकच कन्या होती, तिचें नांव नवमालिका. शंखचूड व त्याची भार्या मंजुभाषणी ह्या उभयतांची, बहूतवर्षांनीं ही कन्या आपणास झालीसें पाहून, तिजवर विलक्षण ममता बसली; व पुढें कांहीं दिवस आपत्य मार्ग प्रतिक्षा केल्यावर निराशा झाल्यामुळें तर तिजवरील ममता अगदींच अमर्याद होऊन गेली. अगोदरच ती सुंदर, तशांत बालेन्दुवत तिचें सौंदर्य वृद्धिंगत होतांना पाहून तिचे माता पितरास आपण फार धन्य आहों असें वाटे. त्या उभयतांस ती प्राणा पेक्षांही अधिक प्रीय असल्यामुळें खाण्यापिण्यांत तसेंच आनंदोत्सवांत तिची मूर्ति त्यांचे नजरे समोर सदैव असे. ती जसजशी वयानें मोठी होऊं लागली तसतसे तिचे एकेक सद्गुण बाहेर पडूं लागले. तिचं कोमल मन सुशिक्षणास पात्र जाणून तिच्या माता पितरांनीं तिचा विद्या संपादन करण्याचे कामीं योजना केली. प्रायः स्त्रियांची बुद्धि तीव्र असत्ये; तशांत ही शंखचूड, ज्याचे पदरीं महान

विद्वान् लोक पुष्कळ होते अशाची कन्या; मग ती काय कुलक्षणी निघणार? ह्मण आहे कीं "खाणतशी माती" या ह्मणी प्रमाणें सर्वांचें चित्त वेधणारी अशी निपजली. तिनें अनेक विद्या संपादन केल्या. तसेंच स्त्रियांस अगत्य लागणारे जे पाकशास्त्रादि विषय ते तिनें चांगले अवगत करून घेतले. त्या तिच्या सद्गुणामुळें त्या नगरींत चांगुलपणाच्या कांहीं गोष्टी निघाल्या असतां तिचें स्मरण झाल्यावांचून रहात नसे. जसजशी ती वयानें प्रौढ होऊं लागली नसतसे दया, क्षमा, शांती, विवेकादि गुण तिच्यांत अधिकाधिक दिसूं लागले. ती सुजाण व उपवर झालीशी पाहून मंजुभाषणीच्या अंतःकरणांत तिचे विवाहाची काळजी रात्रंदिवस घोळूं लागली. ही आपली एकुलती एक कन्या, विद्यातेजानें हिचें मन प्रकाशित झालेलें, अशीस अनुरूप पति मिळाल्यानें हिचा जन्म सुफल झालासें हिला वाटणार; नाहीं तर नवऱ्याचें तोंड पूर्वेस व बायकोचें पश्चिमेस असें झाल्यानें ही आपला घात करून घेणार. ह्या काळजींत ती नेहमीं निमग्न असे. अशा चिंतित स्थितींत मंजुभाषणी असतां पुष्कळ वेळां तिची दासी चतुरिका हिनें तीस पाहिलें होतें.

एके दिवशीं सायंकाळीं वरील गोष्टी विषयीं विचार करीत ती गच्चीवर बसली होती. दोनघटका रात्र झाली तरी तिचे विचार सुरू होतेच. ही तिची स्थिती चतुरिकेनें पाहून तिनें मंजुभाषणीस दोन तीन हाका मारिल्या, परंतु ती विचारांत अगदीं गर्क होऊन गेल्यामुळें तिचें लक्ष्य चतुरिकेच्या हाकांकडे गेलें नाहीं. तेव्हां अलीकडे ही अशास्थितींत नेहमीं कां असते त्याचें कारण हिजपासून सम-

जावून घेतलें पाहिजे असें मनांत आणून ती मंजुभाषणी ज-वळ गेली व तास पुनः हाक मारून:—

**चतुरिका**०—बाईसाहेब! इतक्या चिंताग्रस्त कां? सरकार स्वारी येण्याची वेळ होत आली आहे. त्याकरितां इतकें हिरमुसल्या सारखें बसण्यास नको. ( मंजुभाषणीस हालवून सावध केल्या सारखें करित्ये.)

**मंजुभाषणी**०—( रागावल्या सारखें करून ) पुरेग मेल्ये तुला तितकंच हो दूर; बैस तिकडे. माझा विचार काय चालला आहे व हिचं मेलीचं भलतंच.

**चतुरिका**०—बाईसाहेब? हें मी अगोदरच जाणिलं होतं पण कांहीं तरी बोलण्यास कारण पाहिजे ह्मणून सरकार स्वारी विषयीं उगाच ह्मटलं.

**मंजुभाषणी**०—चतुरिके! हें तूं कशावरून ताडिलंस?

**चतुरिका**०—बाईसाहेब! अलीकडे बरेंच दिवस मी प-हात्यें, आपण नेहमीं विचार करित बसलां असतां. इतकी चिंता कशाची तें मला सांगातर पाहूं? मग कांहीं तजवीज काढितां येईल. आपल्या पायांची चाकरी करितां करितां हे ( डोक्यास हात लावून )काळ्याचे पांढरे केले,

**मंजुभाषणी**०—धन्य बाई तुझ्या धूर्ततेची. तुझ्या आई बापांनीं तूझं नांव चतुरिका ठेविलं, तें अगदीं यथायोग्य आहे. सखे, मला काळजी ती दुसरी कशाची? कांहीं कमी-कां आहे? सर्व गोष्टी परमेश्वरानें विपुल दिल्या आहेत; **पण** आपली बाई उपवर झाली हें तुला दिसत नाहीं कां? तिच्या मना प्रमाणें एकदां तिची योजना झाली ह्मणजे माझी काळजी दूर झाली. तोंपर्यंत ती कीं नाहीं, मला एक ग्रहच आहे. तूं पहातेसना अलीकडे कशी झुरत

आहे ती ? हल्लींच्या तिच्या सर्व सख्या विवाहित असून पति-सुख अनुभवूं लागल्या आहेत ही गोष्ट तिचे मनांत नेहमीं बोळत असावी, असा तिचे झुरण्यावरून माझा तर्क धांवतो. ती कां लहान आहे? आपल्या सख्यां प्रमाणें आपण पति-सुख कधीं अनुभवूं असें तिला नसेल कां वाटत? पण काय करावं बाई! घरांतून अद्यापि डोळे उघडत नाहींत त्यास माझा काय उपाय?

**चतुरिका०**—होय; बाईसाहेब? आपण ह्मणतां तें खरं. पण हा मजकूर आपण सरकारांच्या कानावर घातला नसेल, ह्मणून या कामाची त्यांजकडून हयगय होत आहे, दुसरें काय?

**मंजुभाषणी०**—अग वेडे, ही गोष्ट मी तिकडे बोलल्यें नाहीं हें खरं; पण ज्याचं त्यास कळत नाहीं कां? आपलं घर बारा कोशांवरून दिसतं; मग दुसरं सुचविण्यास कशास पाहिजे? बरं आतां तूं सांगत्येस त्यावरून आज रात्रीं मंदि-रांत येणं झाल्या नंतर हा विषय काढित्यें. मग ऐक कसा वेदान्त निघेल तो!

**चतुरिका०**—बाई साहेब? इतकं नको आमचे सरका-रांस दूषण लाविण्यास! त्यांचा कारभार कांहीं बेफामपणा-चा नाहीं. आपणा प्रमाणें त्यांस थोडीबहुत तरी काळजी असेलच.

**मंजुभाषणी०**—बरं तर मग; तूं मंदिरांत असशीलच. तुला आमचं बोलणं ऐकण्यास सांपडेल तेव्हां तुझी खात्री होईल. ( इतक्यांत विजय नांवाचा राज सेवक येतो, व मंजुभाषणीस वंदन करून:— )

**विजय०**—बाईसाहेब, सरकार स्वारी दरबारांतून उठून

श्रीविरेश्वराच्या देवालयांत दर्शनास गेल्यास बराच वेळ झाला; आतां बघा सरकार येतील.

**मंजुभाषणी**०—कां विजया, बोलण्याची फारशी लगबग झाली? अरे, इतकी घाई कां, कांहीं कमजास्त आहे वाटतं!

**विजय**०—नाहीं; बाईसाहेब, सर्व ठीक आहे. मी धांवत निरोप घेऊन आलों ह्मणून इतकी लगबग उडाली; दुसरें कांहीं नाहीं.

**मंजुभाषणी**०—इतकंचना? मग त्यासाठीं इतकी लगबग कशास पाहिजे. ( इतक्यांत शंखचूड मंदिरांत येतो. )

**शंखचूड**०—कांरे विजया, गडबड कशाची?

**विजय**०—जी सरकार, कांहीं नाहीं. आपल्या पायांचा निरोप घेऊन आलों व तो बाईसाहेबांस नुकताच कळविला इतक्यांत आपली स्वारी दाखल झाली.

**शंखचूड**०—बरें विजया, तुला जाण्यास रजा आहे. ( मंजुभाषणीकडे वळून ) प्रिये आतां असें उभें किती रहावयाचें? खालीं नाहीं कां बसावयाचें? ( मंजुभाषणीचा हात धरून तीस आपल्या बाजूस बसवितो ). सखे, आज मुख असें म्लान कां दिसतें? तूं महान काळजींत असावीस असा तुझे चर्येवरून माझा तर्क होतो. काय कारण तें लवकर सांग पाहूं? बरें पण ( चतुरिकेकडे वळून ) आज आपल्या नवमालिकेची कोठें हालचाल दिसत नाहीं. ती निजली कीं काय?

**चतुरिका**०—सरकार, बाईसाहेबांचें भोजन आटोपून त्या महालांत बसल्या होत्या. अलीकडेस रात्रीं पुस्तक वाचण्यास अगर मनरंजनार्थ वाद्यें वाजविण्यास त्या बसत

नाहींत. जिवास बरें वाटत नाहीं ह्मणून सांगून लवकरच निजत असतात, पण रात्रींहि निश्चल झोप त्यांस येत नाहीं.

**शंखचूड०**—( चकित होऊन मंजुभाषणांस ) प्रिये? बाईस काय होत आहे? मला तिच्या दुखण्या बद्दल तूं सांगितलें देखील नाहींस. आमचें पुरुषांचें काय? सर्व दिवस राज्य व्यवस्थेंत कोणीकडे जातो तें कळत नाहीं. घरांतील स्थिती घरच्या मनुष्यांनीं कळविली नाहीं तर ती आह्मास कशी समजणार? बरें घरांतील कारभाराकडे लक्ष्य देऊन राज्य व्यवस्थेकडे दुर्लक्ष्य केलें तर अनीती होऊन पुढें नरकवास भोगावा लागणार. माझे हातून अन्याय झाल्यास मी दूषणास पात्र होईन, ह्या गोष्टीस भिऊन रात्रं दिवस त्याच विचारांत मी निमग्न असतों. मला एक घटकाभर देखील सुखाची झोप कशीती ठाऊक नाहीं. ही माझी स्थिती तूं स्वतः पहात्येस; मग मला तिची प्रकृति नीट नाहीं, हें वर्तमान तूं सांगितल्या वांचून कसें कळणार! आपणास कशाची उणीव आहे कां? विधात्यानें आपणास सर्व कांहीं अनुकूल केलें आहे. उद्यांच पहा, तिच्या अस्वास्थ्या विषयां उद्गार निघतांच आपल्या नगरींतील सर्व वैद्य तिच्या समाचारास येतील; पण सखे, तिची व्यथा तर मला कळींव.

**मंजुभाषणी०**—प्रिया! व्यथा कशाची? तिला कांहीं दुखतें कां आहे. तिच्या बाल्यावस्थेपासून वर्तमानवयापर्यंत दुखणें कसें तें तिला माहित नाहीं. तिच्या व्यथेचें कारण ती उपवर झाली हेंच होय, असें मला वाटतें. नाथा? पहा कीं सर्व तिच्या सख्या विवाहित आहेत तेव्हां त्यांची ती सौख्यानुभवाची स्थिती पाहून विवाहित होण्याचे

विचार तिच्या मनांत येत असतील व त्यामुळें उद्विग्नता उत्पन्न झाल्यानें तिला कशाची चाड राहिली नाहीं. ती नेहमीं खिन्न असत्ये त्यामुळें. दुखणाईतशी दिसत्ये. प्रिया? तिच्या विवाहाचा विचार कधीं तरी आपल्या मनांत आला काय?

**शंखचूड**०—प्रिये? तुह्मी बायका रिकाम्या! तुह्मांस कांहींतरी विषय बोलण्यास समूर पाहिजे. तूं ह्मणत्येस ती गोष्ट खरी आहे. मला कां त्याविषयीं काळजी नाहीं? या-कामीं एकदोन ठिकाणचा भेद काढण्याची तजवीज क-रविली आहे. आपण निरर्थक काळजी वाहून काय उप-योग? हे कृत्य ईश्वरी सूत्रावर अवलंबून आहे. आपण चिंतावें एक, व त्याचें लिखित असतें भलतेंच. सखे त्या घटनेची घडी येऊन ठेपली ह्मणजे पळभर देखील अ-वकाश लागणार नाहीं; तोंपर्यंत स्वस्थ ऐस ह्मणजे झालें व आपली बाई तरी इतकी निर्बुद्ध नाहीं कीं ती पराधीन गोष्टीविषयीं उगाच काळजी करून आपणास विकत दु-खणें करून घेईल.

**मंजुभाषणी**०—चतुरिके? कां माझ्या बोलण्याचा दा-खला तुला पटलानां? ऐकिलासना इकडील सर्व वेदान्त? समजूत काढण्याची विद्या कोणत्या गुरूनें शिकविली अ-सेल ती असो. ( शंखचूडाकडे वळून ) प्रिया? भलत्याच कामाची ढिलाई उपयोगाची नाहीं. बाईच्या विवाह यो-जनेस लवकर लागलेंच पाहिजे. कांहींतरी तिच्या स्थि-तीकडे नको कां पहायाला? अशा मानसिक व्यथेनें ती अलीकडे फार कृश झालीशी दिसत्ये.

**शंखचूड**०—प्रिये? तुझें ह्मणणें सर्व माझ्या ध्यानांत

आलें. आतां त्याविषयीं मला जास्त सांगण्याची गरज नाहीं. थोड्याच दिवसांत तुझ्या व तिच्या मनाप्रमाणें तजवीज करितों.' सखे रात्र वरीच झाली ह्याकरितां चल महालांत जाऊं; असें ह्मणून तीं उभयतां शयन मंदिरांत गेलीं.

---

## भाग २

एके दिवशीं सुप्रभातीं नित्याप्रमाणें मीनकेतन जागृत झाला व प्रातर्विधि आटोपून दिवाणखान्याच्या खिडकींत खुर्चीवर बसून माडीवरून सभोंवार पहात आहे तों ती सुवेळा अति रमणीय दिसली. त्या समयीं बालार्काचीं कोमल किरणें नुकतींच बाहेर पडत असल्यामुळें आकाश जागजागीं तांबूस, कोठें सुवर्णमय झाल्यासारखें दिसत होतें. आजू बाजूंच्या निबिड तरूंवर द्विजगणांची एकच किल्बिल उडून गेली होती मार्गानें वृद्ध देवभोळे लोक नित्य देवार्चना साठीं बिल्व, पुष्पें इत्यादिकांच्या संचया करितां मोठ्या धांदलीनें फिरताहेतसें दिसत होतें. कित्येक काबाड कष्ट करणारे लोक आपापल्या कामावर त्वरेनें जात आहेत अशी ही वेळ शांततेची व आनंद कारिणी खरी, परंतु धांदलीची दिसली. रात्रीच्या जागृतीमुळें पुस्तकें वाचण्याकडे चित्त लागेना, ह्मणून आपल्या "गोपाळ" नांवाच्या मोतद्दारास हाक मारून:—

**मीनकेतन०**—गोपाळा! माझ्या जरदा घोड्यावर जीन घालून तयार करून चौकांत आण जा कसा! आज सहल करण्यास जावें असें मनांत आलें आहे.

**गोपाळ०**—जी सरकार, ल्यादिशीं आज मनांत आलं. ह्योवघा की हानतो घोडा समदा तयार करून. ( गोपाळ जातो व घोडा तय्यार करून आणितो )

**मीनकेतन०**—( घोडा आणिलासें पाहून ) गोपाळा, तूं घोडा धरून क्षणभर उभा रहा, मी पोशाख करून येतों. ( असें ह्मणून मंदिरांत गेला व शुभ्र वस्त्रें परिधान करून डोक्यास जरीचा टपका बांधिला, व खालीं उतरून घोड्या वर बसून नगरा बाहेर चालता झाला )

मीनकेतनाच्या नगराचें नांव रामपूर होतें. त्या शहरामधून, तें व्यापाराचें प्रसिद्धस्थान असल्यामुळें, मोठ मोठे रस्ते पुष्कळ लांब गेलेले होते. त्यापैकीं एका रस्त्यानें नगरा बाहेर आल्यावर जवळ एक अर्धकोशावर सुवाहिनी नामें नदी वहात होती तिकडे जाऊन प्रभातकाळची नदीची शोभा पहावी ह्मणून घोडा त्वेरेनें दवडिला तों अर्ध तासाचे आंत नदीचे कांठीं येऊन पोहोंचला. नंतर घोड्यावरून खालीं उतरून घोडा झाडाशीं बांधून ठेवून नदीच्या पाण्यानें गुळणा केला व प्रसन्न मुद्रेनें नदीचा देखावा पहात आहे तों दूर अंतरावर कोणी दीनवाण्यास्वरानें रूदन करीत आहे असें त्यास वाटलें. तेव्हां हें कोण असावें बरें, व अशा एकांत वासाचे स्थलीं इतक्या दीनवाण्यास्वरानें रडण्यास ह्या प्राण्यास अशावेळीं काय बरें कारण झालें असावें ! नाहीं या गोष्टीचा फक्त विचार करून कांहीं उपयोगाचा नाहीं; खरा तपासच केला पाहिजे. मानवी प्राण्याच्या दुःखाची चौकशी व त्याचा होईल तितका परिहार मानवीप्राण्यानें न केला तर काय पशूनें करावयाचा? ज्या दिशेकडून ध्वनि येत आहे तिकडेसच आपण जावें ह्मणजे काय आहे तें

सर्व कळेल, असा विचार करून घोड्याजवळ गेला व त्यावर बसून त्या रूदन सुराच्या धोरणानें घोडा चालविला. तो ध्वनि जवळूनच येत असल्यामुळे त्या रडण्याचें मूळ त्याच्या लवकरच दृष्टीस पडलें. सुवाहिनीचे कांठीं एक मोठा आम्र वृक्ष होता, त्या खालीं एक गोसांवी, कांतीनें दैदिप्य-मान, शेजारीं एक धुनी जळत आहे, नेत्रांनीं अश्रुधारा वहात आहेत, असा पाहिला. मीनकेतनानें आपला घोडा त्याचे जवळ झाडाखालीं नेला व खालीं उतरून परमादरानें नमन करून:—

**मीनकेतन**०—महाराज ! मी दोन प्रश्न करितों त्यांचीं उत्तरें कृपाकरून दुःख एके बाजूस ठेऊन द्याल तर मी आपणास धन्य मानीन.

**गोसांवी**०—( रडें किंचित् आटोपून, रडक्या स्वरानें ) बाबा! तुला काय विचारणें असेल तें विचार.

**मीनकेतन**०—महाराज! हल्लीं जी दीक्षा आपण धारण केली आहे त्या दीक्षेस आपण केवळ तरूण असल्या मुळें अपात्र आहां; तेव्हां कांहीं अनुताप होऊन त्यामुळें अथवा दुसऱ्या कोणत्या तरी हेतूनें ही वृत्ति धारण केली ह्याचें, तसेंच मघां आपण इतकें दुःख कां करीत होतां ह्या माझ्या दोन्ही मुद्यांचीं कारणें मला सांगितल्यानें मजवर आपले अनंत उपकार होतील.

हे मीनकेतनाचे शब्द ऐकतांच त्या गोसांव्यास रडण्याचें भरतें येऊन त्याचा गळा दाटला व त्यास कांहीं बोलवेनासें होऊन तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. हें पाहून मीनकेतन घाबरला व त्याच्या ( गोसांव्याच्या ) जवळ असलेल्या पात्रांतील थोडें पाणी त्या गोसांव्याचे डोळ्यांस

त्याविलें त्यामुळें कांहीं वेळानें तो सावध झाला. (असें पाहून. )

**मीनकेतन०**— महाराज, माझ्या प्रश्नानें आपणास जर व्यथा होत असेल तर दिल्या दुःखाची मला क्षमा करा.

**गोसावी०**— बाबारे ? ज्या ज्या स्थलीं जावें तेथें तुज प्रमाणें प्रश्नकरणारे भेटून तूं जे मला प्रश्न केलेस त्या प्रमाणेंच मला विचारितात, तेव्हां जें दुःख हल्लीं मी अनुभवीत आहें तें त्यांस इत्थंभूत निवेदन करावें लागतें, ह्यामुळें माझ्या दुःखास स्थलांतरानें जर कांहीं विसर पडला असला तर त्याची पुनरावृत्ति होये, व पुनः मी दुःख डोहीं— निमग्न होतों. असो; तूं कोणातरी थोराचा मुलगा असून चर्येवरून फार चौकस दिसतोस ह्यामुळें तुला निराश करूं नये असें माझ्या मनांत आलें आहे; तर मज जवळ बैस ह्मणजे मी आपल्या दुर्दैवाचें सविस्तर वर्तमान तुला सांगतों.

**मिनकेत०**—महाराज, माझ्या प्रश्नामुळें आपलें दुःख दुणावणार ह्यामुळें मी आपला अपराधी आहे त्यास मला क्षमा असावी. आपल्या तेजःपुंज कांतीवरून आपण थोर कुलोत्पन्न आहां व कांहीं विशेष प्रसंगामुळेंच ही वृत्ति आपण धारण केली असें प्रथम दर्शनींच मी आपले विषयीं अनुमान केलें व त्यामुळें अनावर जिज्ञासा उत्पन्न होऊन आपणास प्रश्न केल्यानें जें दुःख होणार तदुदित दोष शिरीं वाहण्यास मी तयार झालों आहें; तर क्षमा करून सांगाच.

**गोसावी०**—बाबारे,

मी गाजीपूरचा रहाणारा सावकार पुत्र आहें. माझें नांव गोपिनाथ. माझ्या बापाचें नांव धनपाल असें होतें. त्याज-

पाशीं अगणित द्रव्य असल्यामुळें राजमंडळांत त्यास फारच स-न्मान, मिळे. त्यावेळीं गाजीपूर येथें चंद्रकेतु नांवाचा राजा रा-ज्यकरीत होता. हा राजा न्यायी असून सदां प्रजा पालनीं दक्ष असे. तारुण्याचे दिवसांत त्यास संतान न झाल्यामुळें चंद्रकेतु मनांत फार दिलगीर असे परंतु पुढें त्यास एकच पुत्र झाला त्याचें नांव "दुराचारी" असें त्यानें ठेविलें; कारण "दुराचारी" ह्याचें जनन होतांच दिवाभीतें निःशं-क राजप्रासादाचे आसमंताद्भागीं दीर्घ स्वरानें ओरडूं लागलीं, तसेंच अकस्मात् सूर्यबिंब एका प्रचंड कृष्णवर्ण मेघानें व्याप्त होऊन भर दोन प्रहरचा सुमार असतांहि सर्व नगर तममयी झालें. अशीं अशिव सूचक चिन्हें पाहून राजा फार खिन्न झाला व त्यानें ज्योतिष्यास प्रश्न केला कीं महाराज? चिरंजीवाचे जनन समयींचीं चिन्हें तर सुचक आहेत, आपल्या पहाण्यांत तीं आलीं असतीलच; तथापि जन्मलग्नांचे ग्रह वर्तवून पुढील व्यवस्था कशी काय हो-णार तें कळवा. हें ऐकतांच ज्योतिषीबावानें गणित करून चंद्रकेतूस कळविलें कीं महाराज, जन्मलग्नींच्या ग्रहमाना-वरून चिरंजीव प्रजापीडनीं दक्ष सर्व व्यसनांत तसेंच कपटांत निपुण असे निपजतील. हें ऐकतांच त्यास फार दुःख झालें. नंतर कांहीं विवेक करून पुनः ज्योतिष्यास आणखी संतान प्राप्ती माझे दैवीं आहे काय ह्मणून प्रश्न करितांच त्यानें गणित करून कळविलें कीं प्रस्तुतच्या पुत्रला-भाशिवाय दुसरें संतानसौख्य आपल्या दैवीं नाहीं. हें ऐक-तांच त्यास फारच खेद झाला व मनांत परमेश्वराची प्रार्थना करून ह्मणाला, विश्वपालका इहलोकीं मी सर्वदां राज्य व्यवस्थेंत दक्ष असून अन्याय जितका न होईल

तितकें करून, देववेल तितकें सौख्य मीं आपल्या प्रजेस दिलें; रात्रंदिवस पापासत्यादि कुमार्गास भिऊन आपल्या हातून होईल तितकें सुकृत घडावें ह्मणून कष्ट केले, त्याचा अंश देखील फळास आला नाहींना? परमेश्वरा इतका काय मी दुष्कृति कीं मला त्वां एकच पुत्र द्यावा व तोहि या प्रकारचा. हा पुत्र मला दिल्यानें " निपुत्रिक या दोषांतून तूं मला जसें मुक्त केलेंस तसेंच तो प्रौढ वयांत आल्यावर त्याचीं दुष्ट कृत्यें पहाण्यास किंवा ऐकण्यास मला हयात ठेवूं नको, इतकी माझी विनंती ऐक ह्मणजे झालें वगैरे विचार त्याचे मनांत तेव्हांपासून घोळूं लागले; पुत्रप्राप्ति ह्मणजे सुखोत्पत्तीचें कारण; परंतु चंद्रकेतूस तीच गहन चिंतेस कारण होऊन तो झुरणीस लागला, व शूर शत्रूंशीं नित्य लढतांना कष्ट पावून त्याचे शरिरांत एक भयंकर व दुस्साध्य रोग जडला होता तोच त्याच्या अकालिक शेवटास कारण झाला.

ह्याप्रमाणें चंद्रकेतूचा अंत झाल्यावर त्याच्या प्रजाजनांस फारच वाईट वाटलें. ह्याचीं कारणें दोन होतीं तीं अशीं कीं एक तर असा न्यायी, धर्मशील राजा पुढें आपणांस मिळणें कठीण असें त्यांस वाटूं लागलें; व दुसरें असें कीं त्याचा मुलगा " दुराचारी " याचें वय राज्य कारभार बघण्याजोगें झालें होतें व राजानें पुढें हा कसा निपजणार ह्याचें अनुमान करण्याकरितां कांहीं क्षुल्लक कारभार त्याजवर सोंपविला होता, त्याची व्यवस्था करितांना प्रजा पीडनीं हर्ष, व दुर्गुण प्रसाराचें वैभव, वगैरे स्वाभाविक दुर्गुण त्यानें प्रजाजनांस दर्शविले होते; तेव्हां आतां सत्ताधीश झाल्यावर आपली व आपलें वित्त वगैरे स्था-

वर जंगम मिळकतींची व्यवस्था कशी होणार, व आपली अब्रु याचे दुर्गुणाचे तडाक्यांत कशी वांचणार, अशी सर्वांस काळजी पडली. इतक्यांत दुराचारी महाराज यांस राज्याभिषेक होऊन सर्व राज्यसत्ता त्यांचे हातांत आली. प्रथम दिवशीं दरबारांत येतांच महाराजांस दिसून आलें कीं, आपल्या बापाचे वेळची मंत्री मंडळी वृद्ध झाली आहे. वृद्धावस्थेत दीर्घदृष्टि वगैरे मानवी सद्गुण नष्ट होतात. तेव्हां पुढील आपल्या राज्यव्यवस्थेस हे अगदीं अयोग्य समजून त्यापैकीं बऱ्याच मंडळीस त्यानें कामावरून दूर केलें, व त्यांचे ऐवजीं दुर्गुणी, कपटपटु अशा मंडळीची भरती केली. चंद्रकेतूनें वेळोवेळ त्यास सुचविलें होतें कीं "कसाहि प्रसंग आला तरी वृद्ध मंत्री मंडळी राज्य कारभारांत कायम ठेव, त्यांस दूर करूं नको" वगैरे बापाचे शब्द त्यास आठवत होते व सर्वच दूर केल्यानें लोकांत कदाचित् गवगवा होईल ह्या भीतीमुळें कांहीं मुत्सद्दी मंडळी वांचली गेली होती. या नवीन दुर्व्यसनी कामगार मंडळांत माझा सापत्न्य बंधु "दुर्बुद्धि" याची नेमणूक झाली होती; कारण वर्तमान राज्याधिकारी "दुराचारी" व "दुर्बुद्धि" व इतर मंडळी ज्यांस हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत जागा मिळाल्या असे बालपणापासून एकाच शाळेंत शिकले असून त्यांचे मनरंजनाचे खेळ वगैरे एकच असत, व बऱ्याच वर्षांचा त्या परस्परांचा स्नेह असल्यामुळें त्या सर्वांची मनें एकदिल होऊन गेलीं होतीं. तशांत सर्व सत्ता दुराचारी याचे हातीं. मग काय! कोणी कसाहि अन्याय केला तरी त्याची फिर्याद घेतो कोण, व त्याची दाद कोठून लागणार? कारभारी मंडळी

नेहमीं अनेक कैफांत धुंद असून मन मानेल त्याप्रकारें पापभीरु, न्याय मार्गे वर्तन करणारे, अनाथ, अशा लोकांस हर बाबदींत पीडा करीत. राज्यांत भर दिवसास अनेक प्रकारचे जुलूम होऊं लागले. थोड्याच दिवसांत अशा क्रमानें सर्व प्रजा त्रासली. जेव्हां कोणा अनाथ प्राण्यावर जुलूम होई तेव्हां ते पूर्वींचे जे कांहीं जुने वृद्ध कामगार सरकार नोकरींत होते त्यांची, दाद मिळण्या करितां मोठ्या औत्सुक्यानें व दीन मुद्रेनें, विनंती करीत व त्यांसहि त्याबद्दल मनापासून वाईट वाटे; पण ते काय करणार? त्यांचें ऐकतो कोण? जो उठला तो भालेराव, अशी विलक्षण स्थिती होऊन गेली होती. गरीब, भिकारी यांस धर्म करण्या विषयीं तसेंच परोपकार करण्याविषयीं राज्यांत सक्त बंदी असल्यामुळें भिकारी यांस थारा मिळेनासा झाला; व व्यसनी, दंगेखोर, तमासगीर व इतर दुराचारी लोकांचा मोठा जमाव जमला. रात्रंदिवस बहुतेक लोक कैफांत निमग्न असून, गाणीं बजावणीं, तमाशे वगैरे वाईट छंदांत गुंग असत. असा सर्व राज्यांत एकच अनर्थ उडाला. ही स्थिती पाहून आतां ह्या राज्यांत रहाण्याची बिलकूल चाड राहिली नाहीं असें समजून कित्येक अब्रुदार लोकांनीं आपलीं घरें दारें सोडून देशांतर केलें व कित्येकांनीं तर परराज्याचा आश्रय केला.

मीनकेतना? अशा समयीं आमचे वडील धनपाल हे परलोकवासी झाले. धनपाल हयात असतांच दुर्बुद्धीचा व त्यांचा कांहीं कारणावरून बेबनाव झाल्यामुळें त्यांज-पासून " दुर्बुद्धि " विभक्त पडला होता. दुर्बुद्धीचें दुर्वर्तन लहानपणापासून माझे नजरेस आल्यामुळें मजबरोबर

देखील त्याचें वरें नव्हतें. तशांत आतां वडिलांचा दाब नाहींसा झाल्या मुळें व राजमंडळांत त्याचे हातीं अधिकार आल्यामुळें तो फार चढून गेला होता, व साधेल त्या मार्गें माझें नुकसान करण्याविषयीं उत्सुक झाला होता. दिवसें-दिवस मजविषयींचा त्याचा द्रोह बळावत जाऊन शेवटीं कांहीं तरी कारणानें माझी जिनगी मजपासून ब्रुचाडून घेऊन मला हद्दपार करावें, असा हेतु मनांत धारण करून कित्येक राजमुत्सदी नवीन व्यवस्थेस कंटाळून देशांतरीं गेले होते, त्यांच्याशीं राज्यक्रांतिच्या कांहीं मसलतींत मी सामिल होतों असा खोटा आरोप मजवर आणिला, व सरकार मार्फत माझी सर्व जिनगी जप्त करवून मला अटकेंत ठेविलें; व अखेर चौकशीचा एक दिवस नेमिला. ते दिवशीं " दुराचारी " दुर्बुद्धि वगैरे मंडळी दरबारांत बसल्यानंतर चौकशीस आरंभ झाला. मुद्दाम तयार करविलेला खोटा पुरावा ग्राह्य व खरा मानून माझे तर्फेची कांहीं तक्रार न ऐकितां असा ठराव केला कीं, "आरोपितावर राजद्रोहाची उत्तम शाबिदी झाली सबब त्याची जप्त असलेली मिळकत लेलावांत विकून उत्पन्न होईल ती रकम सरकार जमा करून अरोपित यास ताबडतोब हद्दपार करावें." मिनकेतना ! ज्या मला लहानपणापासून कोणत्याहि गोष्टीची उणीव कशी ती माहित नव्हती, सहज बाहेर जाणें झालें तरी घोडा, गाडी वगैरे वाहनाशिवाय मी कधीं पादचारी फिरलें नाहीं, तो मी ह्या वरील अविचारी ठरावामुळें केवळ निर्धन, जवळ एक पैशाचा देखील आधार नाहीं असा ठरल्यानें माझे मनाची स्थिती कशी झाली असावी याचें अनुमान तूंच कर.

दैवानुसार प्रियाप्रिय घडतें ह्या ईश्वरी नियमावर लक्ष्य दे
ऊन, स्नेही, आप्तवर्ग यांचा निरोप घेऊन माझी जन्मभू
जें गाजीपूर तें सोडून जाण्यास तयार झालों. ही माझ
स्थिती पाहून नगरांतील पुष्कळ लोकांस वाईट वाटलें
आप्तवर्गाहि फार हळहळले; पण उपाय काय? दुसरे दिवश
सूर्योदयापूर्वी नेमिल्या वेळेस घराबाहेर पडलों तों चौकां
बाहेर नागरिक, शेटसावकार मला गांवाचे वेशीपर्यंत पोंच
विण्यास आले होते त्यांची अखेरची रजा घेऊन, नगरदेव
तेस मोठ्या दुःखानें शेवटचा नमस्कार करून मार्गक्रम
णास आरंभ केला. चालण्याची सवय नसल्यामुळें व ते
उष्ण काळचे दिवस होते ह्मणून सुमारें दोन कोश म
जल चाललों नाहीं तों मी फार थकलों व जवळच अ
सलेल्या ओढ्यावर पाणी पिऊन अंमळ हुशार व्हावें व
नंतर पुढें जावें असा बेत करून स्वच्छ स्फटिकमयी
पाणी पिऊन एका आम्रतरूच्या शीतल गर्द छाये खाली
अंमळ विश्रांतीस्तव बसलों. नंतर अशा स्थितींत कोठें जावें
असा विचार करूं लागलों; पण प्रशस्त स्थल मला सुचे
नासें झालें. शेवटीं श्वशुर गृहीं जावें तेथें भार्येची गांठ
पडून तिला इकडील वृत्त समजावून सांगावें ह्मणजे होणा
ऱ्या दुःखास ती वांटेकरीण झाल्यानें माझ्या दुःखाचा
अंशतः परिहार होईल; असा विचार करून विलासपूरचा
रस्ता धरिला. तें शहर गाजीपुराहून सुमारें पन्नास कोश
लांब होतें, तरी चालण्याची सवय नसल्यामुळें व मार्गांत
खाण्या पिण्याचे हाल, केवळ माझी स्थिती पाहून धर्म
बुद्धीनें जो कोणी कांहीं देईल तें खाऊन आपला चरि
तार्थ करण्याचा, अशी व्यवस्था असल्यामुळें निर्द्रव्य

निर्बल असा जो मी त्या मला दहा दिवस लागले. दहावे दिवशीं रात्रीं सुमारें आठ वाजतां गांवानजीक एक सुंदर तलाव व त्याचे कांठीं विष्णुमंदिर व बाजूस एक धर्मशाळा होती त्याठिकाणीं आलों. दिवसाचे तापामुळें व फार दमून गेलों होतों, पुढें पाऊल टाकण्याचें अवसान राहिलें नाहीं, असें पाहून रात्रीची रात्र कशी तरी ह्या ठिकाणीं काढून प्रातःकाळीं श्वशुर गृहीं जावें असा निश्चय केला, व मार्गांत रानफळें मिळालीं होतीं तीं खाऊन उदक प्राशन करून धर्मशाळेंत आल्यानंतर आंगावरील आंगवस्त्र आंथरून त्यावर निजलों, व नित्य क्रमाप्रमाणें माझ्या दुःखाचें भांडार उघडिलें. उदयीक प्रियेची गांठ पडल्यानंतर आपली स्थिती तिला समजणार. तशांत ती प्रसूत झाली असेल किंवा होण्याच्या अगदीं बेतांत असेल, तेव्हां अशा तिच्या भयंकर स्थितींत तिला हें सर्व दुःख सांगण्याचें माझ्या कपाळीं येणार वगैरे अनेक विचार माझे मनांत वारंवार घोळत असल्यामुळें माझे मनाची स्थिती फार चमत्कारिक झाली, व दुःखडोहांत निमग्न झालेला जो मी त्या मला मध्य रात्र उलटल्यावर गाढ झोंप लागली. सुप्रभातकाळचे सुमारास जागृत झालों, व उठून प्रातर्विधी आटोपून विलासपुरचा रस्ता धरिला पुढें पहातों तों "गोविंद" नांवाचा माझ्या सासऱ्याचा चाकर त्याच वाटेनें येतांना दृष्टीस पडला. माझ्या आंगावरील वस्त्रावरून व दुःखानें बदललेल्या चेहऱ्यामुळें त्यानें मला दुरून ओळखिलें नाहीं. जसा तो अगदीं जवळ आला तसें त्यानें मला ओळखिलें व मोठ्या नम्रतेनें रामराम करून स्तब्ध उभा राहिला. नंतर मी त्यास सासुरवाडी-

कडील हकीकत ठीक आहेना, ह्मणून विचारितां त्यानें उत्तर केलें कीं महाराज कशाची हकीकत व कशाचें काय! परमेश्वरानें ही वार्ता आमच्या मुखें आपणास कळविण्यास आह्मांस जिवंत कां ठेविलें, ह्मणून कपाळास हात लावून खिन्न मुद्रेनें मजकडे पाहूं लागला; तसें माझ्या काळिजांत धस्स झालें; परंतु काय आहे तें कळल्यावांचून रहावेना, ह्मणून त्यास पुन्हा प्रश्न केला कीं कांरे, इकडील सर्व मंडळी सुखरूप आहेना? हें ऐकतांच गोविंदा ह्मणाला, महाराज, आजचा दुसरा दिवस; काल प्रातःकाळीं आपली भार्या रूपवती बाईसाहेब प्रसूत झाल्यानंतर त्यांस अनिवार्य वात होऊन दोन प्रहराचे सुमारास परलोकवासी झाली. सरकार, बाईसाहेबांस आराम पडण्यासाठीं आपल्या श्वशुरानें कांहीं खर्चाची उणीव केली नाहीं, पण काय उपाय? ईश्वरी सूत्रापुढें कोणाच्यानें जाववत नाहीं. असा दुर्घट प्रसंग विलासपुरींतील आपल्या आप्तवर्गावर आल्यामुळें तीं माणसें तूर्त अगदीं हवालदील आहेत. आपले सासू सासरे त्यांस हें एकच आपत्य, नुकतेंच संसारांत बसलेलें, त्याची ही अशी दुःखकारक दुर्दशा झाली ह्या मुळें, व आतां वार्धक्यदशेंत संतती होण्याची आशा खुंटली ह्यामुळें, त्या उभयतांनीं अन्न वर्जिलें आहे. परमेश्वरानें त्यांच्या नातवंडास ह्मणजे आपल्या पुत्रास तरी सुखाचें ठेविलें असतें तर ठीक झालें असतें; परंतु त्यानेंही त्यांस सोडून आपल्या माते बरोबर काल सायंकाळींच परलोकवस्ती पतकरली. परमेश्वरा! तुझें गेमोत्तर फार चमत्कारिक आहे. ह्या सर्व वरील गोष्टी वरून त्यांची वर्तमान व भावी स्थिती फा

शोचनीय आहे; इतकेंच नाहीं, तर आतां पुढें जगून तरी काय कर्तव्य असा निश्चय ठरून त्यांचे जीविताचा देखील त्यांस भार होण्याचा संभव आहे, वगैरे वर्तमान सांगून शोक करूं लागला. मित्रा! (गळा दाटून येऊन अश्रुपात होतो) मीनकेतना, या प्रकारचें वृत्त ऐकून माझी स्थिती काय झाली असेल त्याचें वर्णन माझ्यानें आतां करवत नाहीं. दुर्दैवानें माझा सौख्यतरू अक्षयीं पतन पावून असा छिन्नविछिन्न झाला आहे कीं, पुनः त्यास अंकुर येऊन त्याचें सौख्य अनुभवीन ही आशा तुटल्यामुळें, तशांत आतां मी निर्धन, निराश्रित झालों, हे विचार मनांत आल्यामुळें, डोळ्यांसमूर आंधार पडून जसा वादळानें एकादा मोठा वृक्ष समूल उलथून खालीं पडतो त्याप्रमाणें जमिनीवर पडलों. हे पाहून गोविंदा घाबरला. त्यानें त्वरा करून एका लोट्यांत जवळच्या बागेंतील विहिरीचें पाणी आणून माझ्या डोळ्यांस लावून व थोडें तोंडांत घालून वारा घातला, त्यामुळें थोड्या वेळानें मी सावध झालों व नूतन प्रसंग गुदरल्याची आठवण होऊन मी दीर्घस्वरानें रूदन करूं लागलों. नंतर गोविंदानें माझें सांत्वन केलें व ह्मणाला, महाराज, आपण एकवार विलासपुरींत जाऊन आपल्या सासू सासऱ्यांस भेटा, ह्मणजे उभयतांच्या दुःखाचें परिमार्जन होईल; परंतु प्रस्तुतच्या माझ्या स्थितींत त्यांस भेटून काय करावयाचें, आतां अवशिष्ट आयुष्य वैराग्य धारण करून तीर्थ यात्रेंत व साधुजन दर्शनांत घालवावें असा माझा ग्रह झाला. तथापि गोविंद याचें ह्मणणें कांहींसें मला सयुक्तिक वाटलें; तें असें कीं तेथें गेल्यावर जरी मला पाहतांच त्यांच्या दुःखाची पुनरावृत्ति

होणार, तरी त्यांचेपेक्षां मला दुःख करण्यास विशेष कारण आहे असा समज झाला असतां त्यांच दुःखोद्गम कमी होणार; किंबहुना मी त्यांच्या दुःखाच वांटेकरी होणार. ह्या पासून जरी तादृश आपणास सौख्य नाहीं, तरी त्या उभय वृद्धांस कांहीं बरें वाटेल, असा माझा समज झाल्यामुळें गोविंदास बरोबर घेऊन विलासपुरींत येण्यास निघालों. सकाळीं दहा वाजण्याचे सुमारास श्वशुरगृहीं दाखल झालों. मी आलों हें वर्तमान त्यांस कळतांच काय विचारावें? त्यांनीं उभयतांनीं फारच अट्टाहास्स केला. माझीहि अवस्था त्यांच्या प्रमाणेंच झाली. नंतर शेजारचे लोक वगैरे जमून त्यांनीं चार सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्या उभयतांचें सांत्वन केलें. नंतर एक दोन दिवस तेथें राहून एके दिवशीं रात्रीं माझ्या दुःखकारक स्थितीचा मला फार त्रास आल्यामुळें श्वशुराच्या संमतीवांचून वैराग्य धारण करून निघालों तो हावेळ पावेतों फिरत आहें. मित्रा मीनकेतना, जरी ह्या गोष्टीस आज सुमारें दोन वर्षें होत आलीं व ती जुनाट बनली आहे तरी माझें दुःख, जेव्हां मला त्याचें स्मरण होतें तेव्हां, नव्याप्रमाणेंच उद्भवतें. तें कधीं जुनावतच नाहीं. असो; परमेश्वर ठेवील त्याप्रमाणें राहिलें पाहिजे. असें ह्मणून त्यानें मोठ्यानें दुःखाचा सुस्कारा टाकिला. तें पाहून व त्याचे स्थितीचा विचार करून मीनकेतनास फार वाईट वाटलें व आपल्या स्नेहास हा पात्र आहे असें जाणून तो त्यास ह्मणाला, मित्रा गोपिनाथा, मजबरोबर तूं माझे घरीं चल. हें आमचें रामपूरनगर फार रमणीय असून तुझे सारख्याचे वृत्तीस अगदीं योग्यसें मला वाटतें;

कारण सुवाहिनी नदीचे कांठीं घाट बांधिलेले असून सुंदर देवालयें आहेत तीं, तसेंच थोडेदिवस माझा समागम तुझ्यासारख्या दुःखत्रस्त मनुष्यास फार हितावह होईल असें मला वाटतें. गोपिनाथानें, आतां आपणास सुख काय कर्तव्य आहे, धारण केल्या वृत्तीस त्याची मुळींच गरज नाहीं, वगैरे सांगितलें तथापि मीनकेतनाचा पराकाष्टेचा आग्रह पाहून त्याचे ह्मणण्यास तो कबूल झाला, व मीनकेतना बरोबर तो रामनगरींत त्याचे घरीं गेला. गोपिनाथाचें साकल्य वर्तमान मीनकेतनानें ऐकिलें होतें त्यावरून त्याचे स्थिती विषयीं मीनकेतनास फार वाईट वाटे, व नेहमीं त्यास चार सदुपदेशाच्या गोष्टी सांगून त्याचे मनांत पुनः संसारसुखा विषयीं प्रेरणा करून त्यास ताळ्यावर आणावा व धारण केलेला योग त्याजकडून सोडवावा असा निश्चय केला. गोपिनाथ याचा स्वभाव दिलदार तसाच तो विद्वान असल्यामुळें मीनकेतनाचा व त्याचा फारच स्नेह जमला. अनेक विषयांवर बोलण्यांत व त्यांवर चर्चा करण्यांत त्याचे बरेच दिवस गेले. मीनकेतनानें त्याच्या वस्त्रप्रावर्णाची तसेंच खाण्यापिण्याची नीट व्यवस्था केल्या मुळें त्याचें शरीरमान बरेंच सुधारलें. प्रत्यहीं उभयतांनीं सहल करण्यास जावें. मार्गांत शुद्ध मोकळे मनानें परस्परांनीं अनेक उपयुक्त विषयांवर बोलावें, परस्परांची थट्टा मस्करी व्हावी, नानाप्रकारचे खेळ खेळावे, रात्रौ मंजुळ वाद्यें वाजवावीं, वगैरे अनेक मनरंजनाचीं कृत्यें करून मीनकेतनानें त्याच्या मनावरील दुःखपटल नाहींसें केलें. परस्परांचा क्षणभर वियोग दुःसह होई. अशा आनंदांत त्यां उभयतांचे बरेच दिवस गेले. एके दिवशीं गोपिनाथास तो एकटाच अस-

त्यां मुळें आपल्या पूर्वींच्यां स्थितीची आठवण पडली. कांहींसें वाईट वाटल्यावर विचार करूं लागला कीं, ह्या रामपूरनगरींत बरेच दिवस आपण राहिलों, इतकेंच नाहीं तर, मीनकेतना सारखा अतुल स्नेही मिळविला. आतां येथें राहून काय करावयाचें? जरी दुर्दैवानें माझें सर्वस्वी नाहींसें झालें तरी एकवार सुस्थलीं जाऊन आपल्या दैवाची परीक्षा पहावी. असें करण्यांत कांहीं निष्पन्न झाल्यास ठीक, नाहींपेक्षां अनेक देश, त्यांतील लोक पहावे व कोठें साधु समागम झाल्यास ह्या नश्वर देहाचें सार्थक्य तरी करावें, ह्मणजे इहलोकीं जरी नाहीं, तरी परलोकीं सुख भोगावें किंवा सुदैवानें नीट जुळल्यास पुनः संसारसुखांत बसावें हें ठीक. असा विचार त्याच्या मनांत आला, परंतु मीनकेतनाचा वियोगास सल्ला कसा मिळणार, व त्याचे मता बाहेर जाणें आपणास अनुचित आहे असा विचार मनांत आल्यावरून त्याची परवानगी कशी मिळत्ये इकडे त्याचें ( गोपिनाथाचें ) सर्व लक्ष्य लागलें, व संचित मुद्रेनें बसला आहे तों मीनकेतन बाहेरून घरीं आला. येतांच त्यानें गोपिनाथाकडे पाहिलें तों त्याचा चेहरा म्लान, झालेला व चिंतित असा दिसला; त्यावरून त्याचे दुःखाची पुनरावृत्ति कशानें झाली असावी याबद्दल सूक्ष्म विचार करूं लागला, पण कांहीं तर्क बांधितां येईना. शेवटीं कारण कळल्यावांचून त्यास चैन पडेनासें झाल्यामुळें त्यानें गोपिनाथास मोठ्या सौजन्यतेनें, तुझें स्थित्यंतर कशानें झालें, ह्मणून विचारिलें; पण गोपिनाथानें "कांहीं नाहीं, हें तुझें व्यर्थ वेड आहे" ह्मणून उडवाउडव केली.

अशानें मीनकेतन स्वस्थ बसणारा प्राणी नव्हता. असो, आतां नाहीं तर सायंकाळीं तरी समजेल असें मनांत आणून तो स्नानसंध्यादि कर्मांस लागला. उभयतांचें दोन-प्रहरीं भोजन झाल्यावर किंचित् आराम करून मीनकेतनानें कांहीं उपयुक्त ग्रंथ काढिले व ते गोपिनाथास हाक मारून त्याबरोबर वाचीत बसला. कांहीं करमणूक झाल्यानंतर सायंकाळचे सुमारास, सहल करण्या करितां चल जाऊं, असें ह्मणून उभयतां अश्वारूढ होऊन गांवा-बाहेर गेले. वाटेनें बोलतां बोलतां मीनकेतनानें बोलण्याचा रूल सकाळच्या त्याच्या अस्वास्थ्याकडे फिरविला व त्याचें कारण त्यास विचारिलें; तेव्हां गोपिनाथानें पडदा न ठेवितां जें त्याच्या मनांत आलें होतें तें सर्व त्यास सांगितलें. त्यावरून त्याच्या मनांत देशपर्यटनास जाण्याचें आहे असें कळलें. सूर्यास्त होऊन चांदणें पडलें, तशांत ते वसंताचे दिवस होते ह्यामुळें त्या उभयतांचे अंतःकरणास त्या वेळेचा तो देखावा पाहून पराकाष्टेचा आनंद वाटला. सातआठ वाजण्याचे सुमारास घरीं आल्या-वर भोजनविधी आटोपून तदनंतर कांहीं सुस्वर वाद्यें वाजवून रात्र बरीच झाल्यामुळें उभयतां निजावयास गेले. त्यारात्रीं मीनकेतनास निश्चळ निद्रा येईना. त्याच्या मनांत देश-पर्यटनाविषयीं विचार घोळूं लागले. निरनिराळे देश पहावे, लोकांच्या रितीभाती पहाव्या, ह्मणजे त्यापासून पुष्कळ फायदे होतात, व्यवहारिक ज्ञान मिळतें, असा त्याचा समज झाला; व कसें तरी करून मातापितरांची थोडे दिवस रजा घेऊन मनांत आलेला हेतु तडीस न्यावा असा निश्चय केला. ( गोपिनाथ हा अगोदरच झोपीं गेला होता ).

वरील विचारांत निमग्न असल्यामुळें मीनकेतन निद्रिस्थ झाला. दुसरे दिवशीं संधी पाहून मीनकेतनानें वरील गोष्ट आपल्या मातापितरांचे कानावर घातली. तें ऐकतांच तीं फार खिन्न झालीं व मीनकेतनास ह्मणालीं, बाळा, प्रस्तुत उष्णकाळचे दिवस आहेत. या दिवसांत निकृष्ट स्थितींतील मनुष्य, फार तर काय, पशुपक्षी देखील आपल्या आप्तगणांत राहून पुढें येणारे वर्षाऋतूचे तजविजीस लागतात; कारण सर्ववर्षांत पर्जन्याचे दिवसांत निवाऱ्याचे जागीं बसून सुखानें दिवस घालवावे ह्मणून सर्व मनुष्यें एक जागीं येतात. अशा दिवसांत आह्मापासून वियुक्त होणें कसें बरें तुझ्या मनांत येतें? आतां आमची वार्धक्य दशा, जरेनें आह्मी ग्रस्त झालेलीं, आह्मास टाकून तुला देशांतरीं जावेंसें वाटतेंना? सर्व संसाराचा मालक, आमच्या भावी सौख्याचा कल्पतरू काय तो तूं, तूंच जर आह्मास सोडिलें तर ह्या वयांत आमची काय दशा होणार? बाळा मीनकेतना, तुझें लग्न सालमजकुरीं करण्याचा हेतु फार होता; पण तुझे ग्रह अनिष्ट आहेत ह्मणून जोशीबुवानें सांगितल्यावरून तूर्त तो बेत रहित करून चार महिने लोटल्यावर पुढें तुझें लग्न करण्याचा संकेत केला आहे. तुझें अद्यापि आमचे हातून काय झालें आहे? घर सोडिलें कीं आंगण परकें. हें जग व देशपर्यटन फार बिकट आहे; तूं अद्यापि जो दुर्घट व्यापार केला नाहींस, व जो करितां करितां कित्येक देशोधडीस लागून शेवटीं नष्ट झाले, तो करण्यास तूं प्रवृत्त होतोस, त्या तुला ह्मणावें तरी काय? तूं कांहीं ह्मण पण मीनकेतना, आमचा या कामीं बिलकुल सल्ला नाहीं; पुढें तुझी मर्जी.

हें मातापितरांचें भाषण ऐकून मीनकेतनाचें अंतःकरण फार द्रवलें व ममतेचा उकाळा त्याचे पोटांत येऊन प्रेमाश्रु लोटले; पण सरतेशेवटीं देशपर्यटनाचा त्याचा विचार श्रेष्ठ झाला व मातापितरांस संबोधून तो ह्मणालाः—

**मीनकेतन**०—आई, बाबा, तुह्मीं ह्मटलें तें सर्व माझे ध्यानांत आलें; परंतु मला कांहीं फार दिवस लागणार नाहींत. तुह्मी खुलास अंतःकरणानें मला मन कठीण करून थोडे दिवस रजा द्या, ह्मणजे तुमच्या आशिर्वादानें थोडक्याच दिवशीं परत येईन. मी ह्मणजे जगांतील सौख्य पहाण्यास बाहेर जात आहें असें समजूं नका; कारण परमेश्वराच्या व तुमच्या कृपेनें सौख्याची येथें कांहीं उणीव नाहीं; परंतु व्यावहारीक ज्ञान, देशांतीक चालीरिती, यांची माहिती असणें अवश्य आहे, असें मला वाटतें. तुह्मां उभयतांचा आतां काय भरंवसा! जरी मला, तुह्मी चिरंजीव असावें, व दुःसह व दुःखकारक तुमचा पुढील सतत होणारा वियोग होऊं नये असें वाटतें, तरी मृत्यूनें कोणास सोडिलें आहे काय ? मजवर संसाराचा भार पडल्यावर जर तो चालविण्याचें तारतम्य ज्ञान माझे आंगीं नसलें, तर कार्यसाधु लोक मज भोंवतीं जमून मला कधींच फसावितील याचा नेम नाहीं; व या महत्वाचे कामीं दुर्लक्ष्य केल्यामुळें जन्मभर जो पश्चात्ताप करावा लागणार, त्यापेक्षां थोडे दिवस कसें तरी करून मला रजा द्याच, ह्मणजे मी कार्यसिद्धि करून लवकरच तुमच्या चरणाशीं परत येईन.

याप्रमाणें मीनकेतनाचा निग्रह पाहून तीं उभयता दुःखित होत्सातीं स्तब्ध राहिलीं. त्यांच्यानें त्यास रूका-

राचें उत्तर देववेना. मीनंकेतनास तर जाण्यावांचून अन्य विचार सुचेनातसें झालें. दुसरे दिवशीं गोपिनाथानें आपली जाण्याची इच्छा मीनकेतनास प्रदर्शित केल्यावर मीनकेतनानें आपला मातापितरां बरोबर झालेला संवाद गोपिनाथास कळविला; तेव्हां त्यास मोठी भीति पडली, कीं नजाणो जनदूषणास मीनकेतन मजबरोबर देशांतरीं गेल्यानें मी पात्र होईन; कारण माझे येण्यापूर्वीं मीनकेनाचे मनांत देश पाहण्याचे विचार नव्हते, व ते त्याचे मनांत सांप्रत वळावल्यामुळें तो बाहेर जाणार, तेव्हां गोपिनाथाचे संगतीनें हा विघडला, असा जर त्याचे आप्तवर्गांनीं व इष्टमित्रांनीं तर्क केला, तर मोठें लचांड होईल. हा विचार मनांत आणून त्याच दिवशीं दोनप्रहरीं मीनकेतन दिवाणखान्यांत बसला आहे, व कांहीं विचार करीत आहे, असें पाहून गोपिनाथ त्याजवळ गेला व ह्मणाला, कां मीनकेतना, कोणता विचार चालला आहे ? हें गोपिनाथाचें बोलणें ऐकतांच, ह्यानें आपलें मन बरोबर ताडिलें, आतां लपवून कांहीं अर्थ नाहीं, असें जाणून गोपिनाथास पुनः वरील वृत्त निवेदित केलें; तें ऐकून गोपिनाथ ह्मणाला मीनकेतना ! तुला जर वाईट वाटणार नाहीं तर ह्या विषयावर मी कांहीं तुजपाशीं बोलेन; मग तुला तें रुचो अथवा न रुचो. तुझ्या मर्जीची गोष्ट. बोलण्यास मात्र तुझा रुकार पाहिजे.

हे गोपिनाथाचे शब्द ऐकून, आतां हा आपणास काय सांगतो तें पहावें, सयुक्तिक असल्यास ठीक, नसल्यास "सबका सुनना और दिलका करना" या ह्मणीप्रमाणें एका कानानें ऐकावें व दुसऱ्यानें सोडून

द्यावे, असा बेत करून मीनकेतन ह्मणाला, मित्रा तुला काय बोलणें असेल तें संकोच न धरितां बोल. हा मी ऐकण्यास सिद्ध आहें.

ह्याप्रमाणें मीनकेतनाचा रुकार मिळाल्यावर, आतां ठीक झालें, असें समजून गोपिनाथानें आपल्या बोलण्यास आरंभ केला. तो ह्मणाला—मित्रा प्रस्तुत जे विचार तुझ्या मनांत घोळत आहेत, ते तुझ्या स्थितींत असणाऱ्या मनुष्यास अगदीं अयोग्य आहेत. देशाटन करणें, जगाचे मार्ग पहाणें, वगैरे कृत्यें अगदीं असाधारण आहेत; तशांत तुजसारख्या अनुभव नसलेल्या मनुष्यास तीं केवळ दुःसाध्य आहेत असें ह्मटलें तरी चालेल. हें जग कपट, कावेबाजी, दुर्व्यसनें इत्यादिकांनीं भरलेलें असून, यांतील लोक पुष्कळ अंशीं कार्यसाधू असतात. "स्वभाव तितक्या प्रकृति" याप्रमाणें बहुतेक रचना दिसून येत्ये. ऐक्य तर मिळणें दुर्मिळच. कार्यसाधू आपणास नानाप्रकारचे लोभ दाखऊन कपटजालीं गुंतवितात, ते असे कीं, त्यांतून आपली मुक्तता होणें दुरापस्तच. आपणास अनुभव नसल्यामुळें त्यांचे डावपेंच आपणास कळत नाहींत, व अशा बिकट पाशांत गुंतल्यामुळें आपण समयीं सर्वस्वास मुकतों. मग आपली दशा काय विचारावी? परदेश फार कठीण आहे. मीनकेतना, जों पर्यंत कोणती ही गोष्ट आपणावर बितली नाहीं तों पर्यंत ती ठीकशी वाटत्ये; पण एकदां वेळ येऊन चुकली कीं मग कशाचें काय? ज्या तुला अद्यापि कोमल रविकिरणें कशीं तीं माहित नाहींत तो तूं दोनप्रहरच्या प्रखर भानुकिरणांत देशपर्यटन करण्यास कसा तयार होणार तें मला कळत

नाहीं. ज्यांच्या मनांत प्रबळ महत्वाकांक्षा वास्तव्य करीत असते, अशा कनिष्ट किंवा अति उंच स्थितींतील लोक अशीं दुर्घट कामें करूं शकतात; पण तुजसारख्या मध्यम स्थितीच्या मनुष्यास हा विचार अगदीं अयोग्य आहे. तशांत तूं अद्यापि अविवाहित आहेस. तुझीं मातापितरें अगदीं वृद्ध झालीं आहेत, तेव्हां ह्या वयांत त्यांस सोडून देऊन त्वां देशांतरीं जावें, हें मला ठीक दिसत नाहीं. तूं धूर्त, विचारी आहेस, जें काय करणें त्यावर दूर दृष्टी पोहोंचवून कर ह्मणजे झालें. मी जास्त सांगावें असें नाहीं.

ह्याप्रमाणें गोपिनाथाचें भाषण ऐकून मीनकेतन ह्मणाला, मित्रा मी जें करण्याचें योजिलें आहे तें विचारानेंच योजिलें आहे. थोडे दिवस मी या कामांत घालविणार व पुन: लवकरच स्वथलीं परत येणार. मला कां मातापितरांची काळजी नाहीं, किंवा त्यांचा मला जाच आहे? स्वहिताकारितां मी हें करणार; कारण मला परदेशीं जाऊन काय धंदा रोजगार मिळविण्याचा आहे किंवा अर्थ संपादन करण्याचा आहे? गोपिनाथा, तें कांहीं असो मी परदेश पहाण्यास जाणार व तोही तुजबरोबर; समजलास? माझा विचार स्तुत्य आहे व मी तुजबरोबर आल्यानें तूं दूषणास कधींहि पात्र होणार नाहींस मग तुझ्या मनांत काय येत असेल तें असो.

ह्याप्रमाणें मीनकेतनाचा निग्रह पाहून गोपिनाथ स्वस्थ बसला, व देश पहाण्याविषयींचें वेड त्याच्या मनांत पक्कें भरलें आहे अशी त्याची खात्री झाली. दुसरे दिवशीं पुन: मीनकेतनानें आपल्या विचाराविषयीं गोष्ट मातापितरांजवळ काढिली, ती ऐकून रविकांत ( मीनकेतनाचा बाप ) ह्मणाला बाळा, अंमळ धीर धर, आज दोनप्रहरीं जोशिबु-

यांस वळावून प्रयाणास सुमुहूर्त पहावितों. तुझा हट्टच, त्यामुळें आमच्यानें तुला हरकत करवत नाहीं. हें बापाचें भाषण ऐकून मीनकेतनास, आपल्या जाण्यास मातापितरांचें अनुमोदन मिळालें, हें पाहून आनंद झाला व त्याचें मन चिंतारहित होऊन जाण्याचे तयारीस कोणकोणत्या वस्तूंची गरज लागणार इकडे लागलें; भोजनानंतर स्नेही, इष्ट, मित्र, यांस भेटावें ह्मणून मीनकेतन बाहेर पडला.

दोनप्रहरीं रविकांत मीनकेतनाचे दिवाणखान्यांत आला. पहातो तों मीनकेतन तेथें नसून गोपिनाथ पुस्तक वाचीत बसला आहे. रविकांत सन्निध येतांच गोपिनाथ मोठ्या अदबीनें उठून उभा राहिला व त्यास बैठकीवर लोडाशीं बसवून आपण कांहीं अंतरावर मोठ्या मर्यादेनें बसला. मीनकेतन कोठें आहे ह्मणून रविकांतानें विचारतांच भोजन झाल्यानंतर तो व मी दिवाणखान्यांत आलों व लागलाच पोशाख करून तो बाहेर कांहीं कामाकरितां जातों ह्मणून सांगून चालता झाला तो अद्यापि परत आला नाहीं, ह्मणून सांगितलें. तें ऐकून रविकांत ह्मणाला— काय तरी याच्या डोक्यांत हें वेड शिरलें आहे! गोपिनाथा, तुझ्या मित्रानें आपले विचार तुला कळविलेच असतील. त्यानें तर पराकाष्ठेचा हट्ट घेतला आहे. तेव्हां मला त्याचें मन मोडितां येत नाहीं, ह्मणून त्याच्या विचारास रुकार देऊन त्यास तूर्त सुखी केलें आहे; परंतु दूरदेशीं एकटा जाणार ही काळजी माझे मनांत सतत उभी आहे, तरी त्वांहि मीनकेतना बरोबर जावें. तुह्मां उभयतांचा बंधुत्वाचा स्नेह आहे तेव्हां परदेशांत तुमचा

परस्परांस उपयोग होऊन त्यास तुझे पाठबळ होईल. प्रवास कसा तो त्यास अद्यापि ठाऊक नाहीं. आणखी असें कीं तुह्मी उभयतां सुजाण आहां; नजाणो अविचारामुळें तुह्मापैकीं एक कुमार्गी प्रवृत्त होण्याचे बेतांत आलाच तर दुसरा त्यास तिकडे वळूं नदेतां पुनः सन्मार्ग दाखवील; मिळून देशांतरीं तुमचा समागम सुखावह होईल. मीनकेतनाप्रमाणेंच तुझे ठायीं माझी श्रद्धा आहे व तुमचा परस्परांचा स्नेह अकृत्रिम आहे, हें मी जाणून आहें. आतां सेवकजन, सामान वगैरे जें तुमच्या बरोबर लागेल त्याची पाहिजे तशी जरी भरपूर पुरवणी केली असली तरी संकट समयीं किंवा हातापायांचे वेळीं खरी कळकळ बाळगणारें ह्मणून मनुष्य असलें पाहिजे; तेव्हां तूंहि मीनकेतना बरोबर असावें व थोडे दिवस बाहेर काढून नंतर लवकरच परत यावें, असें माझें मत आहे; पुढें तुझा विचार काय ठरतो!

ह्याप्रमाणें रविकांताचें बोलणें झाल्यावर गोपिनाथ ह्मणाला, बाबासाहेब, मीनकेतनानें बाहेर जाण्याविषयींचे आपले विचार मला विदित करण्यापूर्वीच एके दिवशीं आह्मी उभयतां एके ठिकाणीं बसलों असतां "मीनकेतना तुझा समागम बरेच दीवस झाला, आतां या ठिकाणीं राहून मला स्वस्थ वाटत नाहीं, मी कोठें तरी जाणार, तर मला जाण्यास रजा दे" ह्मणून मी आपलें हद्गत त्यास कळविलें; तेव्हां आणखी थोडे दिवस रहा नंतर जा, ह्मणून सांगून मला कांहीं दिवस थांबविलें. पुढें एके दिवशीं "मी देशपर्यटनास जाणार व तोहि तुजबरोबर" असें जेव्हां तो मला ह्मणाला तेव्हां मीनकेतन मजबरोबर

बाहेर पडल्यानें मी त्याच्या आप्तवर्गांच्या दूषणास व जनोपवादास पात्र होईन, ही भीति माझे मनांत उपजली; आपले ठायीं वडिलांप्रमाणें माझी निष्ठा आहे. आपल्या मुखानें मीनकेतनाबरोबर जाण्याची आज्ञा मला होत आहे, तेव्हां आतां संशयनिवृत्ति झाली. आमचें परस्परांचें प्रेम आपणास माहित आहेच, तेव्हां वडिलांनीं केलेली योजना मला मान्य असून मी आपणास धन्य मानितों.

ह्याप्रमाणें त्यांचें बोलणें चाललें आहे तों दिवसाचे चार वाजले. रविकांतानें गोपाळास ( हुजऱ्यास ) हाक मारून जोशीबुवास बलावून आणण्यास सांगितलें. अर्ध तासाचे अंत गोपाळ दिनकर भटजींस बरोबर घेऊन रविकांताजवळ आला. रविकांतानें जोशीबुवास मोठ्या सन्मानानें लोडाशीं जागा घेऊन आपण बाजूस बसला. " बहूतां दिवशीं आज बलावणें कां पाठवीलें " ह्मणून कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर मीनकेतनाचा विचार त्यास कळवून या कामास दिनशुद्धि उत्तम, प्रयाण समयीं सुमुहूर्त पाहिजे आहे तो पहावा ह्मणजे त्या प्रमाणें चिरंजिवांची रवानगी करण्यास ठीक पडेल ह्मणून सांगितलें. जोशीबुवानें परवां गुरुवारीं सूर्योदयात् चार घटकेपर्यंत दिवस फारच उत्तम आहे, पुष्य नक्षत्र आहे तें प्रयाणास मान्य असून अमृतसिद्धीयोग आहे, चिरंजीव त्वरित कार्य करून परत येतील ह्मणून आपलें पंचांग उघडून रविकांतास सांगितलें. नंतर रविकांताची परवानगी घेऊन जोशीबुवा स्वस्थानीं परत गेले. प्रयाण दिवस निश्चित होत असतां गोपिनाथ तेथें होता. त्यानें तें ऐकून आपलें जाणें उगीच लांबणीवर पडलें नाहीं, ह्मणून आनंद

मानिला. जोशीबुवा गेल्यांवर रविकांत गोपिनाथास ह्म- णाला बाबारे, ऐकिलेंसना जें झालें तें? सुदैवानें दिवसहि लौकरच मिळाला, तर आतां बरोबर काय पाहिजे त्याचा विचार करून तयारींत असा; असें ह्मणून तो खालीं भार्येस झालेलें वृत्त कळविण्यास गेला. सायंकाळचे सुमारास मीनकेतन बाहेरून घरीं आला. पहातो तों गोपिनाथाची चर्या आनंदित दिसली. त्यास त्याचें कारण पुसतां झालेलें वर्तमान त्यास सविस्तर कळविलें. तें ऐकतांच मीनकेतनाचा आनंद गगनीं मावेनासा झाला. त्या भरांत त्यानें गोपि- नाथास दृढालिंगन देऊन ह्मणाला, कां, मित्रा, आतां मी तुजबरोबर येणार कीं नाहीं? रात्र पडल्यावर ते उभयतां भोजना करितां खालीं आल्यावर रविकांत मीनकेतनास ह्मणाला बाळा, तूं आज दोन प्रहरापासून कोठें गेला होतास? तुझा स्वभाव असा नादी आहे, ह्मणून तुझें जा- ण्यास मी अनुमोदन देत नव्हतों; परंतु नाइलाजास्तव तुझें ह्मणणें कबूल करावें लागतें. आज जोशीबुवास बलावून आणून प्रयाण दिवस कायम केला. गुरुवारीं प्रातःकाळीं तुझें गोपिनाथाबरोबर जाण्याचें ठरलें. आतां तयारीस लागा. परदेश कंठणें आहे याचा विचार करून, काय काय जिनसा बरोबर पाहिजेत त्या आणविण्याची तजवीज करा. आतां मध्यें एकच दिवस राहिला. हे बापाचे शब्द ऐकून त्याचे नेत्रीं आनंदाश्रु लोटले तथापि गहिंवर सांव- रून तो बापाबरोबर भोजनास बसला. सर्वांचें भोजन आटोपल्यानंतर गोपिनाथासह मीनकेतन आपल्या दि- वाणखान्यांत आला. उतावळ स्वभावास धीर कोठून निघणार? त्यानें लागलेंच गोपिनाथास पुसिलें मित्रा, आतां

आपल्या बरोबर कोण कोणत्या जिनसा घ्यावयाच्या ? आं-पण परदेशीं जाणार, दुखणें खुपणें प्राणिमात्रास आहे, तेव्हां उत्तम औषधींचा थोडा संग्रह बरोबर घ्यावा असें मला वाटतें. त्याचप्रमाणें मनरंजना कारितां कांहीं पुस्तकें, कांहीं करमणुकीकरितां सुस्वर वाद्यें, मुशाफरीचें, तसेंच दिवाण दरबारीं जाण्याजोगे पोशाख, तिजोरीची पेटी, सामान भरण्याचे थैले, वगैरे सामान उद्यांचेउद्यांच तयार ठेविलें पाहिजे. उदईक सकाळीं आपल्या पागेंत जाऊन मजलीच्या कामास योग्य असे दोन उत्तम घोडे निवडून ठेविले पाहिजेत. सामानसुमानाची व जनावरांची व्यवस्था ठेवण्याकारितां चार असामी नोकर घेतले ह्मणजे पुरत. याप्रमाणें त्याचें बोलणें ऐकून गोपिनाथ ह्मणाला मित्रा प्रवास ह्मणजे काय हें तुला अद्यापि माहित नाहीं. ज्या-प्रमाणें अज्ञान शिशू खेळतांना मनःपूत बोलतो, त्याप्रमाणें वरील सामानाची तुझी ही लांबलचक यादी ऐकून मला विस्मय वाटतो. अशा नाजुकपणानें तुझा प्रवास इकडल्या-इकडेच होणारसें दिसतें. मित्रा, देशांतरीं अनेक ठिकाणीं अनेक प्रसंग येणार; तशासमयीं तूं आपला बचाव क-रणार कीं सामानाची आशा धरणार? ज्या वस्तु इकडून घेऊन जाण्याचें ह्मणतोस त्या परदेशीं जरूर लागल्यास मिळणार नाहींत असें तुला वाटतें? ह्या तुझ्या बालिश स्वभावास काय ह्मणावें ? तें कांहीं नाहीं; आपल्या बरोबर कांहींएक घ्यावयाचें नाहीं. थोडा द्रव्य संग्रह मात्र पाहिजे आहे, व तोहि तुजकरिता. हें तुझें सामान व घोडीं, सेवकजन जागच्याजागींच राहूंदे. जितका व्याप तितका संताप. त्वरित मजलेच्या कामास यांचा भार होणार आहे.

हें गोपिनाथाचें बोलणें मीनकेतनाचे मनांत पूर्णपणें बिंबलें, व सज्या स्वारीनें, वसण्यासाठीं दोघांकरितां दोन घोडे घेऊन बाहेर पडावयाचें असा निश्चय केला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून मीनकेतन आपल्या मित्रांस भेटावयास गेला व आपला जाण्याविषयींचा झालेला निश्चय त्यानें त्यांस निवेदन केला. उदईक गोपिनाथासह मी जाणार तेव्हां पूर्वी प्रमाणेंच मजवर पुढेंहि तुमचा लोभ राहून माझे नागीं तुह्मी माझ्या मातापितरांचा समाचार घ्यावा, ह्या प्रमाणें सर्वांस सांगून त्यांची जाण्यास रजा घेतली. घरीं आल्यावर सर्व दिवस त्यानें आईबापाबरोबर बोलण्यांत, तसेंच आप्तवर्ग, इष्टमित्र, ह्यांना भेटण्यांत घालविला. रात्रीं त्यास जाण्याच्या उत्कंठेमुळें निश्चल निद्रा आली नाहीं. मोठ्या पहांटेस उठून मीनकेतन चाकर माणसांस हाका मारूं लागला. सुप्रभातीं इष्टमित्र मीनकेतन जाणार ह्मणून त्यास पोहोंचविण्यास त्याचे घरीं जमले. सूर्योदयापूर्वी भोजनादि सर्व विधी आटोपून निश्चित वेळीं कुलदेवतेस वंदन करून मातापितरें, सोयरेधायरे, इष्टमित्र ह्या सर्वांस नमस्कार करून, त्यांचा निरोप घेऊन, गोपिनाथासह मीनकेतन बाहेर पडला. सेवक जनांस, “ तुह्मी आपापल्या कामीं दक्ष असावें व बाबा आई ह्यांच्या प्रकृतीस फार जपावें, तसेंच राघु वगैरे जे माझे पक्षी दिवाणखान्यांत आहेत त्यांस वेळच्या वेळीं खाण्यापिण्यास देत जाऊन, माझीं वाद्यें, पुस्तकांचीं कपाटें, सारांश ज्या सर्व माझ्या वस्तु आहेत त्यांजवर चांगली नजर ठेवा ” ह्मणून सांगितलें. आतां आपण प्रिय मातापितरांस सोडून देशांतरीं जाणार, व आपणास कांहीं दिवस त्यांचा दुःसह

वियोग होणार, हें मनांत येऊन मीनकेतनाचे नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. रविकांत व त्याची पत्नी ह्यांस पुत्रवियोगजन्य दुःखानें गांठिल्यामुळें रडण्यावांचून दुसरें कांहीं सुचेना. तीं वेड्यासारखीं झालीं, व कोणीं कांहीं पुसिल्यास भलतें सलतें बरळूं लागलीं. प्रयाण समयीं रूदन अगदीं अयोग्य आहे, मीनकेतन लवकरच सुखरूप परत येईल ह्मणून चार शिष्ट लोकांनीं रविकांताची समजूत घातल्यावर उभयतां मातापितरांनीं मीनकेतनास प्रेमालिंगन दिलें व "बाळा आह्मास सोडून जातोसना? गोपिनाथा, तूंहि मीनकेतनाबरोबर आह्मास सोडून चालला सना? बाळानों, परदेशांत तुह्मी आपल्या प्रकृतीस जपा, व आमची आठवण धरून लवकरच परत या ह्मणजे झालें" प्रयाण वेळा येऊन ठेपली तसे दोन घोडे मोतद्दारानें दोघांकरितां सज्ज करून आणिले. नंतर सर्वांची उभयतांनीं रजा घेऊन मीनकेतन व गोपिनाथ हे अश्वारूढ झाले. सर्वांस आपापल्या स्थळीं जाण्याची विनंती करून "बाबा, आई, तुह्मी आपल्या प्रकृतीस जपा, व सदैव माझें अभिष्ट चिंता, आतां मी येतों," असें ह्मणून घोडे चालते केले. मीनकेतनाची स्नेही मंडळी त्यास गांवाचे वेशीपर्यंत पोहोंचविण्यास आली होती, त्यांस "लांब कशास येतां तुह्मीं माघारे फिरा; घरची सर्व काळजी तुह्मास आहे. इकडील वर्तमान मला कळवीत असा" असें सर्वांस सांगून कांचनपुरीचा मार्ग धरिला. त्यांस पोहोंचविण्यास गेलेले स्नेही, सेवकजन वगैरे सर्वमंडळी परतली.

# भाग ३.

बरोबर आलेली मंडळी मागें फिरलीसें पाहून मीनकेतन गोपिनाथास ह्मणाला, मित्रा, स्वीकृत केल्या कार्याचा एक अष्टमांश एथेंच करून चुकलों; कसें ह्मणशील तर इष्टमित्र, मातापितरें ह्यांचा मायापाश तोडून त्यांजपासून निघणें, हें मोठें दुर्घट काम आहे. खऱ्या ममतेचे त्यांचे ते प्रेम उकाळे पाहून कित्येकांचें मन द्रवतें व अशा प्रसंगीं ते हारीस गेले ह्मणजे योजिलेले विचार एकीकडे गुंडाळून ठेवावे लागतात. कठीण मन केल्यामुळें हें महत्कृत्य माझे हातून झालें, या बद्दल मी परमेश्वराचा फार आभारी आहें. आतां पुढील सर्व व्यवस्था तुजकडे आहे; कारण मार्गाची, परदेशाची मला मुळींच माहिती नाहीं. आतां कोठें जाण्याचें त्याविषयीं विचार करून तो मार्ग धरिला पाहिजे.

हें मीनकेतनाचें भाषण ऐकून गोपिनाथ ह्मणाला, मित्रा येथून कांचनपूर सुमारें शंभर कोश लांब आहे, तिकडे वळावें ह्मणजे ठीक पडेल; कारण तें शहर फार जुनें व मोठें असून, तेथील राज्यव्यवस्था उत्तम असल्या विषयीं प्रसिद्धि आहे. अशा जुनाट ठिकाणीं जाऊन थोडे दिवस घालविल्यानें तुझ्या मनोदया प्रमाणें माहिती मिळेल असें मला वाटतें. तुझा रुकार असल्यास चल तिकडेसच जाऊं. हाच मार्ग त्या स्थलीं जातो. गोपिनाथाचें बोलणें मीनकेतनास पसंत पडून त्यानें त्यास रुकार दिला; तो मिळतांच गोपिनाथानें आतां घोडे जलदीनें नेले पाहिजेत, मध्यान्ह वेळा समीप येत चालली तोंपर्यंत काय मजल निघेल ती काढावी;

ऊष्ण काळचे दिवस असल्यामुळें चंड सौर किरणांत मार्ग क्रमणें फार कठीण. ह्या प्रमाणें बोलणें झाल्यावर त्या उभयतांनीं घोडे हाकिले. दोन प्रहराचे सुमारास ते एका लहानशा नदीचे कांठीं आले. सूर्यकिरणें फार प्रखर भासूं लागल्यामुळें व घोडेहि थकल्यामुळें पुढें मार्ग निघेना ह्मणून एका मोठ्या झाडा खालीं येऊन घोडे उभे केले. खालीं उतरून घोड्यावरील गाशे जमिनीवर आंथरून, जीन वगैरे सामान झाडाचे बुडाशीं लावून ठेविलें. नंतर गोपिनाथानें घोड्यांस पाणी पाजून त्यांच्या पायांस काढण्या बांधून नदी प्रदेशींचें हिरवें गवत खाण्यास सोडिलें. उभयतांनीं बरोबर आणलेल्या फराळाच्या जिनसापैकीं कांहीं खाऊन पाणी प्याल्यानंतर दाट शीतल छायेंत आराम केला. श्रम झाल्यामुळें मीनकेतनास किंचित् डोळा लागला, परंतु गोपिनाथाचे मनांत पुढें कसें जावें वगैरे विचार घोळत असल्यामुळें त्यास झोंप आली नाहीं. ऊन्ह खालीं झालेंसें पाहून तो उठला व घोड्याजवळ जाऊन पहातो तों घोडे गवत खाऊन हुशार झालेसे दिसले. त्यांस पाणी पाजून झाडा खालीं आला तों त्यांच्या टापांचा आवाज ऐकून मीनकेतन जागृत झाला. गोपिनाथा, तूं मुळींच निजला नाहींस वाटतें; आतां आपणास मार्गांत श्रम होणार, त्यांचा परिहार होण्याकरितां विसावा घेतला नाहीं तर आपले हातपाय कसे चालणार? तें कांहीं नाहीं, मित्रा गोपिनाथा, हें तुझें करणें मला बरोबर वाटत नाहीं.

गोपिनाथ ह्मणाला मीनकेतना? "आतां हा गोपिनाथ पूर्वींचा गाजीपूरचा धनाढ्य सावकार पुत्र नव्हे तर कं-

गाल, दुःखानें पीडिलेलं असा एक वैरागी बनला आहे. दुःखें कशीं भोगावीं तें अनेक प्रसंगांनीं आतां मला चांगलें शिकविलें आहे. ज्या प्रमाणें स्थितीचा पालट झाला त्या प्रमाणें माझी प्रकृतीहि बदलली आहे. मला कोणतीहि गोष्ट त्रिकट वाटत नाहीं; सर्व सुसाध्य आहेसें वाटतें. बरें असो. हा तांब्या घे. ( तांब्या पुढें करितो ) गुळणा वगैरे करून चला तयार व्हा. आपण अवघे दहा कोश आलों. इतकीच मजल सायंकाळपर्यंत पुढें काढिली पाहिजे; असें ह्मणतांच मीनकेतन उठला व पाणी पिऊन उभयतांनीं पोशाख करून घोडे भिडविले व पुनः मार्ग क्रमूं लागले. सांयकाळीं सुमारें दहा कोश मार्ग चालून एका खेड्यांत वस्तीस राहिले. या प्रमाणें प्रति दिवशीं मजल करून सहावे दिवशीं सायंकाळीं उभयतां कांचनपुरींत दाखल झाले.

ह्या वेळची कांचनपुरीची शोभा प्रेक्षणीय होती. सायंकाळची वेळ असल्यामुळें काबाडकष्ट करणारे लोक आपले कामावरून घरीं मोठ्या लगबगीनें जात आहेत, उदमी लोकांचे दुकानावर दिव्यांचा चकचकाट उडून गिऱ्हाईकांची एकच गर्दी उसळून गेली आहे, तसेंच श्रीमान तरुण नागरिक कित्येक घोड्यावर, कित्येक गाडींत बसून हवा घेण्याकारितां नगराबाहेर त्वरेनें जात आहेत, अशा धांदलीचेवेळीं हे दोघे परकीय गृहस्थ त्या नगराचे मध्यभागीं असलेल्या श्री कालिकेच्या देवालया जवळ येऊन ठेपले. मीनकेतनास आतां पुढें जावें कोठें काय करावें,.असें होऊन गेलें होतें. अशा विवंचनेत तो असतां गोपिनाथ ह्मणाला, मित्रा, तूं इतका भांबावल्या

सारखा कां दिसतोस? अरे, आतां तर आपण नगरांत दाखल झालों. आतां काळजी ती कशाची? शहर मोठें असल्यामुळें खाण्यापिण्याची कांहीं गैरसोय होणार नाहीं. रात्रीची रात्र कशी तरी काढिली पाहिजे. उदईक सर्व यथास्थित तजवीज करितां येईल. हें जवळच देवालय आहेसें वाटतें. तूं अमळ थांब व माझा घोडा सांभाळ. मी असाच चौकशी करून एथें उतरण्यास धर्मशाळा वगैरेची सोय असल्यास तजवीज करून येतों, असें ह्मणून आपल्या घोड्याचा लगाम मीनकेतनाचे हातांत देऊन गोपिनाथ खालीं उतरला, व देवळांत गेला. पहातो तों बाजूस मोठी धर्मशाळा असून दिवाबत्तीची उत्तम सोय आहे. धर्मशाळेंत लोक थोडे असल्यामुळें आपणास जागा मिळेल किंवा नाहीं, ही शंका राहिली नाहीं. धर्मशाळेंतील कांहीं वाटसरू आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगत बसले आहेत, कांहीं मार्गश्रमामुळें निद्रिस्थ झाले आहेत असें पाहून हा थोडा वेळ विचार करीत चौकांत उभा राहिला, तों तेथील वाटसरांपैकीं एक जण गोपिनाथास ह्मणाला "कोण उभें आहे तें?" हें ऐकतांच गोपिनाथ ह्मणाला, कीं तुह्माप्रमाणेंच मी एक वाटसरू आहें. मजबरोबर माझा एक स्नेही आहे, तो बाहेर उभा आहे. आह्मां दोघां पुरती जागा एका बाजूस कृपा करून द्याल तर आमचेवर फार मेहेरबानी होईल. हें त्याचें बोलणें ऐकतांच ते ह्मणाले, बाबारे, आपल्या सारख्यांचे सोई करितांच धर्मशाळा बांधिल्या असतात. तुह्मांस पाहिजे तितके दिवस खुशाल रहा. येथें रहाण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. तुमच्या येण्यानें उलटी आह्मांस संगत होणार आहे. ह्याप्रमाणें

गोपिनाथाची खातरी झाल्यावर तो बाहेर आला, व मीनकेतनास घोड्यावरून उतरण्यास सांगून घोडे हातानें धरून मीनकेतनासह गोपिनाथ चौकांत आला, व घोड्यांस बांधून ठेवून ते उभयतां धर्मशाळेंत आले. तेथील वाटसरांनीं घोडे वगैरे यांचा थाट पाहून हे कोणी तरी श्रीमंत असावेत, अडचणीस्तव येथें आपणांत येऊन उतरले असें धोरण बांधून त्यांस एके बाजूस प्रशस्त जागा दिली. गोपिनाथानें घोड्यावरील सामान काढून गाशे आंथरिले, व मीनकेतनास तेथें ठेऊन आपण पेठेंत गेला. तेथें कांहीं फराळाचे जिन्नस खरेदी करून लवकरच परत धर्मशाळेंत आला; पहातों तो मीनकेतन वाटेच्या श्रमामुळें निद्रिस्थ झाला आहे. मग त्यास जागृत करून आणलेल्या पदार्थांपैकीं त्यास कांहीं देऊन व थोडें आपण घेऊन पाणी प्याल्यावर ते अमळ हुशार झाले. आतां उद्यां कशी काय तजवीज करण्याची त्याविषयीं त्यांचे विचार चालले. मीनकेतन ह्मणाला, गोपिनाथा, हें स्थळ कांहीं दिवस घालविण्यास अगदीं योग्य आहे. येथील जी व्यवस्था सायंकाळीं आपण पाहिली तीवरून शिकण्याजोग्या अशा बऱ्याच गोष्टी येथें सांपडतील; तरी उद्यां कोठें तरी भाड्यानें प्रशस्त जागा पाहून तेथें रहाण्याची तजवीज केली पाहिजे. बरें ठीक आहे; माझाहि विचार तसाच झाला आहे, उदयीक काय होईल तें पहावें चला आतां स्वस्थ आराम करूं. असें ह्मणून ते आंथरुणावर पडले. सुप्रभातीं गोपिनाथ जागृत झाला. मीनकेतनाहि त्या बरोबर उठला. नंतर उभयतांचे प्रातर्विधी झाल्या नंतर मीनकेतनाची परवानगी घेऊन गोपिनाथ बाहेर पडला.

तो पेठेंत येऊन जागेविषयीं तपास करूं लागला. सुदैवानें रस्त्यावरच एक सुंदर बंगला रिकामा असल्या बद्दल तपास लागल्यामुळें तिकडे जाऊन पाहिलें, तों घर फार सोयकर आहे असें दिसलें. नंतर भाड्याविषयीं मालकाबरोबर नक्की ठराव करून स्वयंपाक करण्यास एक ब्राह्मण घोड्याकरितां मोतद्दार व घरांतील किरकोळ कामासाठीं एक नोकर, घरांत भांडींकुंडा, दिवेबत्त्या, बिछायती सामन वगैरे संसारास लागणाऱ्या सर्व जिनसांची तजवीज करून परत मीनकेतना जवळ आला व ह्मणाला, मित्रा आतां उशीर कां, सर्व सिद्ध आहे, चला आपल्या बिऱ्हाडीं जाऊं; असें ह्मणून घोडे मोतद्दारापाशीं देऊन त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यास सांगून आपण उभयतां तिकडे गेले. घरांत गेल्यावर पहातो तों सर्व यथास्थित आहे; कांहीं उणीव नाहीं. हें पाहून मीनकेतनास आश्चर्य वाटलें व तो गोपिनाथास ह्मणाला, अल्प कालांत ही सर्व व्यवस्था कशी केलीस ? गोपिनाथ ह्मणाला सर्व अनुकूल असलें ह्मणजे कशाचीही अडचण नसते. असो. आतां स्नानें वगैरे करून भोजन आटपूं ; मग पुढील व्यवस्था पहातां येईल. मित्रा, कालपासून पोटांत अन्न नसल्यामुळें तुला हुशारी वाटत नसेल. हें गोपिनाथाचें बोलणें ऐकून मीनकेतन ह्मणाला, मजकरितां तुला फार श्रम होतात त्याची माफी असूं दे. असें ह्मणून ते उभयतां उठले. स्नानें व तदनंतर भोजनादिविधी झाल्यानंतर दोनप्रहरीं उष्णकाळचे दिवस असल्यामुळें आराम करीत पडले. सायंकाळीं मीनकेतन व गोपिनाथ, बरोबर त्या नगरचा एक माहितगार घेऊन प्रसिद्ध ठिकाणें पहावयास गेले. सायं-

कांळीं घरीं आल्यावर आपल्या सुमंत मोतद्दारास हाक मारून आपल्या शेजारीं कोण कोण लोक रहातात वगैरे माहिती विचारिली. तेव्हां सुमंत ह्मणाला, सरकार, बहुतेक लोक साधारणच आहेत परंतु पलीकडील हवेलींत एक श्रीधरराव नांवाचे मोठे सरकारी कामगार आहेत. गृहस्थ स्वभावानें फार सज्जन आहेत व हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत त्यांचा हुद्दाही मोठाच आहे, वगैरे माहिती मिळाल्यावर त्या उभयतांस बरें वाटलें. उदईक श्रीधररावांचे भेटीकरितां जावयाचें ह्मणून बेत ठरवून बरोबर आणिलेल्या पुस्तकांपैकीं कांहीं पुस्तकें वाचिलीं. घरांतून बाहेर पडल्यापासून झालेला सर्व वृत्तांत लिहून ठेवावा व घरीं आल्यावर तो मित्रमंडळीस वाचण्याकरितां द्यावा, ह्मणून मीनकेतनानें लिहून ठेविलेल्या पुस्तकांत कांचनपुरींत आल्यापासूनची हकीकत लिहून ठेविली व नंतर तो झोपीं गेला. दुसरे दिवशीं सकाळींच सूर्योदयानंतर ते उभयतां श्रीधररावाचे घरीं गेले, तों श्रीधरराव आपल्या दिवाणखान्यांत बसले होते. उभयतांनीं नमस्कार केल्यावर श्रीधररावानें त्यांस उठून लोडाशीं जागा घेतली, व आपण कोण, कशाकरितां इकडे आलां वगैरे विचारपूस केली, तेव्हां मीनकेतनानें प्रौढ वाणीनें आपला घर सोडण्याचा व ह्या नगरींत येण्याचा उद्देश त्यास कळविला; त्यावरून हे श्रीमंत कुलोत्पन्न असून ज्या उद्देशानें ह्यांनीं घर सोडिलें तो स्तुत्य आहे, अशी त्याची खातरी झाली. नंतर तेथील राज्यव्यवस्थेविषयीं कांहीं गोष्टी झाल्यावर मीनकेतनानें दरबारांत येण्याचा व मोठमोठ्या मंडळीकडे आपला मार्ग प्रवेश होण्याचा फार हेतु आहे, अशी आपली इच्छा प्रदर्शित केली. त्यास

त्यांचें ( श्रीधररावाचें ) अनुमोदन मिळाल्यानंतर आजच राजदरबारांत जावयाचें असा बेत करून, श्रीधररावांची कचेरींत जाण्याची वेळ होत आली असें पाहून, त्यांची रजा घेऊन आपल्या बिऱ्हाडीं आले. नंतर ते दोघे दोन प्रहरीं दरबारांत गेले. श्रीधररावाकडे इनसाफाचें काम होतें. तेथें कांहीं वेळ बसून त्याचें न्याय चातुर्य, निस्पृहपणा वगैरे गुण अवलोकन करून नंतर प्रधान, सेनापती, वगैरे कामगारांच्या कचेऱ्या पाहून अखेर राजकचेरींत गेले. अल्पकाळांत सर्व ठिकाणीं श्रीधरराव बरोबर असल्यामुळें ओळख पडून तशीच ह्या उभयतांच्या चौकस मुद्रा व धूर्तता पाहून त्यांस फार मान सन्मान मिळाला, व यांची विद्वत्ता व उद्देश लोकांस विदित झाल्यावर त्यांची जिकडे तिकडे वहावा झाली. सायंकाळीं गांवांतील देवालयें, पुस्तकालयें, व इतर प्रसिद्ध ठिकाणें पाहून उभयतां घरीं परत आले. ह्या प्रमाणें कांहीं दिवस सतत क्रम ठेविल्यामुळें त्यांच्या बहुतेक कारभारी मंडळीच्या चांगल्या ओळखी झाल्या. दरबारांत प्रधान कचेरींत त्याचा मुलगा कमलाक्ष येत असे, त्याचा व मीनकेतनाचा फारच स्नेह जमला. ह्या कमलाक्षाच्या साह्यानें मीनकेतनाच्या गांवांतील सर्व सभ्य गृहस्थ, मोठे मोठे व्यापारी, इत्यादि लोकांच्या ओळखी होऊन त्या नगरची राज्य नीति, चालीरीती वगैरेची फार उत्तम व बारीक माहिती मिळाली. एकंदर सर्व व्यवस्था पाहिल्यावर मीनकेतनास त्या विषयीं फार आनंद झाला. आतां ह्या नगरांत जास्त दिवस राहून काय करावयाचें, पुढें जावें, असें मीनकेतनाच्या मनांत आल्यावरून तो गो-

पिनाथास ह्मणाला, कां मित्रा, तुझें या कामीं काय मत आहे ? गोपिनाथानें उत्तर केलें आतां आपणास येथें कांहीं पहाण्याचें राहिलेंसें दिसत नाहीं. पुढें अद्यापि आपणांस पुष्कळ देश पहावयाचे आहेत ह्मणून येथून पुढें जावें असें माझ्याहि विचारास येतें. ह्या प्रमाणें बोलणें झाल्यावर सर्व सामान सुमान, देणें घेणें, वगैरेची व्यवस्था आज कर ह्मणजे उदईक पुढें मार्ग क्रमण्यास ठीक पडेल, अशी मीनकेतनाची सूचना झाल्यावर तेच दिवशीं सर्व तजवीज करून वाटे करितां कांहीं फराळाचे पदार्थ आणविले. सायंकाळीं उभयतां गांवांतील ज्या संभावित गृहस्थांच्या ओळखी पडल्या होत्या त्यांचेकडेस जाऊन उद्यां प्रातःकाळीं आह्मी जाणार, आतां लोभ असूं द्या, ह्मणून सांगून त्यांचा निरोप घेतला. प्रातःकाळीं आपणास जाण्याचें तेव्हां धांदलींत कमलाक्ष व श्रीधरराव ह्यांस भेटण्यास सवड होणार नाहीं ह्मणून त्यांस आतांच भेटावें असा विचार करून प्रथम कमलाक्षाकडे गेले तों तो बागेंतील बंगल्यांत नुकताच गेला ह्मणून सेवकजनांनीं त्यास कळविलें. लागलेच ते बागेंत गेले तों कमलाक्ष बंगल्यांतील गच्चीवर चांदण्यांत एका कोचावर स्वस्थ आराम करीत पडला आहे. मीनकेतन व गोपिनाथ उभयतां आपल्याकडेस येत आहेत असें पाहून तो उठला आणि त्यांस कोचावर बसवून आपणहि त्यांचे बरोबर बसला जवळच असलेल्या झारींतील वाळ्याचें पाणी प्याल्यावर मीनकेतनास इतक्या रात्रीं आपणाकडे येण्याचें कारण विचारिलें. तेव्हां मीनकेतनानें उद्यां पुढें जाण्याचा संकेत करून आपली रजा घेण्यास आलों ह्मणून त्यास कळविलें.

हें ऐकतांच चकित होऊन कमलाक्ष ह्मणाला काय उद्याच जाणार ? आज दोनप्रहरीं दरबारांत आपण आलां होतां तेव्हां जाण्याविषयीं कांहीं वार्ताही मजजवळ निघाली नाहीं, व आतां एकाएकींच बेत केला ह्मणून सांगतां हें काय ? मजबरोबर आपला स्नेह झाल्यास थोडे दिवस झाले नाहींत तों वियोग दुःख अनुभविण्यास आह्मास लावितां हें आपलें करणें बरें दिसत नाहीं. त्यास मीनकेतनानें उत्तर केलें, मित्रोत्तमा स्थलांतर झाल्यानें स्नेहांत अंतर होतें असें नाहीं; उलटें वियोग झाल्यानें त्याचें दृढीकरण होतें असें माझ्या अनुभवास आलें आहे. उदईक सुप्रभातीं येथून आह्मी जाणार तेव्हां आह्मा उभयतांचें स्मरण ठेवा हेंच मागणें आहे. एकाच ठिकाणीं राहिल्यांत ह्मणजे विशेष आहे असें मला वाटत नाहीं. ह्याप्रमाणें त्यांचें भाषण होऊन पान सुपारी वगैरे झाल्यावर मीनकेतन घरीं येण्यास निघाला तों कमलाक्ष ह्मणाला, मीनकेतना, मी त्या वेतानें आपणाकडे येईन त्याचेपूर्वीं मात्र आपण जाऊं नये. बरें ठीक आहे, आतां मी येतों, असें ह्मणून नमस्कार करून उभयतां निघाले. मीनकेतन गेल्यावर कमलाक्षानें आपल्या खासदारास, उद्यां पहांटेस माझा घोडा तयार करून आण, मला कांहीं निकडीचे कामाकरितां बाहेर जाणें आहे, ह्यांत हयगय झाल्यास उपयोगी पडणार नाहीं ह्मणून सांगून रजा दिली. नंतर मंदिरांत निजावयास गेला. मीनकेतनानें कमलाक्षाचा निरोप घेतल्या नंतर श्रीधररावाकडे गेला तों श्रीधरराव जेवण होऊन विडा खात नुकतेच बसले होते. मीनकेतनास येतांना पाहून श्रीधरराव ह्मणाले, कां रावसाहेब, आपण सायंकाळीं

कोठें गेला होतां ? मी कचेरींतून येतांना आपल्या बिऱ्हाडीं गेलों होतों तों सरकार अद्यापि घरीं आले नाहींत ह्मणून सेवकानें कळविलें. मग तसाच परत घरीं आलों. दरबारच्या पोशाखानें इतक्या रात्रीं इकडे कोणीकडे ? ह्मणून श्रीधररावानें प्रश्न केल्यावरून मीनकेतन ह्मणाला, श्रीधररावजी, आज दोन प्रहरापासून माझा पाय ठिकाणीं नाहीं. उदईक येथून पुढें मार्गस्थ व्हावयाचें तेव्हां दरबारच्या, गांवांतील थोर मंडळीच्या, तसेंच आपणासारख्या स्नेही मंडळीच्या, भेटी, निरोप घेण्यांत आजचा दिवस कोठें गेला तो कळला नाहीं; त्यामुळें सायंकाळीं आपणास माझी घरीं भेट झाली नाहीं. आतां लोभ असूं द्या व आह्मा उभयतांची आठवण ठेवा ह्मणून सांगावें असें नाहीं.

श्रीधररावास हें मीनकेतनाचें भाषण ऐकून फार वाईट वाटलें व ह्मणाला, थोड्या दिवसां करितां आमच्या गांवीं येऊन आह्मास आपल्या सद्गुणांचा चटका तरी कशास लाविला ? नंतर बाजूस बसलेल्या मंडळीकडे वळून श्रीधरराव ह्मणाले, मीनकेतनाप्रमाणें अल्पवयी, सद्गुणी, विद्वान, गंभीर, प्रौढ बुद्धीचा मनुष्य हल्लींच्या काळांत आढळणें कठीण. काय त्याची वर्तणूक तरी मनोहर व काय तें सौजन्य ! मीनकेतना ? तुझ्या जाण्याचें वर्तमान उद्यां दरबारांतील लोकांस कळल्यावर तुझ्या सद्गुणांचें स्मरण होऊन त्यांस मोठी हळहळ वाटेल. असो, रात्र बरीच झाली. उद्यां तुह्मास पुढें जाणें आहे. बिऱ्हाडाची व्यवस्था अद्यापि करणें असेलच. आतां बिऱ्हाडीं जाण्यास परवानगी आहे. जाते समयीं मला हाक मारा; मला

भेटल्यावांचून मात्र जाऊं नका. ह्याप्रमाणें बोलणें झाल्यावर मीनकेतन घरीं आला. गोपिनाथ मीनकेतनास ह्मणाला, तूं सर्व दिवस फिरतांना फार श्रमित झालेला दिसतोस; आता स्वस्थ झोपां जा. उद्यां पुनः मार्गश्रम आपल्या पाठीशीं आहेतच. मी आतां येथील व्यवस्था करितों. असें गोपिनाथाचें बोलणें ऐकिल्यावर, बरें, तर तूंहि लवकरच व्यवस्था आटोपून नीज ह्मणून सांगून निजण्याकरितां बिछान्यावर जाऊन पडला. इकडे गोपिनाथानें नोकर लोकांचें वेतन चुकतें करून, दुसरे कोणास कांहीं देणें होतें तें देऊन, सर्व व्यवस्था नोकरांकडून करवून, आतां कांहीं राहिलें नाहीं असें झाल्यावर तोहि आपल्या बिछान्यावर जाऊन पडला. पहांटेचे चार वाजतांच गोपिनाथ जागृत होऊन चाकर मनुष्यांस उठवून सामान सुमान जिकडील तिकडे परत लावून देऊन मोतद्दारास घोडे भिडविण्याची आज्ञा केली. घोड्यांसहि पंधरा वीस दिवस मजल नसल्यामुळें हुशारी आली होती. ही गडबड चालली आहे तों मीनकेतन जागृत झाला. पांच वाजण्याचा सुमार झालासें पाहून आपल्या नोकरास श्रीधररावास सूचना देण्यास पाठविलें. कमलाक्ष व दुसरी कांहीं नगरवासी मंडळी मीनकेतन जाणार ह्मणून त्यास पोहोंचविण्यास आली होती. इतक्यांत श्रीधररावहि दाखल झाले. पूर्वदिशा तांबूस होऊन दिनकराचीं किरणें पडण्याचा सुमार होत आला, असें पाहून मीनकेतन उठला व पोशाख करून सर्व लोकांची रजा घेऊन मीनकेतन, गोपिनाथ व कमलाक्ष आपापल्या घोड्यावर बसले. त्यानंतर श्रीधर रावानें आपला घोडा आणवून त्यावर स्वार झाला

व मीनकेतना बरोबर निघाला. लष्कराची ही लहानशी स्वारी गांवां बाहेर आली. आतां कोठें जावें असा श्रीधररावास मीनकेतनानें प्रश्न केल्यावरून त्यानें सांगितलें कीं अमरपूर शहर येथून सुमारें दिडशें कोश लांब आहे. आमचें हें राज्य असें आहे कीं आजू बाजूंस तीनहि दिशांस पहाडी व अरण्यमय प्रदेश असून ज्या मार्गानें तुह्मी येथें आला तीच दिशा कायती खुली आहे व तिकडील मार्ग सुगम आहेत; परंतु तुह्मास नूतन प्रदेश पहाणें आहे व तुह्मा जवळ घोडे चांगले आहेत ह्मणून तुह्मी अमरपुरीचा मार्ग धरावा. जरी मार्ग नीट नाहीं तरी सात आठ दिवसांत तुह्मास ही मजल करण्यास हरकत नाहीं. आतां पर्जन्यवृष्टी कधीं होईल याचा नेम नाहीं तेव्हां या गोष्टीचा मात्र विचार करून जें करणें तें करा. मीनकेतन गोपिनाथास ह्मणाला, मित्रा, तुझा कसा काय विचार? गोपिनाथानें उत्तर केलें, आपलें येथें कांहीं घर नाहीं, जिकडे गेलों तो देश आपणास नवाच. तशांत अभ्राच्या चिन्हांवरून पर्जन्य ह्मणजे आठ दहा दिवसांत पडेल असें दिसत नाहीं. अमरपुरीचें अंतर फार आहे असेंहि नाहीं. तिहींपैकीं कोणत्याहि दिशेस गेलों तरी मार्गाची अडचण आहेच व ती ह्मणजे हल्लींच्या स्थितींत विशेष लक्षांत आणण्याजोगी आहे असें नाहीं. मला वाटतें अमरपुरीसच जावें, परंतु तुझें काय मत पडेल तें खरें. मीनकेतनास गोपिनाथाचें बोलणें पटून तुझ्या ह्मणण्यास माझा रुकार आहे असें त्यानें सांगितलें. इतकें भाषण होत आहे तों काञ्चनपुरापासून सुमारें दीडशें कोश लांब आले. नंतर मीनकेतनानें कमलाक्षास व श्रीधररावास ह्मटलें,

प्रियमित्रांनों, आतां आह्मा बरोबर तुह्मी किती लांब येंणार? मागें फिरा, उगाच श्रम घेऊं नका; तुह्मी बरेच लांब आलां. असें ह्मटल्यावर कमलाक्षानें व श्रीधररावानें या उभयतांची रजा घेऊन पुढें मार्ग चांगला नाहीं, नीट जपून प्रवास करा, ह्मणून सांगून मागें परतले. मीनकेतन व गोपिनाथ पुढें चालते झाले.

वसंत ऋतूंत वृक्षांस नवे पल्लव फुटतात, व पर्जन्य वृष्टीचे सुमारास वृक्षपत्रें हिरवींगार दिसतात. या वेळेस वनश्री फारच रमणीय दिसते. वृक्षांचे नूतन हिरवे पल्लव, उष्णकाळचे दिवसांत दोनप्रहरीं पडलेली शीतळ दाट छाया प्रवासी जनांस फार तुष्टिकारक होय. अशासमयीं हे वरील दोन प्रवासी फिरत फिरत एका दाट झाडींत आले. सुदैवानें तेथें स्वच्छ शीतळ ताज्या पाण्याचा एक झरा होता त्यांतील पाणी पिऊन, आकाश ढगांनीं अगदीं भरून गेलें असल्यामुळें उष्मा फार करीत होता ह्मणून त्याच्या निवारणार्थ आंगांतील घर्मस्त्रावानें भिजलेले कपडे काढून ठेवून गोपिनाथानें घोड्यांस पाण्यानें धूवून त्यांस स्वच्छ पाणी पाजिलें, व एका झाडाशीं बांधून ठेवून मीनकेतनासह आराम करिता झाला. दिवस किंचित् खालीं झाल्यावर ते उभयतां उठले व पुन: घोड्यांवर स्वार होऊन मार्ग क्रमूं लागले. जसजसे ते पुढें जाऊं लागले तसतसा त्यांस अधिक बिकट रस्ता लागत चालला. तो प्रांत बहुतेक दाट जंगलाचा व पहाडी असल्यामुळें सुगम मार्ग मिळेना. वाटेंत दाट रानें कीं ज्यांमध्यें प्रातःकाला पासून सायंकाळ पर्यंत बसलें असतां सूर्यकिरण दृष्टीस पडणार नाहीं अशीं जागोजाग लागूं

लागलीं. मार्ग तर डोंगरांतून फार अडचणीचा, असे असतांहि सायंकाळचे सुमारास ते एका खेड्यावर दाखल झाले. तेथें तपास करितां 'पुढें थेरोच मजल पर्यंत गांव नाहीं असें कळल्यावर ह्या अज्ञात उग्र हिंसक श्वापदांची जेथें भीति फार अशा रानटी डोंगराळ प्रदेशांतून रात्रीं जाणें कठीण, तशांत विद्युलता चमकून किंचित् पर्जन्याचे तुषारहि पडत आहेत न जाणों पुढें मार्गांत पर्जन्य वृष्टी झाल्यास रात्रीं जावें कोणीकडे, रहावें कोठें, डोंगरांतून मार्ग दिसणार कसा, अशा पुढें येणाऱ्या अनेक अडचणी मनांत आणून रात्रीची रात्र तेथें काढण्याचा निश्चय केला. गांवाचे वेशीजवळ जातात तों एक दोन गांवकरी कुणबी त्यांस भेटले. त्यांस या गांवांत कोण लोक रहातात ह्मणून प्रश्न केल्यावर, दादा, एथें आमचे कुळकर्णी रामराव ह्मणून आहेत तेथें तुमची सोय होईल. बाकीची सर्व घरें कुणब्यांची असून तुह्मास रहाण्यालायक नाहींत. रामरावाचें घर हें बघा तोंडाशींच आहे असें ह्मणून ते कुणबी आपल्या कामास चालते झाले. गोपिनाथ ह्मणाला मित्रा, प्रवास ठीक आहेना? अद्यापि कांहींच नाहीं. नुकता सुरू झाला आहे असें ह्मटलें तरी चालेल. तुला अद्यापि ह्या लोकांशी कसें वागावें तें माहीत नाहीं ह्याकरितां मी पुढें होऊन नीट जुळवितों. तूं माझे मागें ये ह्मणजे झालें. असें ह्मणून गोपिनाथ पुढें झाला व मीनकेतन त्याचे मागें चालला. गांवांत शिरतांच प्रथम रामरावाचें घर लागलें. पहातो तों एक वयस्क गृहस्थ ओटीवर बसला आहे, मुलें सभोंवती खेळत आहेत त्यावरून हेच ते गृहस्थ असावेत असा गोपिनाथानें तर्क केला. रामराव आज हे परके गृहस्थ या

ावांत कोणीकडून आले व या समयीं यांस कशाची जरूर आहे, दिसण्यांत थोर दिसत आहेत असें अनुमान करून ओटीवरून खालीं आले, व त्यास संबोधून ह्मणाले, मुलानों तुह्मी कोठील, इतक्या वेळीं येथें कशाकरितां आलां, व पुढें कोठें जावयाचें असा प्रश्न केला. गोपिनाथानें तें ऐकून उत्तर केलें महाराज आह्मीं सर्व दिवसाचे श्रमलेले आहों, आजची रात्र आपल्याकडे राहण्याची सोय होईल तर आमचेवर आपले अनंत उपकार होतील; मग आमचें सर्व वृत्त आपणांस कळवूं. रामरावानें तें ऐकून ह्मटलें, मुलांनों, कांहीं संकोच न धरितां खुशाल रहा. घर तुमचें आहे, असें ह्मणून आपल्या हणमंता नांवाच्या चाकरास हाक मारून मीनकेतन व गोपिनाथ यांचे घोडे मागील सोप्यांत नेऊन बांधून त्यांची दाणापाण्याची व्यवस्था ठेवा ह्मणून सांगितलें. मीनकेतन व गोपिनाथ यांनीं रामरावाचे ओटीवर आल्यानंतर आपले पोशाख काढिले व पाय धुऊन कांहीं वेळ स्वस्थ बसल्यानंतर रामरावानें सूचना केल्यावरून गोपिनाथानें आपला प्रवास करण्याविषयींचा हेतु इत्थंभूत निवेदन केला. तें ऐकून रामराव ह्मणाला, मुलानों, तुह्मांस वेड तर लागलें नाहींना? आतां वर्षाकालास नुकता आरंभ झाला आहे. ह्या दिवसांत कोणी कसाहि प्राणी असला तरी तो निवाऱ्याचे जागीं राहून सुखांत किंवा दुःखांत आपले दिवस घालवितो. अशा ह्या दिवसांत आपलीं मातापितरें सोडून देऊन दूरदेशीं जाण्याचा विचार तुमच्या मनांत कसा संचरला व त्या मातापितरांस तरी काय ह्मणावें कीं, ज्यांनीं तुह्मास सुकुमार वयांत व अशा दिवसांत तुमच्या उद्देशास रुकार दिला. बरें, प्रवास करणें

तो तरी चांगल्या प्रदेशांत करावयाचा होता कीं नाहीं? मुलानों, माझें हल्लीं म्हातारपण झालें; इतक्या माझ्या वयांत तुम्हासारखे प्रवासी फारच थोडे आढळले. इकडे बहुधा भिल्ल, कोळी, ठग, वगैरे लोकांची वस्ती आहे. तुम्हासारख्या थोर लोकांस अशा जंगली व पहाडी प्रदेशांतून प्रवास करण्याची मोठी भीति आहे. तुमच्या मर्जीपुढें मला कांहीं बोलण्याचें नाहीं. माझ्या पिकल्या केसांच्या मानानें तुम्हांस सदुपदेश करण्यास मला अधिकार पोहोंचतो, म्हणून स्वस्थानीं परत जा, असें मी तुम्हांस सांगितलें. इतक्यांत घरांतून भोजनाची सूचना झाल्यावर रामराव म्हणाले, मुलानों, चला तुम्हांस मार्गश्रम फार झाले आहेत, किंचित् उपहार केल्यानें तुम्हांस अमळ बरें वाटेल व आराम करण्यासही ठीक पडेल. गरीब स्थितीमुळें तुमच्या पाहुणचाराच्या ज्या सोई मी तुम्हास समर्पण करीन त्यांचा तुम्ही आदरानें स्विकार केला म्हणजे मी आपणास धन्य मानीन. नंतर ते सर्व उठून आंत भोजनास गेले. भोजन करीत असतांना उभयतांनीं घराच्या भिंतीकडे पाहिलें तों शिकारीचीं पुष्कळ हत्यारें भिंतीच्या खुंट्यांस लटकलीं आहेत; त्यावरून हें वीरपुरुषाचें धाम असून पुढच्या मार्गाविषयीं जी सूचना केली ती अगदीं खरी आहे असें त्यांस समजून आलें. त्यांच्या निजण्याबसण्याची रामरावानें सोय करण्यास सांगितली होतीच. भोजनानंतर विडा पानसुपारी वगैरे झाल्यावर रामरावानें उभयतांस पुसिलें, मुलानों, तुमच्या जाण्याचें काय ठरलें? तेव्हां गोपिनाथानें मीनकेतनाचा कल पाहून उदईक प्रातःकाळीं पुढें जाण्याचा निश्चय केला आहे म्हणून सांगितलें. बरें तर मग आतां स्वस्थ आराम

करा, ह्मणून सांगून, घरच्या दोन नोकरांस त्यांची पादसेवा करण्याविषयीं आज्ञा करून, रामराव निजण्याकरितां आंत गेले. हे उभयतांहि बिछान्यावर झोंपीं जाण्याकरितां पडले पण दुसरे दिवसाचे काळजीमुळें झोंप कशी येणार? गोपिनाथ ह्मणतो, गड्या पुढें मार्ग तर बिकट व धोक्याचा लागणार, आपण उभयतां तर निःशस्त्र आहों, प्रसंग पडलाच तर मग आपला बचाव कशानें करणार? तशांत आपण येथें दाखल झाल्यापासून पर्जन्यवृष्टी तर एकसारखी चालली आहे, विजा कडकडत आहेत व चंडवातानें झाडें उन्मळून पडत आहेत त्यांचा भयंकर ध्वनी क्षणोक्षणीं आपल्या कानीं येत आहे. ह्या सर्व चिन्हांवरून ही वेळा किती भयंकर दिसत्ये पहा? असाच प्रकार उद्यांहि असला तर मग वाटेंत आपली काय दशा होईल कोण जाणे! हें गोपिनाथाचें बोलणें ऐकून मीनकेतन ह्मणतो, शाबास मित्रा, तुझ्यावर तर आमची सर्व भिस्त. असें जर तूं माझे हातपाय गाळशिल तर मग मी काय करावें? एक तर मला अनुभव नाहीं तेव्हां भलतीसलती भीति माझे मनांत उपजवून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं; व दुसरें असें कीं येथें तरी राहून काय उपयोग! आपणास कां घरेंदारें नाहींत तर परक्याकडे रहावयाचें. आतां पर्जन्य काल सुरू झाला. दिवसेंदिवस वारा, तुफान, पाऊस, हे अधिकाधिक होत जाणार. मग येथें किती दिवस रहावयाचें बरें? मागें जाण्याविषयीं तर आतां वार्ता देखील नको; कारण आरंभशूरपणाचा मला मनापासून कंटाळा आहे. उद्ईक सुप्रभातीं पुढें मार्ग क्रमावा असा माझा तर निश्चय ठरला आहे. मग तुझ्या विचारास काय येतें तें

ऐकूं दे कसें ? हें ऐकून गोपिनाथ ह्मणाला, मित्रा, मजक-
डून विलकूल हरकत नाहीं; फक्त तुझे करितां मी आपला
पाय मागें खोंचीत होतों. तुझी 'तयारी पाहून तर मला
दुप्पट हुशारी आली आहे. तर नित्या प्रमाणें प्रातःकालीं
येथून पुढें प्रयाण करावें असें तुज प्रमाणें माझ्याहि मनांत
आलें आहे. आतां स्वस्थ विश्रांती घेऊं या असें ह्मणून
ते स्तब्ध राहिले तों रामराव याचा एक नोकर आज्ञे प्र-
माणें पादसेवा करण्यास आला व ह्मणाला 'तात्यांनीं
सांगितल्या प्रमाणें आपले हातपाय चेपण्यास मी आलों
आहें' तें ऐकून गोपिनाथानें उत्तर केलें कीं बाबारे तुझ्या
सेवेची आह्मास फारशी गरज नाहीं; आज तूं आमची नो-
करी करशिल पण उद्यां दुसऱ्या ठिकाणीं आह्मास कोण
मिळेल ? कोणत्याहि गोष्टींची सवय असणें बरोबर नाहीं.
तूं स्वस्थ आपल्या जागीं जा. अरे, पण आमच्या घो-
ड्यांस दाणापाणी वगैरेची कांहीं तजवीज झाली कां ? होय
महाराज सर्व ठीक आहे असें ह्मणून हणमंता गेल्यावर
मीनकेतन व गोपिनाथ स्वस्थ होत्साते शयन करिते झाले.
प्रातःकालीं रामराव उठले. मीनकेतन व गोपिनाथहि प्रा-
तर्विधि आटोपून पोशाख करून तयार झालेसें पाहून रा-
मरावानें हणमंतास त्यांचे घोडे तयार करण्यास सांगितलें.
सुदैवानें पहाटेपासून पर्जन्यवृष्टी कांहींशी कमी होऊन
सकाळचे सुमारास तर पाऊस अगदीं बंद झाला. हण-
मंतरावानें घोडे आंगण्यांत आणिल्यावर मीनकेतन व गो-
पिनाथ उभयतां रामरावाचा निरोप घेऊन चालते झाले.
रात्रीं पाऊस पुष्कळ पडल्यामुळें मार्गांतील प्रदेश जलमय
होऊन गेला होता व लहान लहान ओहोळ डोंगरांतून

वाहूं लागले होते. रामरावाचे गांवापासून सुमारें दोन कोश जमीन जाई तों पर्यंत नीट चालले होतें; परंतु पुढें रात्री प्रमाणेंच पर्जन्यवृष्टी सुरू झाली. तें पाहून मीनकेतन ह्मणाला, मित्रा, आजचा दिवस नीट दिसत नाहीं; कारण आपण मार्ग चालूं लागलों नाहीं तोंच हें विघ्न उत्पन्न झालें. अभ्रांचे चिन्हावरून मेघवृष्टी लवकर थांबेल असा रंग दिसत नाहीं व सर्व दिवस हें गाडें असेंच चालल्यास पल्ला कसा आपल्या हातीं येणार याची मला मोठी काळजी पडली आहे. मागील ठिकाणापासून नारायणगांव चरब वीस कोश लांब आहे. मध्यें मोठमोठीं रानें असून वस्तीस गांवहि नाहीं. नारायण गांवापर्यंत कशी तरी मजल काढलीच पाहिजे; परंतु पर्जन्यवृष्टी अशीच सतत चालली तर घोडे तरी कसे चालतील ? असो आतां ज्यास्त विचार करून उपयोगाचा नाहीं. चल गोपिनाथा, त्वरा कर. असें ह्मणून उभयतांनीं वेगानें घोडे चालविले. सुमारें अर्धकोश गेले नाहींत तों पाऊस फारच मोठा पडूं लागला. सरी अशा जोराच्या येत कीं त्या बाणा प्रमाणें त्यांस भासत; अरण्यांतील वृक्ष मोठ्या वाऱ्यामुळें कडकडून खालीं पडत अशी ही स्थिती पाहून ऊभयतांचीं मनें भयभीत झालीं. आंग गारठल्यामुळें कांपूं लागलें, व घोडेहि चालतनासे झाले. हें पाहून मीनकेतन ह्मणाला, मित्रा, क्षणभर एखाद्या झाडाखालीं थांबू चला; मग तेथें काय होणें असेल तें होईल. अशा वृष्टींत आपणास पुढें जाण्याची छाती होत नाहीं. हें मीनकेतनाचें बोलणें गोपिनाथास सयुक्तिक वाटून त्यानें आजू बाजूंस पाहिलें, तों एक सुंदर आम्रतरू जवळच दिसला. त्याच्या खालीं ते उभ-

यतां उभे राहिले. दोन प्रहराचे सुमारास पाऊस पडण्याचा अगदीं बंद झाला. अर्ध दिवस गेला तरी यांची मजल रामरावाचे गावांपासून दोहों पासून तिन कोशाचे आंतच होती. पाऊस अगदीं थांबलासें पाहून दोघांनीं फार वेगानें पुनः घोडे चालविले. अगदीं संध्याकाळ झाला तरी मार्ग चांगला नसल्यामुळें त्याना पंधरा कोशांपेक्षां जास्त मजल काढितां आली नाहीं. पाऊस रात्रीं आणखी पडणार अशीं चिन्हें दिसत होतीं. पुढें नारायणगांव पांच कोश लांब राहिलें.

चालतां चालतां रवि अस्ताचलाखालीं गेल्यामुळें आंधार पडला. मार्ग बरोबर दिसेनासा झाला. मजल तर अद्यापि सुमारें तीन कोश काढण्याची होती; ह्मणून होईल तितकी त्वरा करून उभयतांनीं आपले घोडे चालविले होते. मार्गांत राई लागली तींत शिरतांच अकस्मात " दिन " शब्द करून कांहीं लोकांनीं या ऊभयतांवर गर्दी केली. गोपिनाथास याचा काय अर्थ तें कळेना. मीनकेतन तर वेड्यासारखा त्या लोकांकडे पाहूं लागला तों कोणाचे हातांत तलवारी, कोणाचे हातांत बंदुकी, कोणाचे हातांत तिरकमाना आहेत. असें पाहिल्यावर गोपिनाथास ह्मणाला, मित्रा घात झाला, दगा आहे; रामराव ज्या चोरट्यांविषयीं आपणांस बोलत होते तेच लोक हे असावेत. यानीं तर आपणास गांठिलें आतां काय होईल तें कळत नाहीं. आपण निःशस्त्र पडलों. आपण जवळ असलेलें सर्व द्रव्य बुचाडून घेतलें तरी चिंता नाहीं परंतु जीव सुखी ठेवोत ह्मणजे झालें. इतकें ह्मणत आहेत तों त्यापैकीं एक मोठ्यानें ओरडून ह्मणाला, पहातां काय

हरामखोरांस घोड्यांवरून ओढून बळकट मार द्या ह्मणजे जवळ काय असेल तें आपल्या हवालीं करतील. इतकें करूनाहि नच कबूल आले तर मुसक्या बांधून चला बरोबर घेऊन, ह्मणजे, सुलक्षणी असल्यास, आपल्या मंडणगडावरील देवीस बळी द्यावयास उपयोगीं पडतील. मी बऱ्याच दिवसांपूर्वीं नर बळी देण्याचा देवीस नवस केला आहे; तो तरी फेडितां येईल. हें ऐकतांच ह्या उभयतांच्या अंत:करणांत भयाची धडकी भरली, व आपलीं शंभर वर्षें पूर्ण भरून परलोक वस्तीच्या मार्गास लागलों असें त्यांस खचित वाटलें. मीनकेतनाची मुद्रा म्लान झालेली पाहून गोपिनाथ ह्मणाला, मित्रा भिऊन काय उपयाग? धीर धर. ज्यानें या लोकांस प्रथम हुकूम केला तो कोणी तरी या टोळीचा मुख्य अधिकारी असावा. आपल्या जवळ जें सर्व असेल तें त्यांस देऊं ह्मणजे झालें. कदाचित् जिवावर बितण्याची वेळ आल्यास ह्या टोळीच्या नाईकाची कांहीं तरी समजूत घालून आपला बचाव करूं; तूं कांहीं काळजी करूं नको, स्वस्थ ऐस. याप्रमाणें मीनकेतनास तो धीर देत आहे तों या रामोशी लोकांनीं त्यांजवर एकच गर्दी केली. कोणी काठ्या मारूं लागले, कोणीं त्यांचे पाय धरून ओढूं लागले, हें पाहून गोपिनाथ त्यांस मोठ्या नम्रतेनें ह्मणाला, बाबारे, आह्मास कां मारितां? आह्मी काय तुमचा अपराध केला आहे? तुमचा काय हेतु आहे तो स्पष्टपणें सांगितल्याशिवाय आह्मास कसा समजेल? तुह्मी क्षणभर धीर धरून आमची समजूत घाला, मग जें करणें तें करा. तें नाईकानें ऐकिल्यावर लोकांस सांगितलें गड्यांनों, थांबा तर मग. ह्यांचें काय ह्मणणें आहे तें तर

ऐकूं. आणा ह्या दोघांस इकडे. हें ऐकतांच गोपिनाथ व मीनकेतन खालीं उतरले तों दोघे रामोशी आंगास झों-बून त्यांचे हात गच्च धरून नाईक याजपाशीं त्या उभयांस नेते झाले. रात्र झाल्यामुळें ह्या चोरऱ्यांनीं उजेडा करितां मशाला पेटविल्या होत्या. नाइकापाशीं गेल्यावर गोपि-नाथानें त्यास नम्रतेनें रामराम करून ह्मटलें, " नाईकसा-हेब, तुमचें काय ह्मणणें आहे तें समजूं द्या. " तें ऐकून रागानें नाईक ह्मणाला, काय तें तुला माहित नाहीं ? की करूं आतां माहित? ( तलवार परजतो ) गोपिनाथ भी-ऊन ह्मणाला, तुह्मांस आमच्या वित्ताशिवाय दुसऱ्या कशाची गरज आहे काय ? नाईक ह्मणाला तें कांहीं मला कळत नाहीं. प्रथम तुमच्या जवळ जें कांहीं असेल त्याचा लोभ न धरितां सर्व माझे स्वाधिन करा; मग पुढें काय करावयाचें तें पहातां येईल. हें ऐकतांच मीनकेतनानें सर्व जवाहिर, रोकड व आंगावरील सोन्याचे दागिने सर्व त्याचें पुढें ठेवून हात जोडून ह्मटलें, नाईक साहेब जें सर्व होतें तें हेंच. आतां एक पैसा देखील आमचे जवळ नाहीं. तें नाइकानें ऐकतांच आनंदभरित होऊन लोकांस हुकूम केला कीं यांचा झाडा घ्या, कांहीं मिळाल्यास काढून घे-ऊन यांचीं हीं वस्त्रें मोल्यवान आहेत तींहि स्वाधिन करून घ्या. त्याप्रमाणें लोकांनीं केल्यावर नाईकानें गोपिनाथास सांगितलें, तुमचे घोडे देखील आमचे हवालीं करून तुह्मी आपल्या वाटेनें जा. जर कां हें वर्तमान कोणास सांगि तलें तर मात्र तुमची धडगती राहणार नाहीं, असें पकें समजा. पुढील प्रदेश सुमारें पन्नास साठ कोश पर्यंत मा झेच ताब्यांत आहे. तुमची व्यवस्था मी अन्य तऱ्हेनें

लाविणार होतों; परंतु तुमची दीनवाणी मुद्रा पाहून, व तुह्मापासून आज जो मला लाभ झाला त्याचा विचार करून, तुमचें विपरीत करण्याचें माझे मनांत येत नाहीं. हे माझे उपकार लक्षांत ठेवा. जा आतां इच्छिल्या मार्गानें असें ह्मणून नाईकसाहेब द्रव्य आटोपण्याचे कामास लागले. या काळाचे जबड्यांतून आपण सुटलों हें आपलें पूर्व सुकृतच उभें राहिलें असें जाणून मीनकेतन व गोपिनाथ तडक पायींच आंधारांतून वाट चालते झाले. अगोदरच तो रानटी व डोंगराळ प्रदेश, तशांत नभ मेघांनीं व्याप्त असल्या कारणानें आंधार फारच पडला होता. मार्ग उंच सखल, जागजागीं कांटे टोंचत, ठेंचा लागून मार्गांत पडत, अशा प्रसंगीं पर्जन्यवृष्टी झाली; मग काय विचारावें? मीनकेतनास आपल्या घराची व माता पितरांची आठवण झाली व रडण्याचा हुंदका येऊन त्याचा गळा दाटला. हें पाहून गोपिनाथानें ह्मटलें, मित्रा, परदेश व प्रवास फार कठीण आहे असें मी जें तुला वारंवार ह्मणत होतों, त्याचा आज अनुभव घेतलास ना? आपल्या हातानेंच आपणावर हें विघ्न आणिलें त्याविषयीं वाईट वाटून काय उपयोग? आज कोठें प्रवासाच्या दुःखास आरंभ झाला आहे. अद्यापि पुढें काय काय बितेल तें कोणी सांगावें? रात्र बरीच झाली. येथें हिंसक प्राण्यांची फार भीति आहे, ह्मणून चल, आतां पाउल उचल. नारायणगांवीं रात्रीं पोहोंचलों तर ठीकच; नाहीं पेक्षां चांगलीशी निवाऱ्याची जागा पाहून वस्ती करूं. पर्जन्यवृष्टीहि वृद्धिंगत होत आहे, तेव्हां अर्ध मार्गांत जेथें सोय नाहीं तेथें थांबणें कांहीं उपयोगाचें नाहीं. गोपिनाथाचें हें भाषण ऐकून मीनकेतनास समाधान वाटलें

न कांहींशी हुशारी येऊन. तो गोपिनाथाबरोबर चालला. बोलत चालत भद्रवाहिनी नदीचे कांठीं आले. ती नदी मोठी असून पर्जन्यवृष्टी फार झाली असल्यामुळें तिला अतिशय पूर आला होता. तेथपासून नारायणगांव पुढें दोन कोश लांब राहिलें होतें. रात्र फार झाल्या कारणानें नदीचें अफाट भरलेलें पात्र अतिविशाल व फार भयंकर दिसे, त्यामुळें पलीकडे जाण्यास त्यांस धीर होईना. आतां रहावें कोठें, पर्जन्यवृष्टी पासून आपलें निवारण कसें करावें, सर्व दिवस पोटांत अन्न नसल्यामुळें आपली काय व्यवस्था होणार, या विवंचनेंत ते उभयतां निमग्न झाले. गोपिनाथ मीनकेतनास ह्मणाला, मित्रा, आतां मात्र उपाय हरला. आजूबाजूस कोठें तरी बसण्यास अथवा मिळाल्यास आराम करण्याजोगी जागा पाहूं चला. "होय चला तर मग कांहीं तरी सोय केली पाहिजे." असें ह्मणून गोपिनाथाबरोबर मीनकेतन मुकाट्यानें चालला. इकडे तिकडे पाहिलें तों एक वटवृक्ष जवळच असून त्या खालीं एक ओटा होता, त्यावर आंगावरील वस्त्रें आंथरून ते उभयतां पडले. प्रातःकालीं पुढें जाण्याच्या हेतूनें उठले; परंतु नदीस मोठा पूर आल्यामुळें, व पलीकडेस जाण्यास उतार नसल्यामुळें त्यांची कांहीं मति चालेना. तशांत, पोटांत अन्न नसल्यामुळें तर पुढें आपली व्यवस्था काय होईल ही काळजी मनांत उत्पन्न होऊन काय करावें तें त्यांस सुचेना. दोघेहि पोहण्याच्या कामांत निष्णात असल्यामुळें शेवटीं नदींत उड्या घालून पोहून जावें असा निर्णय ठरला. नदी प्रवाहाकडे पहात आहेत तों सुदैवानें दुरून एक मोठा वृक्ष पाण्याच्या धारेंत वाहून येत आहेसें पाहून मीनकेतन गोपि-

नाथास ह्मणाला, मित्रा, तो पहा. धारेंत एक वृक्ष वाहून जात आहे. आपल्या हाता पायांत तूर्त शक्ति नाहीं ह्मणून अशा पुरांत पात्र पोहून सुरक्षितपणें पलीकडे जाऊं असा भरंवसा वाटत नाहीं. तुझा रुकार असल्यास चल जलदी कर. मीनकेतना तुझा हा विचार नीट दिसत नाहीं तथापि आपल्या जवळ अन्न सामग्री कांहीं नसल्यामुळें एथें रहाण्याचा तरी कोणत्या आधारावर विचार करावा. चल तर मग, असें ह्मणून गोपिनाथ सिद्ध झाला. मीनकेतन तयारींत होताच. उभयतांनीं नदींत उड्या घातल्या व मोठ्या कष्टानें धारेंत वहात जात असलेल्या वृक्षास त्यांनीं धरिलें. पाण्याचा प्रवाह इतका वेगाचा होता कीं मीनकेतनाच्यानें वृक्ष धरून रहावेना. शेवटीं मीनकेतनाचा हात झाडाचे डहाळी पासून सुटला व तो तीव्र ओघांत वाहूं लागला; तें पाहून गोपिनाथाचे मनांत भयाची धडकी भरली. आतां मीनकेतनाची काय अवस्था होईल, रामपुरास गेल्यावर त्याचे माता पितरांनीं विचारिल्यास त्यांस काय सांगावें, आतां मात्र मीनकेतन आपणास खास अंतरला हे विचार मनांत येऊन त्यास फार दुःख झालें. तीव्र ओघांत वहात असल्यामुळें लवकरच मीनकेतन त्याजपासून इतका दुरावला कीं तो त्यास दिसेनासा झाला. गोपिनाथ वृक्षाच्या आधारानें वहात होताच. मीनकेतन सायंकाळ पर्यंत अशा स्थितींत असतां नदीचे मुखापाशीं वहात गेला. शक्ति नसल्यामुळें आतां ह्या दुर्घट प्रसंगांतून वांचणें कठीण असें जाणून निराश होऊन पाण्याच्या पृष्टभागावर मात्र राहून आपले जीव वांचवावे ह्मणून यत्न करूं लागला. दैवानें एक नौका त्याचे बाजूनें जात होती, तीवरील

नावाडी लोकांनीं ह्मास पाहून हा कोणी तरी वाटस
नदींत पडून वहात आला आहे, असा तर्क केला. इत
क्यांत मीनकेतनानें त्यांची दीनवाण्या स्वरानें विनवण
करून ह्मटलें, बाबानों, मी आज प्रातःकाळ पासून प
ण्यांत आहें; दोन दिवस अन्न कसें तें ठाऊक नाहीं, य
मुळें माझे प्राण कासाविस होत आहेत. मला या दुःख
तून मुक्त केल्यास तुमचे मजवर अनंत उपकार होती
वगैरे त्याचे शब्द ऐकून त्यांस फार दया आली व ल
गलीच त्वरा करून नौका त्याजवळ नेऊन त्यांनीं मीनके
तनास वर घेतलें. पाहिलें तों त्यास पुरती उभे रहाण्या
देखील शक्ति नव्हती. कांहीं वेळ स्वस्थ बसल्याव
मीनकेतन त्या खलाशांस ह्मणाला, बाबानों, प्रथम तुम
जवळ कांहीं खाण्याचा पदार्थ असल्यास मला द्या.
त्याचे शब्द ऐकून त्यांनीं त्यास थोडें खावयास दिलें
पाणी पिऊन अमळ हुशार झाल्या नंतर त्यानें गलबतावरी
तांडेलास पुसिलें, बाबानों, तुह्मी कोठें रहातां व हल्लीं
तुमचें गलबत कोणत्या ठिकाणीं जाणार, तें कृपा करू
मला कळवा. हें ऐकून तांडेल ह्मणाला, मुला, आह्मी
अमरपूरचे रहाणारे आहों; कांहीं माल तारवांत भरू
इकडे कामगिरी करितां आलों होतों. हल्लीं माल विकू
परत आपल्या गांवीं चाललों आहों. हें ऐकून त्या
समाधान वाटलें; कारण त्याचा व गोपिनाथाचा ह्मा
नगरींत जाण्याचा संकेत ठरला होता. आपण मृत्यूच्य
जबड्यांतून सुटून पार पडलों, हें पाहून त्यानें परमेश्वरा
आभार मानिले; परंतु पुनः गोपिनाथाविषयीं व मातापि
तरांविषयीं विचार मनांत येऊन त्यास अनावर दुःख झालें

आपली जन्मभूमिका येथून लांब राहिली, आता कधीं तरी मी त्या ठिकाणीं परत जाईन काय, मी आपले माता पितरांस पाहीन किंवा माझा निजध्यास धरून तीं प्राण देतील कोण जाणे; मित्रा गोपिनाथाची तरी काय अवस्था झाली असेल, वगैरे तरंग त्याचे मनांत वरचेवर उठत. अखेरीस आतां पोकळ विचार करून कांहीं उपयोग नाहीं, परमेश्वर माझीं मातापितरें व प्रियमित्र गोपिनाथ यांस सुखी ठेवो ह्मणजे झालें; अशी प्रार्थना करून अमरपुरी केव्हां येते ती वाट पहात स्वस्थ बसला.

वाचकहो, आतां गोपिनाथाकडे वळूं. मीनकेतना प्रमाणेंच दोन दिवसांचा उपोशित असल्यामुळें जरी पात्र लहान होतें, तरी वृक्षाधार सोडून पोहून पार जाण्याचा त्यास हिंय्या होईना; ह्मणून वृक्ष जसा वहात जाईल तसें जावें असा विचार करून अस्तमानपर्यंत वहात गेला. वृक्ष तिरास लागेना व सायंकाळ तर उलटून अंधार पडलासें पाहून मात्र आतां आपली धड गती नाहीं अशी गोपिनाथाची खातरी झाली. मध्यरात्रीचे सुमारास तो वृक्ष जमिनीस लागला तसा गोपिनाथ मोठ्या युक्तीनें वृक्षाच्या खांद्यावरून कडेस आला. जमिनीवर येतांच त्यास महदानंद होऊन सुरक्षितपणें आपण जमिनीस लागलों ह्मणून त्यानें परमेश्वराची प्रार्थना केली. रात्र झाल्यामुळें आतां जावें कोठें? ज्या ठिकाणीं येऊन पोहोंचलों त्याचें नांव काय वगैरे माहिती मिळेना, ह्मणून जवळ एक धर्मशाळा होती तींत जाऊन निजला. प्रातः काळीं उठून तपास करितां त्या शहरचें नांव मदनपूर आहे असें समजलें. शहर मोठें आहे, आतां पाहिजे तशी आपली सोय करितां

येईल, असें जाणून तो गावांत गेला. इकडे तिकडे फिरतां फिरतां रस्त्यांतून एक सरदार जात होता, त्यास पाहून मोठ्या नम्रतेनें त्यानें नमस्कार केला. तो त्याची वर्तन सरणी पाहून पूर्वी हा कोणी तरी थोर मनुष्य असावा, परंतु दैवगतीनें अशा स्थितींत पडला आहे, असें अनुमान केलें. मग त्यास विचारीलें, तूं कोण आहेस तें सांग. त्यावरून गोपिनाथ ह्मणाला, महाराज आज दोन तीन दिवसांचा मी उपोशित आहे; कृपा करून मला आजचा दिवस अन्नप्रसाद द्याल, तर मी आपला फार अभारी होईन. पोटांत अन्न नसल्यामुळें मला वारंवार मुर्च्छा येत्ये; असें ह्मणत आहे तों त्यास घेरी येऊन खालीं बसला. ही त्याची स्थिती पाहून विश्वासरावास फार वाईट वाटलें. हा विश्वासराव त्या नगरचा कोतवाल असून स्वभावानें फार सज्जन होता. त्यानें त्यास आपल्या घरीं आणिलें. स्नानास उन्हपाणी वगैरे देऊन आपल्या पंक्तीस त्यास घेऊन भोजन केलें. नंतर त्यास स्वच्छ वस्त्रें घालण्यास देऊन स्वस्थ झाल्यावर गोपिनाथास आपली हकीकत सांगण्याविषयीं विनंती केली. तेव्हां त्यानें आपली पूर्वींची स्थिती, मीनकेतनाशीं जडलेला स्नेह, व दुर्दैवानें झालेला त्याचा वियोग वगैरें बद्दल सर्व हकीकत सविस्तर सांगितली. ती ऐकून त्याचा कुलीन कुलांत जन्म व त्यावर आलेलीं अनेक दुःखें यांचें त्यास फार वाईट वाटलें. नंतर विश्वासराव ह्मणाला, गोपिनाथा, तुला हें घर परकें आहे असें नाहीं; तूं एथेंच मजपाशीं संकोच न धरितां स्वस्थ रहा, असें ह्मणून आपण कचेरींत निघून गेला. विश्वासराव गेल्यावर गोपिनाथानें

त्याच्या नोकर माणसाजवळ त्या नगरच्या राज्य व्यवस्थे विषयीं विचार पूस केली. तेव्हां ते ह्मणाले, आमचे धनी साहेब या नगरचे कोतवाल आहेत. कामांत हुशार दक्ष असल्या मुळें त्यांची राजदरबारांत फार चहा आहे. हें सर्व वर्तमान ऐकून गोपिनाथास फार आनंद झाला व ह्मणाला, परमेश्वर कृपेनें एथें स्नेही हि चांगला मिळाला. ह्याच्या अनुसंगानें राजदरबारांत आपणास कांहीं खटपट करितां येईल असा विचार करून खिडकींत स्वस्थ बसला. सायंकाळीं विश्वासराव घरीं आल्यावर गोपिनाथाजवळ गेला, तों विश्वासराव आले असें पाहून गोपिनाथ आदबीनें उठला. उभयतां बसल्या नंतर कांहीं दरबारच्या गोष्टी झाल्या. गोपिनाथानें उद्यां दरबारीं येण्याची आपली इच्छा आहे ह्मणून त्यास सांगितल्यावरून विश्वासराव ह्मणाले, बरें तर तुह्मीं मजबरोबरच या ह्मणजे ठीक पडेल, असें सांगितलें. दुसरे दिवशीं संकेता प्रमाणें गोपिनाथाची विद्वत्ता पाहून विश्वासरावाची त्याचे हुशारी बद्दल खातरी होतीच, व दरबारांत त्याचें वजनही चांगलें होतें ह्यामुळें सेनापतीचे हाताखालीं फौजेच्या कामावर गोपिनाथाची नेमणूक विश्वासरावानें करविली. ह्याप्रमाणें गोपिनाथ मदनपुरींत आपल्या नवीन हुद्यावर विराजमान होऊन स्वस्थ राहिला.

## भाग ४ था.

वाचकहो, आतां मीनकेतनाचे स्थितीचा विचार करूं. ज्या गलबतांत मीनकेतन बसला होता, तें, अमरपुरी बरीच लांब असून तुफान फार व वारा अगदीं प्रतिकूळ

असल्यामुळें दुसरे दिवशीं दोनप्रहराचे सुमारास अमरपुरीस लागलें. खालीं उतरल्यावर त्या नावाड्याचे फार आभार मानून तो गावांत शिरला. जवळ तर कांहीं अर्थ नसल्यामुळें खाण्यापिण्याची काय व्यवस्था होईल, ही त्यास मोठी विवंचना पडली. नगराचे मध्यभागीं एक शंकराचें देवालय होतें, व त्या देवालयाचे बाजूस धर्मशाळा होती, तेथें येऊन तपास करितां कळलें कीं, नगरांत राज्यानें एक अन्नछत्र अनाथ लोकां करितां घातलें आहे; तेथें कोणी केव्हांहि आला असतां भोजन मिळतें. असें समजतांच मीनकेतनानें स्नान करून आंगावरील वस्त्रें सुकविलीं व छत्राची वाट धरिली. छत्रांत आल्यावर भोजन झाल्या नंतर आतां रात्रीं कोणाकडे रहाण्याची सोय झाल्यास ठीक, नाहींपेक्षां धर्मशाळा पाहिलीच आहे; कांहीं हरकत येणार नाहीं. आतां नगराची व्यवस्था पहावी ह्मणून फिरतां फिरतां गांवा बाहेर आला. तेथें विष्णुमंदिर फार रमणीय बांधिलें असून राजाची स्वारी दरबाराचें काम आटोपल्यावर सायंकाळीं नित्य देवाचे दर्शनास जात असल्ये, असें समजलें. तेव्हां सहजच देवदर्शन व राजदर्शन होईल हा विचार मनांत आणून मीनकेतन मंदिरांत शिरला. श्रीविष्णूचें दर्शन घेतल्यानंतर बाहेर येऊन लोकांस बसण्याकारितां मोठमोठे धक्के बांधिले होते, त्या पैकीं एकावर स्वस्थ बसला. इतक्यांत एक वृद्ध ब्राह्मण तेथें आला. तो मंदिरांत जाऊन देवदर्शन घेतल्यानंतर बाहेर येऊन मीनकेतनाचे बाजूस बसला. कांहींवेळ मीनकेतनाकडे पाहून तो ह्मणाला, मुला, तूं कोण, कोठील, ह्या अमरपुरींत तुला मी कधींच पूर्वीं पाहिलें नाहीं. मी-

नकेतन हात जोडून ह्मणाला, तात, आपण ह्मणतां ही गोष्ट अगदीं सत्य आहे. आजच दोनप्रहरीं ह्या शहरांत येऊन दाखल झालों. हें ऐकून त्या वृद्धब्राह्मणानें पुनः विचारिलें, तुझें नांव गांव काय, व तूं काय उद्देशानें ह्या स्थळीं आलास? मीनकेतनानें हें त्याचें बोलणें ऐकून मोठ्या नम्रतेनें आपलें नांव गांव, घर सोडण्याचा उद्देश मध्यंतरीं आलेले दुर्घट प्रसंग वगैरे बद्दल सर्व हकीकत थोड्यांत परंतु व्यक्तपणें त्यास निवेदन केली. ती ऐकून सोमदत्त (वृद्ध ब्राह्मणाचें नांव) ह्मणाला, बाळा, बाल्य जाऊन तारुण्याची छाया नुकतीशी तुजवर पडत आहे, अशा ह्या वयांत हें दुर्घट कृत्य करण्यास तूं कसा प्रवृत्त झालास, व तुझ्या मातापितरांनीं तरीं हें तुला स्वीकृत करण्यास कसें अनुमोदन दिलें? तुझी ही सर्व हकीकत ऐकून मला फार वाईट वाटतें. तुझी एथें कोणाची ओळख आहे कां? मीनकेतनानें उत्तर केलें, आर्य, माझ्या परिचयाचें एथें कोणी नसल्यामुळें रहाण्याची मोठी पंचाईत आहे. हें ऐकून सोमदत्तानें कांहीं वेळ विचार करून ह्मटलें, बाळा, मी ह्या नगरींत रहाणारा एक गरीब निर्धन ब्राह्मण आहे. पोटीं संतान नाहीं ह्यामुळें सर्व जन्म आह्मी दुःखांत काढिला. तुला पाहिल्यापासून पुत्राप्रमाणें तुजविषयीं माझे मनांत मोह उत्पन्न झाला आहे; मर्जी असल्यास चल मज बरोबर. मी तुला धर्मपुत्र समजेन, तुला वाटेल तितके दिवस मजकडे रहा; पुढें जाणे असल्यास मी तुला कांहीं हरकत करणार नाहीं. हे सोमदत्ताचें भाषण ऐकून मीनकेतन ह्मणाला, बाबा, तुमची आज्ञा मला शिरसा वंद्य आहे. चला तर आपल्या घरीं

जाऊं; असें ह्मणून सोमदत्ताबरोबर मीनकेतन त्याचे घरीं गेला. सोमदत्तानें घरीं जातांच झालेंलें वर्तमान आपली भार्या व सुमती हीस सांगितलें; तें ऐकून तिलाहि फार आनंद झाला. मीनकेतनाची विद्वत्ता, हुशारी, सौजन्य पाहून त्याजवर सोमदत्ताचें प्रेम फारच बसलें. हा सोमदत्त अमरपुरींतील पाढिक ब्राह्मणांत प्रमुख असल्यामुळें गावांतील संभावित लोक ह्याजकडे बसण्यास पुष्कळ येत; त्यांच्या अवलोकनांत मीनकेतनाचे सद्गुण दिवसें दिवस येऊं लागले. मीनकेतनास अमरपुरींत येऊन एक महिना झाला नाहीं तों निरनिराळ्या विषयांवर त्यानें पुष्कळ चित्तवेधक व्याख्यानें दिलीं; ह्यामुळें त्याच्या सद्गुणाची चर्चा गांवभर जिकडे तिकडे होऊं लागली. राजमंडळांतहि त्याचें पाऊल पडून कित्येक तर त्याचे स्नेही बनले, व बहूतेक सर्व त्याच्या दाट परिचयाचे झाले. तेथील प्रधान "धनंजय" ह्याचे मनावर मीनकेतनाचे सद्गुणांचा व शहाणपणाचा असा कांहीं ग्रह झाला कीं, अडचणीच्या राज्य प्रकरणांत तो मीनकेतनाचा विचार घेतल्यावांचून कोणतीहि गोष्ट करीत नसे. नेहमीं त्याचें जाणें प्रधानाकडे होत असल्यामुळें त्याचा मुलगा उमाकांत याचा व मीनकेतनाचा फार स्नेह जमला; तो असा कीं, एकमेकावांचून त्यांस एक क्षणभराहि करमत नसे. सुदैवानें तेथील मुख्य न्यायाधिकाऱ्याची जागा खालीं झाली; तेव्हां धनंजयानें संधी साधून ती जागा मीनकेतनास देवविली. तो कारभार मीनकेतन दक्षतेनें व निस्पृहतेनें चालवीत आहे असें पाहून धनंजयाचें मीनकेतनावर पुत्रापेक्षांहि अधिक प्रेम बसलें. मीनकेतन अशा योग्यतेस चढला व त्याचे लौकिक सद्गुण पाहून आबाल

वृद्ध त्यास माना डोलवूं लागले, हें पाहून सोमदत्ताचा आनंद गगनीं मावेना. इतक्या मोठ्या पदास जरी मीन-केतन चढला होता, तरी गोपिनाथाविषयीं त्याचा स्नेह-भाव व पूज्यबुद्धि नष्ट झाली नव्हती. त्याची नेहमीं त्यास आठवण होऊन तो वारंवार दुःख करी, व होतील तितके उपाय त्याचा तपास लाविण्याकरितां चालविले होते, परंतु ते सर्व निष्फल झाले. ह्याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यानंतर एके दिवशीं मीनकेतन व प्रधान पुत्र उमाकांत हे उभ-यतां सहल करण्याकरितां गेले. इकडच्या तिकडच्या गोष्टी निघतां निघतां उमाकांत ह्मणाला, मित्रा, येथून अजमासें तीस कोशांवर हेमनगरी ह्या नांवाचें शहर आहे, तेथें गांवाबाहेर श्रीचंडिकेचें एक देवालय आहे. त्या ठि-काणीं दरसाल जत्रा फारच पहाण्यासारखी भरत असत्ये. तुझ्या विचारास येत असल्यास मीं बाबांस सांगून आपला तेथें जाण्याचा बेत कायम करवितों. अद्यापि तीन दिवस अवकाश आहे, तितका वेळ तयारीस व वाट चालीस नरूर पाहिजे. जत्रा पांच दिवस रहाते. कसा काय तुझा विचार ? मीनकेतनानें त्याच्या बोलण्यास रुकार दिल्याव-रून उमाकांत दुसरे दिवसापासून तयारीस लागला. मीन-केतनानें प्रधानापाशीं रजा विचारून उमाकांतासह निय-मित वेळीं चालता झाला. ते जत्रेच्या दिवशीं प्रातःकाळीं हेमनगरींत दाखल झाले. सायंकाळचे सुमारास ते उभ-यतां देवालयांत देवीचे दर्शनाकरितां गेले. तें देवालय मनोवेधक संगमरवरी दगडाचें बांधिलें असून त्या सभोंवतीं फारच रमणीय व विस्तीर्ण असा बाग बनविला होता बाहेरील बाजूस दुतर्फा लांबवर दुकानाच्या ओळी ला-

गल्या होत्या. श्रीचंडिकेचें दर्शन घेण्याकारितां लोकांची अशी कांहीं गर्दी झाली होती कीं देवालयांत रिघाव होणें फारच कठीण. मोठ्या प्रयासानें आंत शिरल्यावर देवीचें दर्शन घेऊन ते बाहेर आले. श्रम केल्यामुळें घर्मस्राव होऊन त्यांचीं वस्त्रें भिजून चिंब झालीं ह्मणून ते बाहेरील उद्यानांत एका चौतऱ्यावर बसले. त्याचे सभोंवतीं सुंदर बकुल वृक्ष लाविले असून सायंकाळची वेळा होत असल्यामुळें शीतल मंद वायु वहात होता. अशा समयीं उमाकांतासह मीनकेतन जत्रेची व शौकिमासगीर वगैरे लोकांची मौज पहात आहे इतक्यांत एक सित्रिका मोठ्या जलदीनें देवळाकडे गेली. पुढें मागें स्वार, व राज सेवक दासीगण असल्यामुळें त्या नगराची राणी देवीच्या दर्शनास आली असावी असा प्रथम त्यांचा समज झाला; परंतु तपास करितां शंखचूड याची कन्या नवमालिका श्रीचंडिकेच्या दर्शनास आली असें मागाहून समजलें. तिच्या सख्याहि तिचे मागोमाग त्या स्थलीं येऊन थडकल्या. त्या सर्व दर्शन घेऊन बाहेर आल्या, व क्षणभर उपवन शोभा पाहून नंतर आपापल्या स्थानीं परत जाऊं, असा त्यांचा संकेत ठरल्यामुळें त्या बागेकडे वळल्या. इकडे तिकडे कांहीं वेळ फिरल्यानंतर मीनकेतन व उमाकांत ज्या चौतऱ्यावर बसले होते तिकडे त्या फिरल्या, तों हे दोघे पुरुष तेथें बसले आहेत असें त्यांस दिसून आलें. नवमालिकेनें किंचित् न्याहाळून पाहिलें तों मीनकेतनाच्या व तिच्या दृष्टीचें ऐक्य झालें. परस्परांचें स्वरूप पाहून किती तरी हीं परमेश्वराची अनुपम देणगी असें परस्परांस वाटूं लागलें. मीनकेतनाचें अद्वि-

तीय स्वरूप व तारुण्य पाहून नवमालिका फारच मोहित झाली. ज्याचें स्वरूप व सौजन्य पाहून आपण इतके चकित झालों तो हा कोण बरें असावा, अशा शंका येऊन तिला कांहीं सुचेनासें झालें. मीनकेतनाचीहि स्थिति तशीच झाली. हें उमाकांतानें पाहून मीनकेतनास ह्मटलें, कां मीनकेतना, चित्तवृत्तींत फारशी गलबल दिसत्ये ! आपण न्यायाचें काम करितां, व नयच्युत जनास अपराधी ठरवून शासन करिता; असें असून आज स्वतःच अन्याय करण्यास प्रवृत्त होता हें कसें ? परस्त्री अभिलाश करणें युक्त असें कोणत्या कायद्यांत अथवा शास्त्रांत सांगितलें आहे ? मीनकेतन ह्मणाला, मीत्रा तसें नाहीं. मी सहज पाहिलें, त्यांत अपराध तो काय केला ? पाहण्याचें काम नेत्रांनींच करण्याचें आहे; इंद्रियांचें काम इंद्रियानें केलें त्यांत अभिलाश कसा होतो ? तुझ्या बोलण्याचा अर्थ मला बरोबर समजत नाहीं. अशी उभयतांची स्थिति झाली. नवमालीकेच्या बरोबर दासी चतुरिका होती, तिनें हें सर्व पाहून नवमालिकेस ह्मटलें, बाईसाहेब, अशी जत्रा मी कधीं पाहिली नाहीं. हिचा देखावा इतका रमणीय दिसतो कीं येथून जावेंसें वाटत नाहीं.

नवमालिका म्हणाली खरेंच; मलाहि मोठी मौज वाटते? पण बाईसाहेब, हा चौतरा फार सुंदर दिसतो नाहीं बरें. चतुरिके, गतवर्षीं जसा तो दिसत होता, तसाच हल्लींहि आहे. त्यांत कांहीं जास्त नाहीं; मग त्याचें तें तुला इतकें नवल कशाचें वाटलें? चतुरिका ह्मणाली, बाई साहेब, त्यांत कांहीं नूतन नाहीं खरें, पण त्यावर कांहीं नूतन आहे असें वाटतें; असें ह्मणून ती हसूं लागली. हें नव-

ठाणे.

मालिकेनें पाहून हिनें आपलें हृदय पूर्ण आपिलें व श्ले: शब्दांनीं तें व्यक्त केलें असें पाहून ... म्हणाली, चतुरिं आधीं तुला थोडीच थट्टा करायला पाहिजे, तशांत म होऊन चौतऱ्याविषयीं ह्मटलें त्यावरून तर तुझ्या बोल ण्यास दुप्पट जोर आला; नाहीं बरें ? हें ऐकून चतुरिक ह्मणाली, बाई साहेब, पुरे आतां, आपणापेक्षां ह्या चतु रिकेस कांहीं पावसाळे तरी जास्त असतील. तेव्हां आ पल्या ह्या उडवाउडवीच्या बोलण्यानें मी कुठून ऐकणार विचार करा, कीं सूर्यास वस्त्रानें झांकण्याचा प्रयत्न के- ल्यास तो कधीं तरी झांकला जाईल काय ? त्याप्रमाणे आपला रोख सर्व माझ्या ध्यानांत आला, व असें होणें आपल्या वर्तमान स्थितीच्या मानानें अगदीं साहजिक आहे. हें ऐकून ती चतुरिकेस ह्मणाली, बाई चतुरिके आतां कांहीं लपविण्यांत अर्थ. नाहीं ह्मणून तुला सांगत्यें. ( तिला एकीकडे काढून ) ह्या समोरच्या चौतऱ्यावर जे दोघे पुरूष आहेत त्यांपैकीं काळा जरीचा पटका डोक्यास असलेली मूर्ति पाहिलीसना ? हा गृहस्थ ह्या नगरीपैकीं न- सावा असा माझा ग्रह होतो; कारण त्याच्या आंगा- वरील वस्त्रें साधीं, मुशाफरी बाण्याचीं आहेत, त्यावरून तो अन्यस्थलाहून ऐथें जत्रेकरितां आला असावा असें मला वाटतें. काय त्याचें तें स्वरूप व त्याची मुद्रा किती मनोहर व गंभीर दिसत्ये ! त्याचें सौजन्य व सद्गुणाची ठेवण माझे मनांत अल्प कालांत फारच ठसून गेली. च- तुरिके, ही मदनमूर्ति माझे दृष्टीस पडल्यापासून माझें मोठें विलक्षण प्रेम ह्याचे ठायीं बसलें आहे; इतकेंच नाहीं, तर कामदेवानेंहि आपले कुसुमयुक्त बाण मजवर

सोडून माझें अंतःकरण केवळ विदारून टाकिलें आहे असें मला वाटतें. ह्या ठिकाणीं माझे नेत्र इतके लग्न झाले आहेत कीं त्यांस अन्य वस्तु अवगत होत नाहीं, प्रायः हें स्थल सोडून जावें असें देखील माझ्या मनांत येत नाहीं. चतुरिके, हा कोठील, कोण, वगैरे बद्दल बारिक तपास कोणा चौकस मनुष्यास करण्यास सांगशील तर तुझे उपकार मी जन्मभर देखील विसरणार नाहीं व फिटतील त्या मार्गानें फेडीन, असें ह्मणून नवमालिका म्लान वदन होऊन मीनकेतनाकडे पहात बसली.

ह्याप्रमाणें तिची स्थिति पाहून चतुरिका ह्मणाली, बाईसाहेब, कोणतीहि गोष्ट अविचारानें करणें, व मागाहून ती केल्याबद्दल पश्चात्ताप करीत बसणें सर्वथा गर्ह्य आहे. कमळ धीर धरा, अशा कामांत कोते विचार अगदीं उपयोगाचे नाहींत. दिसण्यांतच वस्तु सुबक दिसल्यानें ती चांगली आहे असें ह्मणतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें घर्षण, छेदन, ताप व ताडन इहीं करून सुवर्णाची परीक्षा करितात, त्याप्रमाणें दातृत्व, स्वभाव, गुण, व कर्म ह्यांवरून पुरुषाची परीक्षा होते. बाईसाहेब, विवाहित होतांना इच्छित वरप्राप्ती झाली ह्मणजे ती सुखी झाली असें ह्मणतां येत नाहीं. आपण शहाण्या आहांत; किंचित् विचार करून मग काय करणें तें करा ह्मणजे झालें. हें तिचें भाषण ऐकून नवमालिका ह्मणाली चतुरिके, तूं जें सांगितलेंस तें अक्षरशः खरें आहे; पण माझें मन अपात्रीं आसक्त होईल असें तुला वाटतें काय? मनुष्याची परीक्षा त्यास पाहिल्यावरून होते; ह्या गोष्टीस ह्मणजे उभयतांचा निकट संबंध असला पाहिजे असें नाहीं.

माझी परीक्षा यथार्थ आहे, किंवा नाहीं ह्याचा अनु
परमेश्वरकृपा झाल्यास कळून येईल.

मीनकेतनाचीहि ह्याचप्रमाणें स्थिति झाली होती. न
मालिका दृष्टीस पडल्यापासून तिची अनुपम मूर्ति ह्य
नजरेआड होईना. ती चैतन्यापासून जवळच उभी अ
त्यामुळें तिचे सर्व अवयव त्यानें निरखून पाहिले, त्य
अणुमात्र दोष लावण्याजोगा एकही नव्हता, असें पाह
तो जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृतीची तारीफ करूं लागल
तो मनांत ह्मणाला, असें हें स्त्रीरत्न कोणत्या दैवशा
प्राण्याकरितां विधात्यानें निर्माण केलें तें कळत नाहीं. ि
च्या अवयवांत किंचित् दोष सांपडेल ह्मणून केव्हांपासू
मी प्रयत्न करीत आहें, पण ते सर्व माझे प्रयत्न निर्फ
होतात असें पाहून मला मोठें नवल वाटतें. माझी अ
खात्री आहे कीं, असें हें चित्तवेधक व निर्दोष शरीर स्वत
च परमेश्वरानें अपार श्रम घेऊन बनविलें असेल. असं
अशा रत्नाची प्राप्ती होणें आपल्या दैवीं कोठून असण
व निरर्थक लाळ घोंटून तरी काय उपयोग? अशा विच
रांत अगदीं गढून गेल्यामुळें आपण आहों कोठें व करि
काय ह्याची स्मृती त्यास राहिली नाहीं. ही मीनकेतनाच
स्थिति उमाकांताचे लक्षांत तात्काळ आली. तो ह्मणाल
मीनकेतना, मी तुझें मन जाणिलें. आतां वेळ बराच झाल
अद्यापि आपला मुक्काम येथें चार पांच दिवस आहे, तित
क्यांत पहातां येईल. उगाच अधीर होऊन काय करावया
असें उमाकांतानें ह्मटल्यावर "बरें तर चला आपल्य
ठिकाणीं जाऊं" असें बोलून मीनकेतन उठला व उभयत
नीं नगराचा मार्ग धरिला. मीनकेतन जाऊं लागला अ

पाहून चतुरिकेनें विजय नांवाच्या जासुदास एकीकडे हाक मारून त्यास सर्व प्रकार थोडक्यांत सांगून हे दोघे गृहस्थ कोठें जातात, आपल्या नगरींत गेल्यावर कोणाचे घरीं आहेत, वगैरेबद्दल बारकाईनें तपास करण्यास सांगून सिबिका तयार करवून नवमालिकेसह नगरांत आली. चतुरिकेच्या सांगण्याप्रमाणें विजय त्यांचे पाठीमागें गेला तो सरकार कचेरीजवळ एक मोठा वाडा होता, त्यांत उभयतांस शिरतांनां पाहिलें. मीनकेतनाबरोबर आलेल्या नोकर माणसांत तपास करितां उभयतांचा मुक्काम ह्या नगरींत आणखी चार पांच दिवस आहे, असें समजलें. नंतर विजय लागलाच परत आला आणि त्यानें कळलेलें वर्तमान चतुरिकेस निवेदन केलें. नवमालिका श्रीचंडिकेच्या देवालयांतून परत आल्यावर आपल्या महालीं गेली; परंतु मीनकेतनाची मूर्ति तिचे नेत्रांसमूर उभी आहे असा भास तिला वारंवार होई.अशा स्थितींत तिला झोप कोठून येणार? मीनकेतनाचीहि तशीच स्थिती झाली होती. त्यास किंचित् डोळा लागला का "हे सुंदरी धन्य तुझ्या लावण्याची; तूं माझें चित्त सर्वस्वीं हरण केलेंस" वगैरे उद्गार काढून त्यानें बरळत उठावें. सारांश पंचशरानें त्यांच्या मनांत अशी कांहीं प्रेरणा केली होती कीं त्यांस एकमेकावांचून कांहीं सुचेना. दुसरे दिवशीं मीनकेतन व उमाकांत हे नगरी पहाण्यास निघाले. बहुतेक सर्व शहर पाहिल्यानंतर राजप्रासादाजवळ आले. बाजूस असलेला नवमालिकेचा महाल उमाकांतानें मीनकेतनास दाखविला. तो फारच रमणीय असल्यामुळें लक्ष्यपूर्वक अवलोकन करीत आहेत, तों नवमालिका त्यांच्या दृष्टीस

पडली; तिचीहि दृष्टी मीनकेतनाकडे गेली. आपलें चित्त हरणारा मीनकेतन हा रस्त्यांत उभा आहे असें पाहून ती अगदीं वेडावली. तिला कांहीं सुचेनासें झालें; ती ह्मणाली, मदना, तूं अनंग असतांहि साक्षात् या भूतलावर मीनकेतनाच्या रूपानें उत्पन्न होऊन माझे शरिरीं संचरून मला व्यर्थ पीडा कां करितोस? दैवाची गती काय आहे हें कोणास कळणार, किंवा मीनकेतनाचा निदिध्यास धरून प्रबल विरहामुळें झुरणीस लागून माझा अंत होणार नकळे. असो; हा वेळ तरी दैवाच्या परीक्षेचा आहे, असें ह्मणून मीनकेतनाकडे टक लावून पहात आहे तों विजय तेथें आला व ह्मणाला, बाईसाहेब, चला, श्रीचंडिकेच्या देवालयांत जाण्याकरितां आपली सिबिका तयार करून आणिली आहे. ही पहा चतुरिका जाण्याच्या बेतानें तयार होऊन इकडे येत आहे. हें ऐकून तिनें खुंटीवरील जांभळा शालू घेतला व परिधान करून अलंकारादि लेऊन ती निघाली. मीनकेतन पूर्वींच तेथून पुढें चालता झाला होता. कांहीं वेळ देवालयाचे आजूबाजूस फिरून उमाकांत व मीनकेतन एका अशोक वृक्षाखालीं शीतल छायेंत पडले आहेत, तों नवमालिकेची स्वारी देवालयांत येऊन दाखल झाली, तसे मीनकेतन महाराज उठून बसले राहिले. नवमालिका, दर्शन घेतल्यावर बाहेर येऊन पूर्वदिनीं हे उभयतां ज्या चौतऱ्यावर बसले होते त्यावर चतुरिकेसह येऊन बसली. परस्परांचें स्वरूप व वय पाहून तीं परस्पर इतकीं मोहित झालीं व मदनदाह इतका दुःसह झाला कीं तेथून अन्य स्थलीं अथवा आपल्या मंदिरीं परत जावें असें नवमालिकेस वाटे

लागलें; ह्मणून विजयास तिनें एकीकडे खुणावून काढून आपण लिहिलेलें पत्र मीनकेतनास देण्याविषयीं सांगितलें व आपण सिन्निकँत बसून नगराकडे परतली. विजय पत्र घेऊन अशोक वृक्षाखालीं जेथें मीनकेतन व उमाकांत बसले होते तेथें आला व नम्रतेनें रामराम करून पत्र मीनकेतनाचे हातीं देऊन आपण चालता झाला. पत्र घेऊन येणारा इसम कोठील व पत्र कोणाचें वगैरे-बद्दल त्यास प्रथम मोठी शंका उत्पन्न झाली व विस्मयानें तें पत्र फोडून वाचिलें त्यांतील मजकूर:—

**“ श्रीमन्मच्चित्तचालक मीनकेतन महाराज,**

**हल्लीं मुक्काम हेमनगरीचरणीं सेवेशीं,**

आपली लीन दासी नवमालिका हिचे शिरसाष्टांग प्रणिपात, विनंती ऐसीजे.—आपल्या येण्यानें ह्या नगरीवर व नगरवासीजनावर मोटा अनुग्रह झाला. प्रथम दिवशीं श्रीचंडिकेच्या देवालयांत जेव्हां आपलें दर्शन झालें तेव्हांपासून माझ्या जिवास स्वास्थ्य नाहीं. आपल्या अलौकिक सद्गुणांनीं व स्वरूपानें माझे मनावर असा कांहीं विलक्षण ग्रह केला आहे कीं करग्रहणास आपणावांचून अन्य मला कोणीच सुपात्र आढळत नाहीं. आतां आपल्या सद्गुणांस मी योग्य नाहीं, हें कबूल करित्यें; तथापि आपणावांचून अन्य ठिकाणीं माझें मन वळत नसल्यामुळें व मनानें केवळ आपणास मी वरिलें, ह्मणून ह्या दासीस आपली ह्मणावें व आपल्या सेवेस लावावें ही दीन दासीची आपल्या निष्कलंक पदीं विनंती आहे. अमरपुरींत न्यायाधिकाऱ्याचें काम आपण करितां असें जनमुखें श्रुत झालें आहे. कोणाचाहि मनोभंग करणें शास्त्रदृष्ट्या

मोठें पातक आहे, तेव्हां माझी निराशा करून मनोभंगाचें पातक शिरीं घेण्यास आपण प्रवृत्त कधीं होणार नाहीं, अशी माझी मनदेवता साक्ष देते. माझी आपणास माहिती नाहीं, म्हणून घेतल्या मोकळिकीची क्षमा होईल, ही सबळ आशा आहे. कळावें या दीन दासीवर आपला लोभ असावा ही विनंती."

सदैव आपली,
नवमालिका.

ह्या प्रमाणें पत्र वाचून पाहून त्यास फारच आश्चर्य वाटलें. उमाकांतही तेथें जवळच होता त्यास तें दाखवून म्हणाला, काय तरी हिचें शहाणपण ? पत्र लिहिण्याची सरणी कशी आहे पाहिलीस ना? एखाद्या विद्वान मनुष्यास देखील असा मजकूर जुळितां येणार नाहीं. भाषा तरी किती प्रौढ व नम्रतेची ? उमाकांत ह्मणाला मित्रा उतावीळ होऊं नको ह्मणून सांगितलें, त्याचें प्रत्यंत्तर आलें किंवा नाहीं ? परमेश्वरानें तुमच्या मनोदयास साह्य केल्यानें तुमचा समागम परस्परांस सुखकर होईल व परमेश्वर तसें करो ही माझी मनापासून इच्छा आहे. तें ऐकून मीनकेतन ह्मणाला, मित्रा, हें घडेल तरी कसें? ती पडली राजकन्या, आपण साधारण स्थितींतील मनुष्य; आपल्या व तिच्या स्थितींत जमीन आकाशाचें अंतर, तेव्हां अशा माझ्या स्थितींत हा योग घडणें कांहीं तरी शक्य आहे काय ? काय राजे कमी पडले आहेत तर तिचीं आईबापें माझ्या सारख्यास तिला वर योजितील व तीचें लिहिणें तरी किती वेडेपणाचें ! बरें, अनितीनें तिचें हरण करणें मला ठीक वाटत नाहीं. संमत असा जो विवाहविधी तो

झाल्यावांचून ती माझी, असें मी कसें ह्मणावें ? हें ऐकून उमाकांत ह्मणाला, स्थितीशी अशा कामांत काय करावयाचें आहे ? मनुष्याची स्थिती सर्वकाळ सारखीच नसते. रावाचे रंक व रंकाचे राव झालेले पुष्कळ पाहिले आहेत व ऐकिले आहेत. लक्ष्मी चंचल आहे. सद्विद्या, स्वरूप व इतर दुसरे सद्गुण मनुष्यांत वास करीत असले ह्मणजे तेथें सर्व कांहीं अनुकूल असतें. मीनकेतना तिनें जी तुझी परीक्षा केली ती यथायोग्य केली. असो, आतां तिच्या पत्राचें उत्तर तिला लिहून पाठीव. अमरपुरींत जाऊन ह्या कामीं कांहीं जास्त खटपट करण्याचें माझ्या मनांत आहे. हें ऐकून मीनकेतन ह्मणाला, उमाकांता ह्या राजकन्येस पाहिल्यापासून माझें मन अगदीं चंचल झालें आहे. मदन शरीरीं संचरून वारंवार मला इतकी पीडा करितो कीं त्याच्या वेदना मला दुःसह होतात. ती दृष्टीस पडल्यापासून जी माझी स्थिती झाली आहे ती सर्व तुझ्या ध्यानांत आली असेलच. फार काय सांगूं, तुला जसें बरें वाटेल तसें कर ह्मणजे झालें. आतां पत्राचें उत्तर लिहितों असें ह्मणून लिहूं लागतोः—

" हे नृपनंदिनी, सुंदरी, तुझ्या पत्रानें माझें संशय पटल नाहींसें झालें. तुझ्या पत्रांत जशी तूं आपली स्थिति वर्णन केलीस तशीच हल्लीं माझीहि झाली आहे; परंतु काय करावे ? तूं स्वतंत्र नाहींस; लौकिकास विपरीत करून मजबरोबर येण्याचे विचार सर्वथा गर्ह्य आहेत; तेव्हां तूं आपलें मनोगत मातापितरांस कळवून त्यांच्या सल्ल्यानें होईल तें मला ठीक दिसतें. त्यांचा तुला रुकार मिळाल्यास मनोभंगाची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं.

तुझें मनोहर मूर्तीचा असा कांहीं विलक्षण ठसा माझे मनावर उठला आहे, कीं त्याचें वर्णन करण्यास मी अगदीं असमर्थ आहे. परस्परांचे पत्रावरून परस्परांचीं मनें व्यक्त झालीं आहेत, तेव्हां जास्त लिहून तुला श्रमवीत नाहीं. हे आशिर्वाद."

विरहत्रस्त,
मीनकेतन.

नवमालिका आपल्या महालीं बसली आहे तों मीन-केतनाचा जासूद पत्र घेऊन आला. चतुरिका त्याचे परिचयाची झाली होतीच, तिच्या तें स्वाधीन करून "आमच्या सरकारांनीं हें बाईसाहेबास देण्याकरितां दिलें आहे तें पावतें करा' ह्मणून सांगून परत गेला. चतुरिका पत्र घेऊन नवमालिकेच्या महालीं येतांच नवमालिका तीस ह्मणाली, चतुरिके, तुला कांहीं विचारावेंसें माझ्या मनांत येतें; पण बाई तूं कोणापाशीं बोलणार नाहीं असें जर कबूल करशील, तर मी तुला सांगेन; नाहीं तर आपल्या हातांनीं आपल्या पायांवर धोंडा मारून घेतल्या प्रमाणें व्हावयाचें. हें ऐकून चतुरिका ह्मणाली, बाई साहेब मजवरलि आपला विश्वास उडण्याजोगें कृत्य माझ्या हातून काय झालें असेल तें कळत नाहीं. मी जन्मतःच ह्मातारी जन्मल्ये नाहीं; तारूण्यादि सर्व वयाच्या स्थितीचा अनुभव मी पूर्ण घेतला आहे व त्यांतील सुख दुःखें मला माहित झालीं आहेत. अविवाहित असल्यामुळें हल्लींच्या वयांत ज्या व्यथा आपणास सोसाव्या लागत आहेत त्या मला सर्व कळतात. ह्या समयीं आपली एखादी गुप्त ठेवि-ण्याजोगी गोष्ट मला सांगितली तर त्याची परिस्फुटता

कोणापाशीं तरी मजकडून होईल काय? कांहीं संकोच न धरितां मजवर भरंवसा ठेवा. आपले मनोगत सिद्धीस जाण्याकरितां होईल तितके उपाय करीन.

ह्याप्रमाणें चतुरिकेचें भाषण ऐकून नवमालिकेस कांहीं सा धीर आला व ती ह्मणाली, चतुरिके, तूं फार धूर्त आहेस; तुजपासून एखादी गोष्ट चोरून ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परवाचे दिवशीं मी चंडिकेच्या जत्रेस गेले होत्ये. तेव्हां तूंहि मजबरोबर होतीसच. दर्शन घेऊन आपण बाहेरील बागेंत बसलों असतां आपल्या समूर असले ल्या चौतऱ्यावर दोन पुरुष बसले होते, ते तुझ्या पहाण्यांत आले असतीलच नाहीं बरें?

**चतुरिका०**—होय बाई, काय त्यांचें स्वरूप तरी! जसे मदनाचे पुतळेच. त्यापैकीं ज्याचे डोक्यास जरीचा पटका होता त्याचें रूप तर फारच मनोहर असून मुद्रा चंचल व साध्या बाण्याची दिसली. बरें, पुढें काय, त्या पुरुषांविषयीं काय सांगतां?

**नवमालिका०**—चतुरिके प्रथमदिवशीं जेव्हां तें स्वरूप माझ्या दृष्टीस पडलें, तेव्हां माझें देहभान नाहींसें होऊन त्यांच्या सद्गुणाब्धींत नौके प्रमाणें मी तरंगून गेल्यें व शोध केल्यावर जेव्हां त्याचें नांव मीनकेतन आहे असें समजलें तेव्हां भस्मीभूत व अनंग असा पंचशर असतांहि ह्याच्या रूपानें सांग होऊन माझें शरिरीं पीडा करण्याकरितां आला असा भास झाला. सखे, तेव्हां पासून माझी चित्तवृत्ति ठिकाणीं नाहीं. त्याचें नांवच त्याच्या सद्गुणांची व त्याच्या सुरुपाची साक्ष देत आहे. ती मदनमूर्ति माझे हृदयांत इतकी कोंदली आहे कीं

तिच्या पुढें मला सर्व विषय तुच्छ वाटतात. सखे असा हा अमूल्य लाभ होण्याजोगें कोठें माझें दैव मोठें आहे? ज्या कोणाचा सुकृतसंघ अनंत असेल तीसच हें पतिरत्न प्राप्त होणार. बरें पण सखे, काल मी त्यास एक पत्र लिहिलें होतें त्याचें उत्तर अथवा कांहीं निरोप नाहीं हें कसें? चतुरिके आज प्रातःकाल पासून माझा वामनेत्र स्फुरण पावत आहे, त्यावरून आज कांहीं तरी प्रिय होईल असें लक्षण दिसतें. चतुरिके खरेंच कां नाहीं मी ह्मणत्ये तें?

**चतुरिका** ०— बाईसाहेब होईल कशास ह्मणतां? झालें ह्मणाना कां असें बोलून मीनकेतनाचें पत्र तिच्या हातीं देत्ये.

**नवमालिका** ०—( पत्राकडे पाहून ) कायगे, हें तुला कोणी दिलें? कोणाचें तरी बाई पत्र हें?

**चतुरिका** ०—बाई साहेब, दुसरें कोणीकडून येणार? ज्या सभ्य गृहस्थानें आपलें चित्त भांडार सर्व लुटिलें त्याचेंच पत्र हें. आतां मात्र गोष्ट बरोबर पटलीसें वाटतें नाहीं बरें!

**नवमालिका** ०—पुरेगे मेल्ये, मला पत्र वाचून पाहूंदे मग तरी थट्टा कर, असें ह्मणून मोठ्या औत्सुक्यानें पत्र फोडून वाचिलें.

वाचकहो? आपल्या मनोगतानुरूप त्यांतील मजकूर अवलोकून नवमालिकेच्या मनाची स्थिती कशी झाली असेल त्याची कल्पना तुह्मीच करा. त्या आनंदभरांत ती आपलें देहभान कांहीं वेळ विसरली परंतु पुनः " त्यांचा ( मातापितरांचा ) तुला रुकार मिळाल्यास " हें मीनकेतनाच्या पत्रांतील शब्द तीस आठवून ती चतुरिकेस

ह्मणाली, बाबाआई ह्या कामीं काय हरकत घालतील ते कळत नाहीं. ही एक आतां मोठी काळजीच माझे मनांत उत्पन्न झाली. ती जुन्या पद्धतीचीं असल्यामुळें, आपल्या कन्येस राजपुत्रच वर असावा असें विचार त्यांचे मनांत आल्यावांचून रहाणार नाहीं; मग तो मूर्ख असल्यामुळें आपली कन्या जन्मभर दुःखी झाली तरी त्यांस त्याविषयीं फारसें अवघड वाटत नाहीं. परमेश्वरा! अशा नीच स्थितीस मात्र तूं मला आणूं नको, असें बोलून ती खिन्न वदन बसली. हें पाहून चतुरिका ह्मणाली, ह्या गोष्टी आपल्या स्वाधीन नाहींत; तथापि ही खात्री असूंद्या कीं आपल्या विवाह संबंधांत तीं जें करितील तें विचारानें करतील. आतां मी येत्यें, असें बोलून चतुरिका मंजुभाषणीचे महालांत जाती झाली.

चतुरिका गेल्यावर मीनकेतनाविषयीं नवमालिकेचे विचार पुनः सुरू झाले व ती परमेश्वराची प्रार्थना करून ह्मणाली, परमेश्वरा, इहजन्मीं पातक केल्याचें तर मला आठवत नाहीं; परंतु अन्य जन्माची बाकी मजवर निघत असल्यास मीनकेतन प्राप्तीची निराशा करून त्याबद्दल मला दंडूं नको. त्याची माझी जन्माची गांठ मार; मग पाहिजे तसे चंडदंड करून तूं आपली फेड करून घे, अशी अनेक प्रकारें ती देवाची प्रार्थना करूं लागली. मीनकेतनाची मदनमूर्ति तिचें अंतःकरणांत नेहमीं उभी असल्यामुळें त्यावांचून अन्य विषय तीस सुचेनासा झाला व झुरणीस लागून ती दिवसें दिवस फार कृश होत चालली.

आतां आपण मंजुभाषिणी विषयीं विचार करूं. ती आपल्या महालांत एकटीच बसली असतां चतुरिका तेथें

आली. तीस पाहून मंजुभाषिणी ह्मणाली, कां चतुरिके, आज इकडे कुणीकडे आलीस? बाईची प्रकृती ठीक आहेना? हे ऐकून चतुरिकेनें उत्तर केलें, ठीक असण्याची वार्ता देखील नको; पण आई साहेब, त्यांच्या विवाहसंबंधीं कांहीं तजवीज झाली कां? हल्लींच्या त्यांच्या वयांत त्यांस अशा अविवाहित ठेवणें बरें नाहीं. मदन व्यथेपासून आतां त्यांस किती बरें जाच होत असेल? आपणा उभयतां कडून ह्या कामीं अद्यापिहि ढिलाई होत आहे, हें पाहून मला मोठें नवल वाटतें. हें ऐकून मंजुभाषिणी ह्मणाली, काय करावें बाई, घरांतून बऱ्याच राजपुत्रांच्या तसबिरा तिच्या संपती करितां आणिल्या होत्या, परंतु तिच्या मनास एकहि आली नाहीं, तेव्हां ह्याला कोण काय करील? पुढें तजवीज सुरू आहेच. हे चार महिने लोटल्यावर तिचा विवाह खचित करण्याचा; मध्यंतरीं अवधीहि बरीच आहे, तितक्यांत कोठें कांहीं तरी जमून येईल; तों पर्यंत नाइलाज ह्मणून पोरीची कशी तरी समजूत घातली पाहिजे. ह्या प्रमाणें मंजुभाषिणीच्या मनांतील भेद समजल्यावर चतुरिकेनें श्रीचंडिकेच्या जत्रेंत झालेलें वर्तमान तीस सांगितलें व ह्मणाली आई साहेब, आपल्या बाई साहेबाचे रूपास तोच ( मीनकेतन ) योग्य आहे व तोच पति मिळाल्यानें आपल्यावरील बोजा नाहींसा होऊन त्याहि सुखी होतील असें मला वाटतें.

ह्या प्रमाणें चतुरिकेचें भाषण होऊन ती गेल्यावर नवमालिकेची स्थिती कशी आहे ती पहावी ह्मणून मंजुभाषिणी नवमालिकेच्या महालांत गेली. पहाते तों विगलित वस्त्र म्लानवदन नवमालिका पलंगीं पडली आहे.

ती कुरंगाक्षी कृश व निस्तेज झालेली पाहून तिच्या आंगावरून हात फिरवून मंजुभाषिणी ह्मणाली, बाई, तुझी ही अशी दशा कशानें झाली? तुला कोणत्या गोष्टीची उणीव का आहे, मग ह्या तुझ्या वेडास काय बरें ह्मणावें? आह्मी मूढ कां आहोंत किंवा आह्मास तुझी काळजी नाहीं? मला सर्व समजत आहे. घरांतूनहि सर्वदा तुझ्या स्वयंवर घटनेंत असायचें. कांहीं दिवसांपूर्वीं तुझ्या पसंतीकारितां राजपुत्रांच्या कांहीं तसबिरा आणविल्या होत्या असें मी ऐकिलें होतें. बरें पण खरेंच सांग, त्यांतून कोणती तुझे पसंतीस पडली? ह्या कामांत संकोच धरून कांहीं कामाचा नाहीं; मन मोकळें करून तूं जर आह्मास सांगणार नाहीं तर आह्मी काय करावें? वरलाभानें तुला सुखी व्हावयाचें आहे; तेव्हां तुझें मन स्पष्टपणें कळल्यावांचून जर एखादी गोष्ट आह्मी आपल्या मनाप्रमाणें केली व पुढें त्यांत व्यंग असलें ह्मणजे जन्माचें आह्मांस दूषण लागणार तें बरोबर नाहीं. सर्व संसारांत तूंच काय तें आह्मास आपत्य; तेव्हां तूं सुखांत पडावेंस अशी योजना करणें आह्मास उचित आहे. बरें पण बये, तुझ्या पसंतीस कोणत्या राजपुत्राची तसबीर आली सांग पाहूं? नवमालिका मर्यादेमुळें प्रथम कांहीं बोलेना; परंतु मंजुभाषिणीनें पुनः पुनः सांगण्याविषयीं आग्रह केल्यावरून व भलत्याच कामीं भीड धरिल्यानें आपलें मनोगत साध्य होणार नाहीं असें जाणून ती ह्मणाली, आई, ज्या तसबिरांविषयीं तूं ह्मणालीस त्या पैकीं एकाहि मला पसंत पडली नाहीं. विवाहित होणें हें संसारांत मोठें महत्वाचें काम आहे, व हें करितांना मनुष्याचे स्थितीचा ह्मणजे श्रीमंती गरिबीचा विचार

करणें अवश्य आहे असें मला वाटत नाहीं. कुळशील गुणांनीं युक्त असा पति मिळाल्यानें जशी कन्या सुखी होये तशी धनाढ्य दुर्गुणी पति मिळाल्यानें ती होणार नाहीं. द्रव्यादि वस्तु क्षणिक आहेत; तेव्हां आई, ह्या कामांत मी तुला फार सांगावें असें नाहीं. वरील माझ्या बोलण्याचा विचार करून तुह्मांस जें बरें दिसेल तें करा.

**मंजुभाषिणी०**—बरें पण बाई, तूं श्रीचंडिकेच्या जत्रेस गेली होतीस ह्मणून चतुरिकेनें मला सांगितलें; पण जत्रा कशी होती तें तूं मला कळविलें नाहींस हें कसें? तुझ्या काळजीमुळें मलाहि तुला विचारण्याची आठवण राहिली नाहीं. बये, सांग पाहूं कसें काय झालें तें! ( असें बोलून ती हांसली ).

**नवमालिका**—( मनिकेतनाविषयींची हकिकत चतुरिकेनें तिला खास कळविली अशी तिची खातरी होऊन लाजून ) आई, चतुरिकेनें तुला नाहीं कां सांगितलें? खरेंच आई, यंदा जत्रेची रचना फारच मनोरंजक होती, व तमासगीर लोकहि फार लांबून ती बघण्याकरितां आले होते. पण आई, चतुरिकेनें तुला काय सांगितलें?

नंतर मंजुभाषिणीनें चतुरिकेच्या मुखानें ऐकिलेली सर्व हकीकत तीस निवेदन केली व ह्मणाली, नवमालिके, हा कोण, कोठील, ह्याचें कुळशील तुला समजलें काय? तशांत तो राजपुत्र नसल्यामुळें घरांतून काय अडथळा आणितील तें समजत नाहीं; तथापि तुझ्या पसंतीस तो पडत असल्यास त्याची प्राप्ती तुला व्हावी अशा विषयीं मी प्रयत्न करीन; पुढें बरें वाईट झाल्यास त्याचा भार तूं आपल्या शिरीं घेण्यास तयार हो ह्मणजे झालें. तुझ्या

गुणारूपाची इतकी प्रसिद्धी झाली आहे कीं आजू बा-जूंच्या राजपुत्रांनीं तुझे विषयीं बोलणीं चालविलीं आहेत. त्यांची निराशा करून मीनकेतनास तुला समर्पण केल्यानें अनर्थ होण्याचा संभव आहे. परंतु तुझ्या मनोदयानुरूप तुझ्या कल्याणाकारितां अशा अडचणींकडे घरांतून लक्ष्य जाईल असें मला वाटत नाहीं. आतां तूं स्वस्थ ऐस. थोड्याच दिवसांत तुझ्या मना प्रमाणें सुस्थळ कायम करून चार महिने संपल्यावर तुझ्या स्वयंवराची व्यवस्था करूं असें ह्मणून मंजुभाषिणी तीस विचारून आपल्या मंदिरांत गेली. नवमालिकेला आपल्या मनोदयाप्रमाणें कार्य घडून येईल ह्मणून फार समाधान वाटलें.

कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं शंखचूड आपल्या भार्येसह मंदिरांत असतां मंजुभाषिणीनें नवमालिकेच्या स्वयंवरासंबंधीं बोलणें लाविलें. तें ऐकून शंखचूड ह्मणाला, प्रिये, नवमालिकेविषयीं माझे मनांत रात्रंदिवस फार काळजी घोळत असत्ये. ती राज्यव्यवस्था पहाण्याचें देखील मला सुचत नाहीं. बरें, आपली मुलगी तरी काय कमी आहे? सुशिक्षित असल्यामुळें तिच्या अनुरूप पति मिळाल्यावांचून ती स्वरूपास किंवा द्रव्यास भुलणारी नाहीं. पहा तिला कित्येक तसबिरा दाखविल्या; तथापि त्यापैकीं एकाहि तीस पसंत न पडून त्याबद्दल तसा अभिप्राय तिनें मला स्पष्टपणें लिहून कळविला. तेव्हां आतां काय करावें, असें मला झालें आहे. इतक्यानेंच मी उद्योग सोडिला असें समजूं नको. आपल्या प्रधानजीस ह्या बद्दल माझी सक्त ताकीद असून देशोदेश जासूद रवाना केले आहेत; कोठें तरी लवकरच जमून येईल. ह्या

साठीं तूं इतकी श्रमी कां होत्येस? चातुरमास संपतांच तिचें स्वयंवर करण्याविषयीं मी कायम विचार केला आहे. प्रिये, तुझ्या ऐकण्यांत कोठें सुस्थल असल्यास सांग; ह्मणजे त्याबदलहि तपास करितां येईल. आह्मा पुरुषांपेक्षां बायकांस अशा गोष्टीबदल जास्त माहिती असत्ये. हें ऐकून मंजुभाषिणी ह्मणाली, नाथा, मी थोड्या दिवसांपूर्वीं नवमालिकेच्या महालीं गेल्यें होत्यें तेव्हां बोलतां बोलतां तिच्याच मुखांतून कांहीं उद्गार निघाले. आपली आज्ञा होईल तर बोलेन.

**शंखचूड**०—प्रिये, ती काय ह्मणाली तें तरी ऐकूं दे, ह्मणजे आपणास कांहीं खटपट करण्याची मेहनत नको. आपण मात्र राजपुत्रांच्या तसबिरा लांब लांबून आणाव्या व तिला एकहि पसंत पडूं नये, हें बरोबर नाहीं.

**मंजुभाषिणी**०—प्रिया, ती कांहीं दिवसां पूर्वीं श्रीचंडिकेच्या जत्रेंत गेली होती. बरोबर आपली दासी चतुरिकाहि होती. तेथें अमरपुरीहून धनंजयाचा मुलगा उमाकांत व त्याचा स्नेही मीनकेतन हे आले होते. हा मीनकेतन कुलशील गुणांनीं युक्त असून अमरपुरी येथें मुख्य न्यायाधिशाचें काम करीत असतो, असें चतुरिकेनें मला सांगितलें. तेव्हांपासून नवमालिकेची स्थिति फारच विलक्षण झाली आहे. मर्जी असल्यास ह्या गोष्टीची चौकशी करून स्थल युक्त वाटल्यास तिच्या मनोदयाप्रमाणें केल्यानें ती सुखी होणार आहे. शिवाय, परीक्षेचा बोजा आपल्यावरूनहि उतरेल, असें मला वाटतें. पुढें आपल्या विचारास येईल तें खरें.

**शंखचूड**०—प्रिये, हे विचार मला प्रशस्थ दिसत

नाहींत. राजपुत्र सोडून भलतेंच केल्यास आपण दोषास पात्र होऊं. ह्या पोरीस हे विचार कोठून सुचले कोण जाणे? बरें, हिला चार गोष्टी सांगूं लागलों तर ती उलटें आपणास कुंठित करील, माझी पूर्ण खातरी आहे; तेव्हां तुझा रुकार असल्यास व तिच्या पंसतीस तो येत असल्यास मीनकेतन कोणाचा कोण, कोठील, त्याचें कुशल कसें ह्याजबद्दल चौकशी करवितों. तोंपर्यंत चार गोष्टी नवमालिकेस सांगून तिला सुखी करा ह्मणजे झालें. अमरपुरीचा प्रधान धनंजय माझ्या उत्तम परिचयाचा आहे. तिकडे उद्यांच जासूद पाठवून पाहिजे आहे तो खुलासा आणवितों.

वाचकहो, आतां मीनकेतनाच्या स्थितीचा विचार करूं. रजा सपतांच उभयतां उमाकांत व मीनकेतन अमरपुरीस चालते झाले. त्याठिकाणीं दाखल झाल्यावर संधी पाहून उमाकांतानें झालेली हकीकत धनंजयास कळविली व ह्मणाला, तात, दिवसें दिवस त्याची विरह-बाधा इतकी बळावत चालली आहे कीं, कांहीं निश्चित विचार लवकर न झाला तर त्याचा परिणाम अनिष्ट होईल अशी मला भीति पडली आहे. हें ऐकून धनंजय ह्मणाला, मुलानों, तुमचे विचार बालिश आहेत. जी वस्तु मोठ्यास-हि मिळणें कठीण तिजविषयीं साधारण स्थितींतल्या मनुष्यानें आशा करणें अगदीं वेडेपणाचें काम आहे. हें काम कांहीं स्वल्प नाहीं. नवमालिकेच्या गुणाची कीर्ति ह्या प्रांतीं इतकी पसरली आहे कीं राजपुत्रास तिची प्राप्ती कमनीय आहे व कित्येकांनीं तर पुष्कळ दिवस बोलणें चालविलें असून आटोकाट खटपटी सुरू आहेत

तेंव्हां नृपकुमार सोडून शंखचूड आपली कन्या मीनकेतनास देण्याचें कबूल करील, असें मला वाटत नाहीं. बाळा अशा कामांत, जरी त्याचा माझा स्नेह आहे तरी, मला बोलतां येत नाहीं. स्थितीच्या मानानें त्याचें व मीन-केतनाचें साम्य होणार नाहीं. आतां मीनकेतनाचे स्वाभा-विक गुण, स्वरूप, अतुल आहेत, ह्मणून रूचल्यास कांहीं खटपट करावी असें माझ्या मनांत येतें. ह्याप्रमाणें उभयतांचें बोलणें झाल्यावर उमाकांत मीनकेतनाकडे आला व झालेलें वृत्त निवेदन करून ह्मणाला, मित्रा, तूं कांहीं काळजी करूं नको. उगाच अधीर होऊन काय उपयोग ? कांहीं दिवस धीर धर, ह्मणजे मनोगताप्रमाणें परमेश्वर कृपेनें घडून येईल. नवमालिकेची स्थिती तुझ्या पेक्षांहि अधिक शोचनीय झाली असेल. एकंदर मानानें पहातां मला असें वाटतें कीं थोडक्याच दिवसांत कांहीं तरी प्रिय घडून येईल. तूं आतां स्वस्थ ऐस ह्मणजे झालें.

ह्याप्रमाणें उभयपक्षाकडील प्रितीचे उगम वडील मा-णसांस कळून येऊन पुढील तजविजीविषयीं हालचाल सुरू होतीच. शंखचूड ह्यानें आपल्या भार्येस कबूल केल्या-प्रमाणें एका जासुदाबरोबर पत्र देऊन त्यास धनंजयाकडे पाठ-विलें. पत्र दाखल होतांच धनंजयानें त्याचें उत्तर लिहून पाठविलें त्यांत मीनकेतनाविषयीं हकीकत इत्थंभूत लिहून कळविली व त्यास कन्या दिल्यानें ती सुखी होईल असा आपला अभिप्रायहि प्रदर्शित केला. हें पत्र हेम-नगरींत शंखचूड ह्यास दाखल होतांच त्यानें तें आपल्या भार्येस दाखविलें; तेंव्हां नवमालिकेच्या मनोगतास रुकार

देऊन मीनकेतन जामात जोडावा असा त्या उभयतांनीं निश्चय ठरविला. हा बोलण्याचा ओघ निघाला असतां चतुरिका जवळ होतीच. तिनें तें सर्व वृत्त ऐकून नवमालिकेस विदित केलें. मग नवमालिकेच्या आनंदास काय पुसावें? "परमेश्वरा तुझी लीला, अगाध आहे. ह्या अनाथ अबलेची करुणा येऊन त्वां हिला सनाथ केलेंस ह्याबद्दल तुझे आभार किती ह्मणून मी आठवूं? तुझ्या द्वारीं न्याय आहे असें मला आतां निःशंकपणें ह्मणण्यास कांहीं हरकत आहे काय? भाविकाचे ठायां तुझें हें वात्सल्य पाहून तुझ्या अनंत शक्तीचें मला मोठें नवल वाटतें. असो, आतां झालेली घटना अढळ राखून शेवटीं सिद्धिस ने, ही माझी विनंती आहे."

अशी ती आनंदभरांत आहेसें पाहून चतुरिका ह्मणाली, बाईसाहेब, ह्या ह्मातारीच्या बोलण्याची प्रतिती आली किंवा नाहीं? असो, आपण सुखी असा, आतां मी येत्यें असें ह्मणून ती आपल्या घरीं जाती झाली.

उभयपक्षींची घटना निश्चित झाल्यावर ते सर्व चातुर्मास संपण्याची मार्गप्रतिक्षा करीत स्वस्थ बसले.

---

## भाग ५.

वाचकहो, आतां गोपिनाथ मदनपुरींत असतांना काय करीत होता, तें पाहिलें पाहिजे. तेथील सेनाध्यक्ष भवानराव ह्याचे हाताखालीं राहून आपल्या हुद्यास जरूर लागणारे सद्गुण, ह्मणजे संग्रामीं शौर्य, युद्ध कौशल्य ह्मणजे निशाण मारणें, तलवार पट्टा वगैरे खेळणें, धनुर्विद्या, मल्लविद्या वगैरे थोड्याच दिवसांत पूर्णपणें अव-

गत करून घेऊन तो मोटा लढाऊ सरदार बनला. तेथील राजा विश्वसेन ह्याच्या चाकरीस राहिल्या पासून गोपिनाथास पांच चार वेळां संग्रांमास जाण्याचा प्रसंग आला, त्यांत ह्या उभयतांच्या कौशल्यामुळें यश आलें, हें पाहून गोपिनाथाच्या शौर्याची व हुशारीची कीर्ति जिकडे तिकडे पसरली. गोपिनाथ स्वभावानें गंभीर, लीन, विद्वान व संग्रामीं शूर असल्यामुळें सर्व राजमंडळ त्याचप्रमाणें प्रजाहि त्यावर प्रीति करी. भवानरावाकडे सेनेचें अधिपत्य होतें खरें; तथापि वयस्क झाल्यामुळें व पुष्कळ लढायांत मोठमोठीं जिवावरचा कामें त्यानें केल्यामुळें तो अगदीं थकला होता, व पुढें मागें योग्य मनुष्य मिळाल्यास त्याचे स्वाधिन सर्व सैन्याचा भार करून आपण घरीं बसावें ह्या विचारांत होता. सुदैवानें गोपिनाथ, त्यास ह्या कामाकरितां सुपात्र मिळाल्यामुळें, त्यानें सर्व कला त्यास शिकविल्या होत्या. त्यावर तो आपल्या मुलाप्रमाणें लोभ करी. कांहीं दिवस गेल्यावर आपल्या हातून आपल्या हुद्याचें काम नीट होत नाहींसें पाहून प्रधानाचे विद्यमानें गोपिनाथास सेनापतीचें काम देऊन आपण घरीं बसला. सेनाध्यक्षाचा कारभार मिळाल्यावर तर तो त्या राज्यांतील मोठा मुत्सदी झाला. गोपिनाथ आपल्या कामीं नेहमीं दक्ष असल्यामुळें विश्वसेनाची त्याजवर प्रीति व विश्वास बसला, व तो करील तें कारण असें त्याचें तेथें वजन पडून गेलें. अशा उच्च पदास जरी तो चढला होता, तरी मीनकेतनाचा स्नेह व गाजीपूरचा राजा दुराचारी व आपला सापत्न्य बंधु दुर्बुद्धि ह्यांची दुष्ट कृत्यें तो विसरला नव्हता. प्रिय मीनकेतनाची काय बरें अवस्था झाली असेल? इतके

यत्न केले तरी त्याचा शोध कोठें लागत नाहीं हे पाहून त्यास पराकाष्ठेचें वाईट वाटे; परंतु निरुपाय जाणून स्वस्थ असे. गाजीपूर येथील भोगिलेल्यां दुःखाची आठवण मनांत उभी राहून दुराचारी वगैरे मंडळीचा कधीं सूड घेईन असें त्यास झालें होतें. परमेश्वर कृपेनें हातांत अधिकारहि चांगला मिळाला; तेव्हां आपले हेतु सिद्धीस नेण्यास ही संधी बरी आहे असा विचार करून एके दिवशीं विश्वसेनाबरोबर तो मृगयेस गेला असतां गाजीपूर येथील घडलेलें वर्तमान त्यास सविस्तर कथन केलें, तेव्हां त्यासहि त्याबद्दल फार वाईट वाटलें, व तो ह्मणाला, अशा दुष्टकर्मी लोकांस उत्तम शासन केलें पाहिजे. मर्जी असल्यास माझें सर्व सैन्य तुझ्या ताब्यांत आहे, त्यांतील सर्व लोक उत्तम लढाऊ मोठे शूर आहेत, तेव्हां त्याच्या साह्यानें दुष्टांचें पारपत्य कर. माझा ह्या कामीं तुला रुकार आहे. हें ऐकून गोपिनाथ ह्मणाला, महाराज माझाहि विचार तसाच होता; परंतु आपल्या अनुज्ञेशिवाय स्वतःच कांहीं करणें योग्य दिसत नाहीं. आतां आज्ञा झाली हें ठीक झालें. येथून गाजीपूर सुमारें शंभर कोश लांब आहे तेथें चाल करून जाऊन शत्रूवर अकस्मात छापा घालावा; असावध असल्यामुळें अनायासानें शत्रु हस्तगत होतील असें मला वाटतें. विश्वसेन ह्मणाला, गोपिनाथा तुला पाहिजे तसें आतां कर; मजकडून तुला मुभा आहे. जें करणें तें मात्र जपून कर ह्मणजे झालें. लांबीच्या पल्ल्यावर सैन्य नेणें आहे, ह्मणून प्रसंगीं तुला अपयश आल्यानें विपरीत होणार. हें ऐकून गोपिनाथ ह्मणाला, महाराज, आपल्या कृपेनें माझ्या बाहु युगुलांत असें कांहीं सामर्थ्य

आहे कीं रणांगणीं प्रत्यक्ष काळहि उभा राहिला, तरी त्याचीही दुर्दशा केल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या प्रमाणें बोलणें झाल्यावर गोपिनाथ विश्वसेनाबरोबर मदन-पुरींत आला. गाजीपुरावर स्वारी करण्याचा हेतु आपल्या हाता खालच्या निवडक, शूर लोकांस सांगून त्यांस तयारींत असण्याविषयीं हुकूम केला. थोड्याच दिवशीं सैन्याची उत्तम तयारी झाल्यावर संकेताप्रमाणें विश्वसेनाची आज्ञा घेऊन गोपिनाथानें गाजीपुरावर चाल केली. मजल दर मजल चालून दहावे दिवशीं सायं-काळीं गाजीपुरासन्निध येऊन ठेपला. जवळच एक मोठी आंबराई होती व बाजूनें नदी वहात असल्यामुळें ती जागा मुक्कामास योग्य आहे असें पाहून तेथेंच तळ द्यावा असा निश्चय करून सैन्यास तंबू ठोकण्याची आज्ञा केली; व आपण सायंकाळीं शांत मंजुल वायू वहात असल्यामुळें शत्रूवर हल्ला कधीं कसा करावा ह्याविषयीं विचार करीत बसला आहे, इतक्यांत त्यानें पूर्वींच तेथील व्यवस्थेविषयां भेद काढण्याकरितां जे गुप्त हेर पाठविले होते ते परत आले, व गोपिनाथास रामराम करून त्यांनीं कळविलें कीं महाराज इकडे सर्व नगरींत बेबंदशाई बनली आहे. राजापासून तो अखेर शिपायापर्यंत कामगार कैफांत नेहमीं धुंद असल्यामुळें प्रसंग पडल्यास संग्रामाची कांहींच तयारी नाहीं, तेव्हां अनायासानें यश प्राप्ती होईल. सरकार, हल्ला मात्र आतांच केला पाहिजे; कारण शत्रू अगदीं बेसावध आहेत. येथील प्रजा राज्यव्यवस्थेस व जुलुमास इतकी कंटाळली आहे कीं क्षणो-क्षणीं ते राजाचें अनिष्ट चिंतीत आहेत. प्रजेची जेथें

ाशी स्थिती असेल तेथें प्रसंगीं त्यांचे कडून राजास
दत मिळेल ही आशा नको. ह्याप्रमाणें तेथील कच्चें
र्तमान समजल्यावर गोपिनाथानें आपल्या हाताखालीं
सलेलें सैन्यांतील कमी दर्जाचे अंमलदार होते, त्यांस
के ठिकाणीं जमवून हुकूम केला कीं, आपले वेश
ालटून, शस्त्रें छपवून, त्या नगरच्या चारहि दिशांचे द-
वाज्यानीं कोणास संशय न येईल अशा बेतानें आंत शि-
रून सर्व शहरची देखरेख करून मध्य रात्रीचे सुमारास
ाजवाड्यासमूर सर्वांनीं हल्ला करण्याकरितां जमावें अशी
ास आज्ञा केली. आपल्या वरिष्ठाची अशी आज्ञा
ाल्यावर ह्या स्वामीनिष्ट लोकांनीं आपापले पोशाख पा-
ल्टून हत्यारबंद नगरांत शिरले. गोपिनाथहि त्यांचे मे-
ळ्यांत शिरून त्यांबरोबर नगरांत प्रवेश करिता झाला.
गोपिनाथाचे लोकांनीं आंतील व्यवस्था पाहून बंदोबस्त
किती आहे वगैरे अनुमान करून संकेत वेळेची वाट पहात
सले. मध्यरात्र झाली; जिकडे तिकडे अगदीं शांतता
ाली होती. राजवाड्याचे तटावरील पहारे करी "हुशार"
अशा शब्दांनीं मोठ्यानें आरडत असतां त्यांच्या दर
ाडोस होणाऱ्या आरोळ्या गोपिनाथाचे अनुयायांच्या
ानीं येत होत्या. अशा समयीं गोपिनाथ हल्ला कर-
ण्यास तयार होऊन निवडक शूर लोक पुढें घालून राज-
ाड्याचे मुख्य दरवाज्यापाशीं आला व "दिन" शब्द
करून आंत शिरण्याचे इराद्यानें तो पहारे कऱ्यावर ससैन्य
ुटून पडला. मग काय विचारावें ? अकस्मात ही गर्दी
कशाची झाली व हत्यारबंद होऊन आलेले हल्ला करणारे
लोक कोण, ह्या बद्दल त्यांचा कांहीं तर्क चालेना. तशांत

त्यांचीं हत्यारेंहि स्वच्छ नसल्यामुळें निरुपयोगी झालेलीं होतीं, ह्या मुळें हतवीर्य होत्साते मदनपूरच्या शूर विरांबरोबर संग्राम करीत असतां पराभव पावले. नंतर गोपिनाथ आपल्या लोकांसह राजप्रासादांत शिरला. कांहीं लोकांनीं किल्ल्याचे तटावर चढून मदनपूरच्या राजाचें निशाण किल्ल्याच्या मुख्य बुरुजावर लाविलें. ह्या प्रसंगीं तटावरील लोकांनीं कांहीं दगा आहे असें जाणून राजाच्या खाल्या अन्नाची कांहीं क्रिया राखावी ह्मणून निकर मांडिला, परंतु शूर व जिवावर उदार झालेल्या मदनपूरच्या विरापुढें त्यांचा काय टिकाव लागणार? किल्ल्यावरील बहुतेक लोक तर नष्ट झाले. ह्या गडबडीची बातमी दुराचारी महाराजांस मंदिरांत लागली. तेव्हां हें अरिष्ट एकाएकी कोठून आलें ह्या विषयीं त्यास कांहींच अनुमान करितां येईना. कैफांत गुंग असल्यामुळें प्रथम महाराजांचे डोळेच उघडतना; मग आल्या अरिष्टाचें अनुमान करण्यास त्यास कोठून सुचणार? परंतु महाराज, आतां तरी सावध व्हा, हा प्रसंग फारच विलक्षण दिसतो, ह्यांतून नुसते प्राण वांचणेंहि कठीण, वगैरे उद्गार सेवकजनमुखें कांनीं पडल्यावर महाराजांच्या नेत्रावरील कैफ लागलाच उडाला. त्यानें सेवकांस पुसिलें, कायरे, काय आहे त्याचा तपास करा पाहूं? हें ऐकून पिलाजी ( हुजऱ्या ) ह्मणाला, महाराज, मी आतांच वर आलों. सरकार, कांहीं भयंकर दगा आहे. शत्रू कोण, कोठील तें समजत नाहीं व त्यांनीं आपल्या बहुतेक शिबंदी लोकांस परलोक मार्गी लावून आपला किल्लाहि सर केला, असें वाटतें. ही भीतिप्रदवार्ता ऐकून जसा एखादा निद्रिस्थ मनुष्य दुष्ट स्व-

होतो अकस्मात जागृत होतो, तसा तो डोळ्यावरील धुंदी उतरून सावध झाला व काय आहे तें पहावें, ह्मणून प्रासादाचे गच्चीवर गेला: पाहिलें तों किल्ल्याचे तटावर एक मोठें निशाण फडकत आहे. ह्या गच्चीवरून, ती फार उंच असल्यामुळें, सर्व शहर दृष्टीस पडे. तटावर कांहीं हाल चाल नसून शहरांत एकच गर्दी उसळली आहे, मध्यें मध्यें मशालींचे उजेड चमकत आहेत, व गोपिनानाचा विजयध्वज शांतपणें फडकत आहे हें पाहून तो फार घाबरून गेला. आतां शांत बसून कांहीं उपयोगाचें नाहीं, असें पाहून त्यानें पिलाजीस गुप्त मार्गानें बाहेर पडून सेनापतीकडे जाऊन त्यास ह्याचा बंदोवस्त करण्यास सांग ह्मणून आज्ञा देऊन तिकडे पाठविलें व आपल्या वाड्याचा चांगला बंदोवस्त करण्यास सांगून आपण पुनः गच्चीवर जाऊन बाहेर काय होत आहे तें पहात बसला. थोडक्याच वेळानें पिलाजी परत आला. त्यास पहातांच दुराचारी ह्मणाला, कायरे, धीमतराव ( सेनापतीचें नांव ) तजविजीस लागले किंवा नाहीं? हा राजाचा प्रश्न ऐकून पिलाजी ह्मणाला, महाराज, कशाचें काय? ह्या गडबडीची बातमी धीमतरावास समजतांच ते सैन्य जमा करून बाहेर पडले; पण त्यांचा काय उपाय? आपल्या लोकांचीं हत्यारें नीट नसून शत्रूच्या एकल्या मनुष्याबरोबर आपले दहा असामी देखील युद्ध करण्यास धजत नाहींत. शहरांत युद्धसंग्राम इतका चालला आहे कीं शहरच्या रस्त्यांत मृत मनुष्यांचा खच पडल्यानें रणभूमिका मोठ्या भरभराटीस आली आहेशी दिसत्ये. महाराज, विचार करण्याची ही वेळा नव्हे. शत्रू तर आतां प्रासादांत शिरतील इतके

सन्निध आले आहेत. हा पहा वाड्याचें चौकांत त्याचा गलबला ऐकूं येत आहे. महाराज चला, त्वरा करा, आपले प्राण तरी वांचवा !

ही पिलाजीच्या तोंडची दुःखकारक वार्ता ऐकतांच आतां आपलें वैभव तर नष्ट झालें परंतु बहुमोल असे आपले प्राण तरी वांचवावे अशा बुद्धीनें कुमतीस ( भार्या ) हाक मारून ह्मणाला, प्रिये, आतां आपली व्यवस्था बरोबर दिसत नाहीं. शत्रूनें तर आतां आपणांस गांठिलें; परंतु मृत्यूनें गांठिलें नाहीं तोंपर्यंत प्राण वांचवावे हें बरें असें मला वाटतें; ह्मणून तुला आतां परमेश्वरावर हवालून मी बाहेर पडतों. हें ऐकून कुमति ह्मणाली, प्रिया, किती दिवसापासून मी तुह्मास ह्मणत होत्यें कीं मला माहेरीं पोहोंचवा, पण आपण तसें केलें कां ? शत्रूंच्या हातीं लागल्यें तर ते मेले दांडगे माझ्या जिवाचें काय करतील तें कळत नाहीं. पण, प्राणनाथ, ही धामधूम कशाची असें ह्मणत आहे तों पिलाजी तेथें आला व ह्मणाला, महाराज, शत्रू राजवाड्यांत शिरले; आतां ते येथें दाखल होतील. आपण आपला मार्ग चोखळा, नाहीं तर व्यर्थ त्यांचे हातीं सांपडून बंदींत पडाल. हें ऐकतांच धावरून तो उठला, व त्वरा करून राजवाड्याच्या मागील बाजूनें बाहेर पडण्याचा एक गुप्त मार्ग होता, त्यावाटेनें जाऊं लागला, तों गोपिनाथानें त्यास दुरून ओळखून जवळ असलेल्या लोकांस त्यास धरण्याविषयीं आज्ञा केली. त्यांनीं लागलेंच दुराचारी महाराजांस चतुर्भुज करून गोपिनाथा जवळ आणिलें. रात्र असल्यामुळें व फार दिवस गोपिनाथास पाहिलें नसल्यामुळें दुराचारी ह्यास त्याला ओळखितां

आले नाहीं, व आपण विजयी होऊन सर्व नगर हस्तगत झाल्यावांचून त्यास आपली ओळख देऊं नये अशी गोपिनाथाची इच्छा होती, ह्मणन मोठ मोठ्या बेड्या दुराचारी महाराजांच्या पायांत घालून गांवा बाहेरील आंबराईंत जेथें सैन्यानें तळ दिला होता, तेथें त्यास नेऊन एका तंबूत ठेवून त्यावर सक्त पहारा ठेवण्याची त्यानें आज्ञा केली. दुराचारी महाराज शत्रूचे हातीं सांपडल्याचें वर्तमान दुर्बुद्धी वगैरे लोकांस समजतांच त्यांनीं कांहीं सैन्य जमवून दुराचारी महाराजांची सुटका करण्याकरितां अखेरचा एक दीर्घ प्रयत्न केला; परंतु रणधुरंधर गोपिनाथाच्या शौर्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. गरीब बिचारे सैनिक मात्र व्यर्थ प्राणास मुकले, व अनयासानें दुर्बुद्धी वगैरे राज्ञःप्रियमंडळी गोपिनाथाचें हातीं सांपडली. ह्याप्रमाणें राज्यांतील सर्व मोठ मोठे कारभारी जे दुराचारी ह्याच्या प्रितीचे व त्याच्या दुष्ट कृत्यास अनुसरणारे होते ते पराभव पावून बंदींत पडले. पहाठ झाली तरी सर्व नगरींत गडबड चालली होती. प्रातःकाल होतांच मदनपूरचा राजा विश्वसेन ह्याच्या नांवाची द्वाही फिरवून दुराचारी ह्याचे प्रियमंडळांपैकीं कोणी हस्तगत होणें राहिले आहेत काय ह्मणून तपास केला; परंतु कोणी राहिला नाहीं, अशी खातरी झाल्या नंतर आपल्या शिबंदी लोकांचा बंदोबस्त किल्यावर व शहरांत ठेवून गोपिनाथ छावणींत आला. तो येतांच त्याच्या हाताखालील अधिकारी व सर्व सैनिक झाल्या विजयाबद्दल हर्ष होतसाते त्यास मुजरा करण्या करितां आले. गोपिनाथानें उत्साहभरित वृत्तीनें त्यांचे मुजरे घेउन आपापल्या ठिकाणीं त्यांस जावयास सांगितलें. नंतर सर्व बं-

दिवानास आपल्या समूर आणण्या विषयीं त्यानें आज्ञा केली. दुराचारी, दुर्बुद्धि वगैरे लोक त्याच्या पुढें येऊन उभे रहाताक्षणींच परस्परांची ओळख पटली. ते आपसांत ह्मणूं लागले कीं, ज्या गोपिनाथास निर्धन करून आपल्या नगरांतून हद्दपार केलें होतें तो इतका बलाढ्य कसा झाला, हें सर्व सैन्य त्यानें कोठून आणिलें, किंवा तो-स्वतः राजा झाला वगैरे विचार त्यांचे मनांत घोळूं लागले व त्यास, दिल्या दुःखाची खंती वाटून, त्याचे समूर ते अधोवदन झाले. नंतर गोपिनाथ दुराचारी वगैरे मंडळीस हाक मारून ह्मणाला, महाराज, आपण सर्वांनीं मला ओळखिलें काय ? मी आपला गोपिनाथ बरें ! परमेश्वर कृपेनें हा दुर्घट प्रसंगांतहि नष्ट न होतां आपणा सर्वांस ह्या वैभवांत ठेविण्यास अद्यापि जिवंत राहिला आहे. आ-तां आपली स्वारी मदनपूर येथें आमचे बरोबर येणार. तेथें आल्यावर मग आपल्या वर्तनाचा विचार होणें तो होईल. आतां सर्वांनीं स्वस्थ असावें असें सांगून त्यांस बंदोबस्तानें निरनिराळ्या जागीं ठेविण्याची आज्ञा केली. ह्या बंदिवान मंडळींत दुराचारी याची भार्या कुमतिहि होती. गाजीपूर येथील रणसंग्राम पूर्ण होऊन आतां आ पणास मदनपुरींत लवकरच गेलें पाहिजेअसें समजून गो-पिनाथानें तेथील सर्व सभ्य लोकांच्या भेटी घेतल्या. त्याच्या मित्रमंडळीपैकींहि कांहीं राहिले होते; त्या सर्वांनीं जेव्हां गोपिनाथास अशा मोठ्या वैभवास चढलेलें पाहिलें तेव्हां त्यांस त्याच्या हुशारीचा फार विस्मय वाटून ते त्याची तारीफ करूं लागले. गोपिनाथानें नंतर किल्ल्याच्या व शहरच्या रक्षणाकरितां कडवे शूर लोक ठेवून, राजाचे

जिन्याची मोजदाद करून, तसेंच सरकारी दफ्तर, जवाडा, वगैरे ठिकाणीं पहारे ठेवून आपण मदनपुरीची ाट धरिली. आपणास यश मिळालें व दुराचारी वगैरे डळीस बंदिवान केलें ह्याबद्दल पूर्वींच त्यानें विश्वसेनास ासुदांच्या द्वारें संदेश रवाना केला होता. गाजीपूर थील सर्व व्यवस्था आटोपल्यावर थोड्याच दिवशीं गोपिनाथ मदनपुरींत दाखल झाला. तेच दिवशीं गाजीपूर येथील आणलेल्या बंदिवानास राजापुढें उभे केलें, गोपिनाथानें थोडक्यांत दुराचारी, दुर्बुद्धि वगैरे लोकांनीं आपणांशीं कशी वर्तणूक केली होती ह्या बद्दल हकीकत सांगितली. ती ऐकून विश्वसेनास फार वाईट वाटलें, तो ह्मणाला, गोपिनाथा उद्यां ह्यांच्या अपराधाची चौकशी दरबारांत होईल; मग ज्यांचीं जशीं कृत्यें तसें त्यास फळ मिळणार आहे, तूं कांहीं काळजी करूं नको; स्वस्थ ऐस.

ही व्यवस्था होत असतां तेथें बंदिवान पहाण्यास विश्वसेनाची कन्या वसुमती आली होती. ती उपवर झाली असून गोपिनाथाचे सद्गुण तिच्या कर्णरंध्रीं गुणगुणूं लागले होते; परंतु अद्यापि तिनें त्यास पाहिलें नव्हतें. गोपिनाथाचें स्वरूप पाहून व मिळविलेल्या यशाची त्याची कीर्ति ऐकून ती फार मोहित झाली, व गोपिनाथा बरोबर आपला विवाह झाल्यानें आपण सुखी होऊं असे विचार तिच्या मनांत वागूं लागले.

दुसरे दिवशीं नेमिल्याप्रमाणें गाजीपूर येथून आणिलेल्या बंदिवानाची चौकशी सुरूं झाली. दोन तीन दिवस चौकशीचें काम चालून अखेर ते सर्व दोषी ठरले

व त्यांस जन्मभर अंधार कोठडींत ठेवावें अशी कडक शिक्षा राजानें केली. ह्या प्रमाणें दुर्बुद्धि वगैरे गाजीपूरच्या मंडळीची व्यवस्था लागल्यावर राजानें मोठा दरबार भरून सर्व लोकांसमक्ष गोपिनाथाचे शौर्यादि सद्गुणाची तारीफ केली व शेवटीं त्यास मोठमोठ्या पदव्या देऊन गाजीपूर येथील राज्य व्यवस्था पहाण्यास आपल्या वतीनें नेमिलें. नंतर थोड्याच दिवशीं विश्वसेनाची आज्ञा घेऊन सेनेचा अधिकार आपल्या हाताखालीं असलेला कारभारी दौलतराव ह्यास देऊन आपण गाजीपूर येथें चालता झाला. ह्या प्रमाणें गोपिनाथ मदनपूरच्या राजाच्या ताब्यांतील मोठा संस्थानिक बनला.

गोपिनाथाचें जाणें वसुमतीच्या विरहास कारण झालें. त्याच्या चिंतनानें तिनें अन्नसुखोपभोगादि वर्जिले; ते इतके कीं ती वार्ता तिचे मातापितरांच्या कानावर आल्यावांचून राहिली नाहीं. त्यांनीं तपास करितां जेव्हां आपल्या कन्येची स्थिती अशी होण्यास गोपिनाथ कारण आहे असें समजलें तेव्हां त्याची हुशारी समक्ष पाहिली असल्यामुळें, कन्यासमर्पण करण्यास हा पात्र आहे असें जाणून तिच्या मनोदया प्रमाणें करण्याचें त्यांच्या मनांत आलें; व वसुमतीस बोलावून आणून विश्वसेनानें ह्मटलें, तुझे मनोगत आह्मास अवगत झालें आहेत. तुझी प्रीति सत्पात्रीं बसली हें पाहून आह्मास फार आनंद वाटतो. थोड्याच दिवसांनीं तुझें लग्न गोपिनाथाबरोबर करून देऊं बरें; आतां स्वस्थ ऐस. आपल्या मनोदयाची दाद लवकरच लागली, व त्याप्रमाणें थोडक्याच दिवसांनीं घडून येईल अशी तिची खातरी झाल्यावरून ती स्वस्थ झाली.—

गोपिनाथ गाजीपुरास येऊन विश्वसेनानें सोंपविलेला कारभार मोठ्या दक्षतेनें करूं लागला.

इतक्या ह्या महत्वाच्या घडामोडी होतांना चार महिने लोटले. वाचकहो, आतां शंखचूड ह्यानें कन्येच्या स्वयंवराविषयीं केलेल्या संकेताकडे वळूं. मीनकेतन नवमालिका ह्या उभयतांचीं मनें स्वयंवराचा दिवस कधीं नेमितात इकडे लागलीं.

आतां दिवस थोडे राहिले असें पाहून शंखचूड ह्यानें ज्योतिष्यांस बोलावून आणविलें व तिथीचा निश्चय करून त्याविषयीं अमरपुरींत धनंजयास सूचना पाठविली. तीं दाखल होतांच मीनकेतनास जो आनंद झाला, त्याचें वर्णन हे करितां येत नाहीं. उमाकांतास आपला मित्र सुखी होणार ह्मणून फार समाधान वाटलें. हेमनगरींत तर फारच गडबड उडाली होती. शंखचूड ह्यांस हे एकच अपत्य, पुढें असा समारंभ आपल्या घरीं होण्याची आशा नाहीं, असें जाणून खर्चाविषयीं मागें पुढें पाहिलें नाहीं. त्यानें अजू बाजूचे राजे व मित्र मंडळी ह्यास नवमालिकेच्या स्वयंवराची निश्चित तिथी कळवून त्यासमयीं यावें ह्मणून परमानंदानें त्यांस कुंकुमपत्रें पाठविलीं. त्या वेळची हेमनगरीची शोभा अशी कांहीं प्रेक्षणीय होती कीं साक्षात् वैकुंठच हेमनगरीच्या रूपानें भूतलावर उतरलें आहे कीं काय, असा भास प्रेक्षकांस होई. स्वयंवरमंडप इतका शोभायमान केला होता कीं, ज्या कोणी पूर्वीं तशी शोभा पाहिली नाहीं, त्यास साक्षात् पुराणीं वर्णिलेली मयसभाच आहे कीं काय असें वाटून त्यांची मतीच चकित होईल. सारांश, ह्या नगरीचें अशा समयीं कितीहि वर्णन केलें तरी तें

थोडेंच. असो; जसजशी स्वयंवर तिथी जवळ येत चालली, तसतसे देशोदेशीचे राजे तेथें येऊं लागले. शंखचूड ह्यानें त्यांच्या मानाप्रमाणें सर्व सोई पूर्वींच लावून ठेविल्या होत्या व त्याच्या कुंकुमपत्रानें राजे लोकांत बरीच हाल चाल सुरूं झाली होती.

ह्या हेमनगरीच्या उत्तर दिशेस थोड्याच अंतरावर रत्नसार ह्या नांवाचें एक नगर होतें. तेथें उग्रसेन ह्या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याचा बाप देवसेन ह्याचा व शंखचुडाचा स्नेह होता. राज्यांत शांतता असून महत्वाचीं कामें नसल्यास ते परस्परांकडे जात येत असत. शंखचूड रत्नसारपुरींत गेला ह्मणजे उग्रसेन त्याच्या दृष्टीस पडले, व त्यास नवमालिका कन्या झाल्याचे देवसेनानें ऐकिलें होते ह्मणून उभयतां मित्र "आपलीं मुलें जाणतीं झाल्यावर त्यांचें स्वयंवर करूं, ह्मणजे अन्यस्थल शोधण्याचें कारण नाहीं" असें थट्टेत ह्मणत. पुढें कांहीं वर्षांनीं देवसेन निवर्तला, तेव्हां उग्रसेन ह्याचें वय राज्यकारभार पहाण्यासारखें झालें नव्हतें.

देवसेनाच्या अंतकालीं शंखचूड हा तेथेंच होता, त्यास आपले जवळ बोलावून आणून त्यानें सांगितलें, मित्रा, मी आतां ह्या जगाचा थोडे वेळाचा सोबती आहे. मृत्यूनें आतां अगदीं गांठिलें आहे, तुला माझें इतकेंच सांगणें आहे कीं माझे मागें तूं ह्याचें व माझ्या राज्याचें रक्षण कर; असें बोलून त्यानें प्राण सोडिला. नंतर खऱ्या स्नेह भावानें त्याचें वचन पाळून उग्रसेन सज्ञान झाल्यावर त्याचे स्वाधीन शंखचूड ह्यानें त्याचें राज्य केलें. प्रथम उग्रसेनानें नितीनें राज्य कारभार चालविला; परंतु पुढें वाईट

संगतीमुळें त्याची चाल इतकी बिघडली कीं दुराचारी ह्याचे वर्तनहि त्याचे पेक्षां शतपट बरें असे ह्मणण्यास हरकत राहिली नाहीं. ह्या त्यांच्या दुर्वतनामुळें शंखचूड ह्याची त्याजवर फारच अप्रीति झाली होती; तथापि त्याची सत्ता इतकी वाढली होती कीं आजू बाजूच्या लहान लहान राजाशीं समर करून त्यांस त्यांनीं आपले ताबेदार करून ठेविले होते. फार काय परंतु शंखचूडहि त्याचे कृत्यास वचकून होता. आतां आपण शंखचूडापेक्षांहि श्रेष्ठ झालों असें मानून नवमालिकेचे पाणी ग्रहणार्थ त्यानें बोलणें चालविलें होतें, व जरी तो असा दुष्कृती होता, तरी त्यास रुकाराचें अथवा नकाराचें उत्तर शंखचूड ह्याच्यानें देव-वेना. नवमालिका त्याचें नांव देखील काढूं देत नसे, ह्या मुळें शंखचूडास मोठा विचार पडला कीं, उग्रसेनाची निराशा करून मीनकेतनास मुलगी दिल्यानें, न जाणो, कदाचित् अनर्थ होईल; तथापि नवमालिका उग्रसेनास दिल्यानें तिच्या व जनांच्या दूषणास आपण पात्र होऊं. तेव्हां असा दोहोंकडून होणारा दूषणाचा भार शिरीं व-हाण्यापेक्षां मीनकेतनास तिला समर्पण करूं, मग उग्रसेन काय करितो तें पहावें असा विचार करूनच त्यानें नव-मालिकेच्या बोलण्यास रुकार दिला होता, व कदाचित् विपरीत झाल्यास पुढें अडचण येणार, तेव्हां अगोदरच सैन्याची सिद्धता करून ठेवावी असा विचार करून त्यानें सर्व तजवीज करून ठेविली होती.

शंखचूड ह्याचें कुंकुमपत्र उग्रसेनाच्या हातीं लागतांच त्यास शंखचूड ह्याच्या कृतीचा मोठा राग आला; तथापि त्याची शक्ति उग्रसेनास माहित होती, ह्मणून हल्ला करून

निकर करण्याचें उग्रसेनाचे मनांत येईना. तशांत उग्रसेनानें गुप्तपणें तपास काढिल्यावर शंखचूड हाही तयारींत आहे असें जेव्हां त्यास कळलें तेव्हां आतांच दांत खाऊन अवलक्षण करण्याप्रमाणें करूं नये, असा त्याचा विचार ठरला. आतां मीनकेतनाची त्यास माहिती नव्हती खरी; तथापि तो कितीहि बलाढ्य असला तरी पुढें मागें त्यास भवचक्राच्या फेऱ्यांत गांठून त्याचा सूड घेऊं, असा विचार करून तो हेमनगरींत नवमालिकेच्या स्वयंवरास जाण्याच्या तयारीस लागला, व नेमिल्यावेळीं तो तेथें दाखल झाला. आजूबाजूचे राजे तर पूर्वींच आले होते, व अमरपुरीहून धनंजय व उमाकांत ह्यांसह मीनकेतनहि शंखचूड ह्याच्या सूचनेप्रमाणें तयारीनिशी आला होता. निश्चित वेळा येऊन ठेपली तशी वधुवरांची मोठी गडबड उडाली, नवमालिकेनें सर्वांसमक्ष मीनकेतनाच्या गळ्यांत माळ घालून इच्छित वरप्राप्ति करून घेतली. पहा परमेश्वरी सूत्र काय अगाध कीं तेच दिवशीं गाजीपूर संस्थानिक गोपिनाथ हा विश्वसेनाची कन्या वसुमती हीस वरिता झाला. ह्या प्रमाणें उभयतां मित्र भिन्न भिन्न स्थलीं एकेच दिवशीं इच्छित भार्येची आपणास प्राप्ति करून घेऊन सुखी झाले.

रसज्ञ वाचकहो, ह्या शंखचूड राजास पुत्र नव्हता ह्मणून मी मागें लिहिलें आहे, तें तुह्मास आठवत असेलच. शंखचूडाचें वय कांहींसें उतार झाल्यामुळें व राज्यव्यवस्थेचें काम त्याचे हातून वेळच्यावेळीं नीट होत नसल्यामुळें आतां हा सर्व भार मीनकेतनाचे हवालीं करून आपण तीर्थयात्रेस जावें व अवशिष्ट आयुष्य परमेशचिंतनाचे कामीं लावून आपल्या देहाचें सार्थक करून घ्यावें असे विचार

त्याचे मनांत येऊं लागले. आपल्या मंत्री वगैरे कामगारांचा त्यास ह्या कामीं सल्ला मिळाल्यावर सुमुहूर्ते पाहून मीनकेतनास राज्याभिषेक करविला. ह्याप्रमाणें राज्यकारभार तरूण दंपती मीनकेतन व नवमालिका ह्यांचे स्वाधिन करून त्यांस सर्व प्रकारें प्रजेचें कल्याण करा, वगैरे सदुपदेशाच्या व अवश्य लागणाऱ्या गोष्टी सांगून आपण चालते झाले.

शंखचूड भार्येसह तीर्थयात्रेकरितां गेला ही बातमी रत्नसार नगरांत उग्रसेन यास लागली; तथापि मीनकेतनाच्या विशाल व विमल सद्गुणाची व शौर्याची कीर्ति चोहींकडे पसरली असल्यामुळें त्याच्याशीं समर करूं गेलें असतां खचित आपणास यश मिळणार नाहीं अशी त्याची खातरी होती. अशी जरी हेमनगरी येथील स्थिती होती तरी नवमालिकेविषयीं अभिलाश त्याचे मनांतून नाहींसा झाला नव्हता. कशी तरी संधी साधून मीनकेतनास पदच्युत करून त्यास बंदींत ठेवून नवमालिकेस आपल्या हस्तगत करावें, असे विचार उग्रसेनाच्या मनांत सदैव वसत होते. त्यानें पुष्कळ वेळां गुप्त बातम्या काढून बऱ्याच खटपटी केल्या, परंतु मीनकेतनाच्या अतुल शौर्यापुढें त्या सर्व निष्फळ झाल्या. अशी निराशा झाल्यामुळें, व नवमालिकेच्या दुःसह विरहाच्या वेदना त्यास नेहमी होत असल्यामुळें तो झुरणीस लागला होता. ही त्याची स्थिती पाहून त्याच्या मित्र मंडळीस मोठी काळजी पडली कीं उग्रसेनाचे मनोरथ लवकर सिद्धीस गेले नाहींत तर त्याच्या विरहाचा खास अनिष्ट परिणाम होणार. ह्या रत्नसार नगरींत पापबुद्धि ह्मणून एक निर्धन वृद्ध ब्राह्मण रहात होता, त्याचा व उग्रसेनाचा फार स्नेह होता. हा

पापबुद्धि असा कांहीं मतलबी होता कीं साहस कृत्यांत उग्रसेन नेहमीं त्याचा सल्ला घेतल्यावांचून कोणतीहि गोष्ट करीत नसे. शिवाय हा फार व्यसनी असून राजाची त्याजवर प्रीति असे. एके दिवशीं पापबुद्धि कैफाचे तारेंत आहे असें पाहून उग्रसेनानें त्यास आपलें मनोगत विदित केलें तेव्हां तो ह्मणाला, उग्रसेना, इतकेंच ना! ह्यांत कठीण तें काय? मीनकेतनास हस्तगत करण्यास थोडी युक्ति आहे "तूं असें कर कीं हुशार गुप्त हेर पाहून हेमनगरींत पाठीव व मीनकेतन मृगयेस कधीं जाणार तो भेद त्यांचे द्वारें काढीव ह्मणजे झालें. राजेलोक शिकारीस जातात तेव्हां बरोबर फारसें सैन्य घेऊन जात नाहींत; अशी संधी पाहून गुप्तपणें निवडक लोकांनिशीं त्यावर हल्ला करून त्यास हस्तगत करावें ह्मणजे नवमालिका हातीं लागण्यास उशीर तो काय लागणार" ही त्याची युक्ति ऐकून उग्रसेनास परमानंद झाला. गुप्त हेर त्याचे पदरीं होतेच; त्यांस तावडतोब हेमनगरींत रवाना करून तिकडील बातमी काढण्याची खटपट त्यानें सुरू केली. थोडक्याच दिवशीं जासूद परत आले व "महाराज आजपासून पांचवे दिवशीं मीनकेतन येथून जवळच एक घोरवन नामक वन प्रदेश आहे त्यांत मृगयेस जाणार आहे" ह्मणून सांगितलें. मग उग्रसेनास जो आनंद झाला तो काय सांगावा? त्यानें लागलेंच त्यांस उत्तम बक्षीस देऊन सेनापतीस बोलावून आणून त्यास आपला संकेत कळवून सैन्य तयार करण्याची आज्ञा केली. नियमीत दिवशीं प्रातःकाळीं उठून लोक बरोबर घेऊन ससैन्य तो घोरवनांत जाता झाला. अस्तमानपर्यंत बऱ्याच अंतरावर राहून

दवा धरून बसून सूर्य अस्ताचलाखालीं गेल्यावर त्यानें मीनकेतन ज्या ठिकाणीं तळ देऊन राहिला होता त्यावर छापा घातला. एकच गर्दी पाहून मीनकेतन घाबरला. शत्रू कोठील कोण ह्याचें त्यास कांहींच अनुमान करितां येईना. अखेर आतां उगाच विचार करून उपयोग नाहीं असें पाहून त्यानें आपल्या अनुयायांस शत्रूवर पडण्याची आज्ञा केली. उभय पक्षांची बरीच चकमक झडली. मीनकेतनाचे लोक शूर होते खरे, परंतु उग्रसेनाकडील वीर तसेच लढाऊ असून पुष्कळ होते, ह्यामुळें मीनकेतनाचा इलाज चालेनासा होऊन तो उग्रसेनाचे हातीं सांपडला. त्यानें मीनकेतन व इतर राहिलेल्या मंडळीस रत्नसार येथें बंदीवान पाठवून आपण पुष्कळ सैन्य बरोबर घेऊन हेमनगरीवर चाल करून गेला.

आतां हेमनगरीविषयीं विचार करणें जरूर आहे. नवमालिका हिची कीर्ति तिच्या बाल्यावस्थेपासून त्या नगरींत व भोवतालच्या प्रदेशांत कशी विस्तृत झाली होती हें वाचकांस विदित आहेच. तशांत ती आतां आपल्या पित्याच्या सर्व राज्याची मालकीण व मीनकेतनाची भार्या झाली होती; तेव्हां तिची कीर्ति किती गाजली असेल ह्याचें अनुमान तुह्मीच करा. प्रजापालनीं हीं उभयतां नेहमीं दक्ष असत व मीनकेतनाचे कारकिर्दीत प्रजाजन जसें सुखअनुभवूं लागले होते तसें पूर्वी त्यांनीं कधींच अनुभविलें नव्हतें, असें सर्व कबूल करीत. हीं उभयतां त्यांचें आपत्यवत् पालन करीत ह्मणून ह्यांचे ठायीं त्यांची अमर्याद निष्ठा असे व त्यामुळेंच ते प्रत्यहीं ह्या उभयतांचें परमेश्वरापाशीं अभिष्ट चिंतीत; परंतु जगांत कोणतीहि स्थिती सतत चालत

नाहीं. तींत कांहीं ना कांहीं तरी बदल होतोच ; व अशी स्थिती प्रस्तुत उग्रसेनाच्या नवमालिका प्राप्त्यर्थ होणाऱ्या अत्युग्रतृषेमुळें होण्याचा समय आला.

आतां सूर्योदय होण्याची वेळा होत आली होती. निद्रिस्थ लोक जागृत होऊन आपापल्या उद्योगास लागणार, अशा समयीं उग्रसेनाच्या तोफा व सैन्य नगराचे तटाखालीं येऊन धडकलें. नगराचे तटावर गस्तीचे लोक फिरत होते, त्यांनीं हें सर्व पाहून हें काय बंड आहे, त्याचा तपास करण्यासाठीं पुढील दरवाज्यावर जमले, तों तोफांचे आवाज होऊं लागले. किल्ल्याचे तटास तोफांचे गोळे लागत व कांहीं तटावरून आंतहि आले असें पाहून चारहि दिशांचे दरवाजे बंद करून त्यावर पुष्कळ लोक नगराचे बचावाकरितां बसून थोडे लोक, कांहीं दगा आहे असें समजून, किल्लेदारास व सेनापतीस आल्या अरिष्टाची बातमी कळविण्याकरितां गेले. विचार करण्यास तर वेळ मुळींच नव्हता. सेनापती व प्रधान वगैरे कारभारी व नगरवासी जन लहान थोर सुद्धां सशस्त्र समरंगणांत दाखल झाले. नगराचे सर्व तटावर लढाऊ शूर लोक चढवून चारहि दिशांस तोफा रोखिल्या व सोडिल्या, त्यामुळें उग्रसेनाचे बरेच लोक पडले ; तथापि त्यांस इतकी विरश्री लोटली होती कीं ते तशा प्रखर मारासहि जुमानीतनासे झाले. दोन प्रहराचे सुमारास दोन तीन ठिकाणीं नगराचा तट कोसळून शत्रूंस आंत शिरण्यास मार्ग मिळाला. ही बातमी नगरवासी जनांस कळतांच जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. शत्रू तर अधिक निकरानें लढूं लागले. ही बातमी नवमालिकेस कळतांच

तिनें राजवाड्याचा मजबूत बंदोबस्त करवून आपण आंत बसली. मीनकेतन संकेताप्रमाणें आला नाहीं, अशा समयीं तो असता तर हें अरिष्ट आलें नसतें, वगैरे विचार तिच्या मनांत येऊन ती खिन्न वदन बसली, इतक्यांत विजय तिकडे येऊन डोळ्यांत आंसवें आणून ह्मणाला, बाईसाहेब आमचें सर्व भांडवल बुडालें, सर्व वैभव नष्ट झालें. हें ऐकून घाबरी होऊन नवमालिका ह्मणाली, बा विजया झालें तरी काय? अरे स्पष्ट सांग; मला असें अर्धवट बोलून संशय सागरांत लोटूं नको. हे तिचे कोमल शब्द ऐकून त्याचा गळा दाटून आल्यामुळें प्रथम त्याच्यानें कांहीं बोलवेना; तथापि तसेंच रडें आवरून त्यानें मीनकेतन उग्रसेनाच्या हातीं सांपडल्याचें व त्यास बंदीवान करून रत्नसार येथें नेल्याचें वर्तमान व उग्रसेनाचा हेमनगरीवर स्वारी करण्याचा उद्देश तीस सांगितला; तें एकतांच तिनें रडून आकांत केला. ही तिची स्थिती पाहून तिच्या सख्यांनीं व शिष्ट वर्गांनीं तीस सांगितलें, बाईसाहेब, असा शोक करूं नका. महाराज बंदींत असले तर काय झालें? आपल्या लोकांनीं निकराची खटपट सुरू केली आहे. ह्यांत उग्रसेनाचा पराभव झाला ह्मणजे महाराजांच्या मुक्ततेविषयीं तजवीज करणें कांहीं अवघड नाहीं. शांत व्हा, अंमळ धीर धरा. परमेश्वर तुमचें कल्याण करील.

ह्याप्रमाणें नवमालिकेची समजूत करीत आहेत तों सकरुण नांवाचा राजसेवक तेथें आला व ह्मणाला, बाईसाहेब आपल्या सैन्याचा मोड झाला व लोक दाहीदिशेस पळत सुटले आहेत. बाईसाहेब, आतां महाराजांविषयीं काळजी करणें ती एकीकडेसच राहिली, परंतु तुमचेविषयीं काळजी

आमचे सर्वांचे मनांत मूर्तिमंत उभी राहिली आहे. शत्रूचा ह्या नगरीवर हल्ला करण्याचा सर्व रोख आपणामुळें आहे. परमेश्वर आपली व आमची अब्रू रक्षण करो ह्मणजे झालें. सकरूण इतकें ह्मणत आहे तों राजप्रासादांत कांहीं गलबला झाल्याचें तिनें ऐकिलें. त्यावरून घाबरी होऊन तिनें पुसिलें, कारे सकरूणा, हा गलबला कशाचा तें पाहून ये जा कसा! आज्ञा बाईसाहेब, असें ह्मणून सकरूण खालीं जाणार तों विजय घाबरलेला असा त्यास भेटला व ह्मणाला तूं बहुतकरून ह्या गलबल्याच्याच तपासाकरितां खालीं जात असशील नाहीं बरें? सकरूणानें होय ह्मटल्यावर विजय ह्मणाला, बाबारे, आतां खालीं जाण्याची वेळ नाहीं; मी हाच तिकडून आलों. चल, बाईसाहेब कोठें आहेत त्या मला दाखीव. हें ऐकतांच सकरूण विजयास बरोबर घेऊन नवमालिकेच्या महालीं गेला. विजय दृष्टीस पडतांच तिनें गलबला कशाचा ह्मणून प्रश्न केला. तेव्हां विजय ह्मणाला, बाईसाहेब ही बोलण्याची वेळ नाहीं. उठा लवकर तुमच्या सुटकेची कांहीं तजवीज न केली तर शत्रूच्या हातून तुमची अवस्था काय होईल ती कळत नाहीं. बाई साहेब, हें सर्व कारस्थान त्या उग्रसेनाचें आहे. त्यानेंच आपल्या सरकारांस कैद करून आपलेविषयीं मनांत अभिलाश धरून ह्या नगरीवर स्वारी केली आहे शत्रूचे लोक आपल्या वाड्यांत शिरले, परंतु उग्रसेन अद्यापि येथें आला नाहीं तों पर्यंत मागील दरवाज्यानें बाहेर पडून झाल्यास आपल्या सुटकेची तजवीज करा. चला आतां विलंब करून उपयोग नाहीं. बाईसाहेब, मजविषयीं आपला भरंवसा कायम असूंद्या. आपल्यावर दुर्घट प्रसंग आला तरी काळजी

करूं नका. हा विजय आपल्या जवळ आहे असें समजा!

हें वर्तमान ऐकतांच ती फार भयाभीत झाली व ह्मणाली, परमेश्वरा, तुझ्या दरबारीं न्याय आहे असें लोकांचें ह्मणणें अगदीं मिथ्या आहे असें मला वाटतें; कारण दुराचारी मनुष्याचे मनोगतास तूं साह्य करितोस व न्याय नितीनें पाप पुण्यास भिऊन चालणाऱ्या प्राण्यावर तूं असे दुर्घट प्रसंग आणितोस. मला माझ्या जिवाची काळजी वाटत नाहीं परंतु त्या बहुमोल प्राणाची ह्या दुष्टानें काय बरें व्यवस्था केली असेल? अधमाधमा दुष्टा उग्रसेना माझ्या क्षुद्र लाभासाठीं त्या प्राण्यावर तूं असा प्रसंग आणिलास ना! चांडाळा, माझ्या लाभाची इच्छा स्वप्नीं देखील आणूं नको असें ह्मणून ती उठली. विजय पुढें झाला व ती त्याचे मागून मागील रस्त्यानें खालीं उतरली. शत्रुचे हातीं लागल्यावर आपली दुर्दशा होणार असें जाणून ती ह्मणाली, आपली अप्रतिष्ठा होण्यापेक्षां प्राण गेला तरी हरकत नाहीं. आत्महत्येचा दोषाहि मी आनंदानें शिरीं वाहीन परंतु त्या मेल्या उग्रसेनाचें तोंड देखील पहाण्यास मी खुशी नाहीं. असें ह्मणून ती वाड्याच्या मागील बाजूस विहीर होती तिकडे वळली. मीनकेतनाच्या विरहानें होणारी व्यथा, व उग्रसेनाच्या हातीं लागल्यावर आपली अप्रतिष्ठा खास होईल असेविषयींचे विचार मनांत येऊन तिला, आपले प्राण जातील तर बरे, असें वाटूं लागलें; इतक्यांत वाड्याचे मागील बाजूस गर्दी झाल्याचें तिनें पाहिलें. त्यावरून उग्रसेन आला खरा, आतां ह्या नश्वर प्राणाची आशा धरून उपयोगाची नाहीं, ह्मणून नवमलिका विहिरीच्या कांठावर

गेली. तिनें आंत डोकावून पाहिलें तो विहिरीचें पाणी फारच भयंकर दिसलें. एकाएकीं उडी घालण्यास तिला धीर होईना ह्मणून परमेश्वर चिंतन करून देवा तुझे स्वाधीन मी आपले प्राण करितें, ह्याचा लवकर अंत करून तूं आपल्या अविनाश, विमल चरणापाशीं मला ने असें ह्मणून कास मारून, तोंडावरून पदर घेऊन, विहिरींत उडी घालणार तों उग्रसेनानें तिचा हात धरिला. आपला हात धरणारा हा कोण बरें असावा, अशी जिज्ञासा तिचे मनांत उत्पन्न होऊन तिनें मोठ्या उत्कंठेनें आपल्या तोंडावरील पदर एकीकडे करून पाहिलें तों उग्रसेन तिच्या दृष्टीस पडला. त्याला पहातांच तिच्या अंतःकरणांत भयाची धडकी भरली. आतां ह्याचे हातीं लागलें असतां आपली दुर्दशा केल्यावांचून हा रहाणार नाहीं अशी तिची खातरी झाल्यामुळें धमकी देऊन ह्याल्यास आपल्या सुटकेविषयीं यत्न करावा असें तिच्या मनांत आलें, व ती त्यास मोठ्या त्वेषानें ह्मणाली, अनार्या मदांधा उग्रसेना, परस्त्रीचा हात धरण्यास तुला लाज कशी नाहीं वाटत! यःकश्चित माझ्या अभिलाशामुळें तूं हें निंद्य व दुर्घट कृत्य करण्यास तयार झालासना! धिःकार असो तुझ्या कुलशीलास आणि नांवास! आतां तुझ्या मनाची तर राहिलीच परंतु जनाची व परमेश्वराची तरी भीति बाळगून कांहीं न्यायान्याय मनांत आण व माझा हात सोड; असें ह्मणून तिनें स्वकर मोचनार्थ दीर्घ प्रयत्न केला, परंतु उग्रसेनानें तो फारच घट्ट धरिल्यामुळें सुटणार कोठून? ह्या प्रमाणें नवमालिकेचा निरुपाय झाल्यामुळें ती अधोवदन व दीन झाली. ही तिची स्थिती उग्रसे-

नें पाहून त्यास हासें आलें व तीस संबोधून तो ह्मणाला, ये, आतां व्यर्थ संतापून तुझी ही सुंदर पीतवर्ण तनु ग्नितप्त सुवर्णाप्रमाणें आरक्त कां करित्येस? आतां तूं ख्य सागरीं पडलीस असें समज. ज्या दुष्टा मीनकेत-नें असें हें स्त्रीरत्न वळकाविलें होतें, त्यास रत्नसारपुरींत तांच प्रथम चंडशासन करीन, ह्मणजे तुला त्याची भीति ळगण्याचें कारण रहाणार नाहीं; मग तर तुझ्या सुखास रावार नाहींसा होईल; आतां तूं स्वस्थ रहा ह्मणजे झालें.

हें उग्रसेनाचें भाषण ऐकून नवमालिका निरुत्तर झाली. तां हा चांडाळ ह्मटल्याप्रमाणें आपल्या प्रियाचें काय रील कोण जाणे, अशी भीति तिचे मनांत उत्पन्न हो-न तिला कांहीं सुचेनासें झालें. नवमालिका आपल्या स्तगत झाली, आतां पुढें संग्राम करण्याचें कारण राहिलें हीं असें जाणून तो रत्नसार येथें जाण्यास निघाला. डयाच दिवशीं सैन्यासह उग्रसेन आपल्या राजधानींत खल झाला. रत्नसार येथें येतांच त्यानें मीनकेतनास क्त बंदींत ठेवून नवमालिकेस आपल्या बागेंतील महा-लांत नेऊन ठेविलें.

आधींच मीनकेतनाचा विरह हेमनगरींतील लोकांस :खद झाला होता, तशांत नवमालिकाही उग्रसेनाच्या तीं लागल्याचें वर्तमान त्यांस कळतांच तिच्या सद्गुणांची पातिव्रत्याची आठवण होऊन तिजविषयीं त्यांस पराका-चें वाईट वाटलें. विजयासाहे तें वर्तमान कळलेंच होतें. यानें शत्रु रत्नसार येथें गेल्याचें ऐकून आपण त्या नग-ची वाट धरिली. आपल्या प्रिय धन्यास व धनिनीस ईल तितकी मदत ह्या विपत्ति कालांत आपल्या हातून

घडावी, व साधल्यास त्यांच्या मुक्ततेची खटपट करावी, हाच तेथें जाण्यांत त्याचा हेतु होता. रत्नसार येथें गेल्यावर आपण काय उद्योग करावा ह्या विषयीं तो मार्गांत विचार करूं लागला. त्यास कांहीं मांत्रिक विद्या अवगत होती ह्यामुळें आपण देवर्षि बनावें असे विचार प्रथमतः त्याच्या मनांत आले; परंतु ह्या मार्गानें हेतु लवकर साध्य होणार नाहींत असें वाटून आपण राजसेवेंत असावें, व उग्रसेनाचा आपणावर विश्वास बसला ह्मणजे ह्या उभयतांची सुटका साधेल त्या मार्गानें करावी, असा त्याचा निश्चय ठरला. सुदैवानें ह्या नगरांत त्याच्या ओळखिचें कोणीच नव्हतें, ह्मणून त्याची खटपट निर्विघ्नपणें तडीस गेली. ती अशी कीं, प्रथमतः तो रत्नसार पुरींत येतांच त्यानें उग्रसेनाच्या खानगींतिल कांहीं नोकरांबरोबर चांगली ओळख करून घेतली व त्यांच्याच साह्यानें थोड्यां दिवसांनीं त्यांस तेथें नोकरी मिळाली. उग्रसेनाचे दुर्गुण पाहून त्यास अल्प कालांतच नोकरीचा फार वीट आला, तथापि स्वामीभक्तीमुळें तसाहि बिकट प्रसंग सोसून अनितीचीं दुष्कृत्यें करण्यास तो तयार झाला. त्याची ती हुशारी पाहून उग्रसेनास वाटलें, कीं ह्याचा पुढें आपल्या भरंवशाचे कामीं मोठा उपयोग होणार आहे, ह्मणून दिवसें दिवस विजय उग्रसेनाचे मोठ्या मेहेरबानीचा नोकर झाला. गुप्तपणाची कांहीं मसलत करावयाची असली तरी तींत विजयाच्या साह्याची योजना उग्रसेन अगोदर करीत असे. सारांश थोड्याच दिवसांत आपल्या धन्याची मुक्तता पाहिजे त्या मार्गानें करण्याचें सामर्थ्य ह्याच्या आंगीं येऊन चुकलें होतें.

आतां मीनकेतन नवमालिका ह्यांचे स्थितीचा विचार करणें जरूर आहे. घोरवनांत असतां एकाएकीं भयंकर प्रसंग गुदरून बंदींत असलेला मीनकेतन रत्नसारपुरींत दाखल झाल्यावर एका भयाण कारागृहांत येऊन पडला. आपल्यावर हें अरिष्ट एकाएकीं येऊन आपली अशी दुर्दशा झाली ह्याची त्यास फारशी काळजी नव्हती; परंतु नवमालिकेच्या वियोगाची व तिच्या सद्गुणांची त्यास वारंवार आठवण होऊन तो अगदीं वेड्यासारखा झाला. जेव्हां तो उग्रसेनाच्या हातीं सांपडला तेव्हां उग्रसेनास आपणावर अकस्मात छापा घालून बंदी करण्याचें नवमालिकेविषयींच्या अभिलाशावांचून दुसरें कांहीं कारण नाहीं अशी त्याची खातरी झाली, व आपल्या पश्चात् तो खाचित आपल्या राजधानीवर हल्ला करून नवमालिकेस आपल्या हस्तगत करील, व कामशांत्यर्थ त्या साध्वीची नानाप्रकारें विटंबना करील अशी भीति त्याचे मनांत सदैव वास करूं लागली. त्यानें अन्न वर्जून फक्त नवमालिकेच्या चिंतनांत कित्येक दिवस घालविले. ज्या कारागृहांत त्यास ठेविलें होतें तें मोठें विस्तीर्ण असून शून्य व इतकें भीतिप्रद होतें, कीं, मीनकेतनासारख्यास तें साक्षात् यमसदनच आहे कीं काय असें वाटे. अशा दुःखद स्थितींतून मुक्त होऊन आपण नवमालिकेस भेटूं व सौख्याचा पूर्वानुभव घेऊं हे विचार अगदीं स्वप्नवत् आहेत अशी त्याची पूर्ण निराशा झाल्यावर तो अंतकालाच्या घडीची मार्गप्रतिक्षा करीत स्वस्थ बसला. दुःखशोकादिकें करून त्याची चर्या इतकी बदललेली होती कीं परमप्रीतीच्या नेत्रकटाक्षांसही त्याचें तें म्लान व निस्तेज वदन ओळखूं आलें नसतें.

प्रिय वाचकहो, उग्रसेनानें नवमालिकेस आपल्या बागेंतील महालांत नेऊन ठेविलें ह्मणून जें नुकतेंच वर लिहिलें तें तुह्मास आठवत असेलच. तेथें कडक पहारा ठेवून तिच्या खाण्यापिण्याची, निजण्याबसण्याची, तसेंच उंची वस्त्रें, अलंकार, नानाप्रकारचीं सुगंधिक तेलें, पुष्पें इत्यादिकांची यथास्थित सोय करून ठेविली होती; परंतु आपल्या सर्व सौख्याचें मूळबीज जो मीनकेतन त्यास आपल्यामुळें हीं दारुण दुःखें सोसावीं लागत आहेत हे विचार तिचे मनांत येऊन हे पदार्थ सुखकर न होतां उलटे दाहोत्पादक होत.

तिच्या अंतःकरणांतील मीनकेतनाच्या सद्गुणाची ज्योती इतकी प्रज्वलित होती कीं तिला हे सर्व उपचार अरुच प्रायः विषतुल्य वाटत. नवमालिका आपणास वश व्हावी, ह्मणून कित्येक नीच मनुष्यांची उग्रसेनानें तिचें मन वळविण्याचे कामीं योजना केली होती, परंतु नवमालिकेच्या दृढ संकेतापुढें त्याचें कांहींएक चाललें नाहीं;इतकेंच नाहीं तर तिचे हातून त्यांची चांगली अप्रतिष्ठा होऊन हातीं धरलेलें काम त्यांस सोडून द्यावें लागलें. बरेच दिवस झाले तरी अप्राप्त वस्तु प्राप्त होऊन ही आपली मनेच्छा सफल होत नाहीं, अशी त्याची खातरी झाल्यामुळें व कामदेवानें त्याच्या मनांत अनावर उचल केल्यामुळें ती आपल्या मनोदयाप्रमाणें कधीं कबूल होत्ये असें त्यास झालें होतें. नवमालिकेस फुसलावून कुमार्गी तिचें पाऊल पाडण्याच्या कामीं ज्यांची योजना केली होती, त्यांची आपल्या प्रयत्नांत अधिकाधिक निराशा होत आहे असें पाहून आतां उगाच लांबणीवर टाकण्यांत कांहीं अर्थ नाहीं, स्वतःच

खटपट करून ती नच रूचल्यास समयीं जुलूम करून त्या साध्वीची पातीव्रत्य नौका कुमार्गवर्तनाब्धींत बुडवून आपले हेतु सिद्धीस नेण्यास तो तयार झाला. ती सुंदरी ह्या रत्नसारपुरींत आल्यापासून तर त्याची वृत्ति इतकी बिघडली कीं राज्यव्यवस्था करण्याची देखील त्यास सुचेना. राजाचे हाताखालचे इतर नोकर, कोणी राजापेक्षां शतपट, कोणी सहस्रपट दुर्वर्तनांत निष्णात झाले असल्यामुळें त्या राष्ट्राची त्या वेळेची स्थिती, गाजीपूर दुराचारी ह्याच्या ताब्यांत असल्यावेळीं तें ज्या स्थितींत होतें त्यापेक्षां फारच निंद्य झाली होती.

एके दिवशीं नवमालिकेविषयीं विचार करीत बसला असतां त्याचा कामाग्नि फारच प्रदिप्त झाल्यामुळें कांहीं सुचेनासें होऊन उग्रसेन अगदीं वेडावून गेला. सरते शेवटीं नवमालिकेच्या महालांत जाऊन आपले मनोरथ आतांच सिद्धीस न्यावेत, असा मनाचा दृढ संकेत होऊन तो तिकडे गेला. पाहिलें तों ती सुंदरी फारच कृश झालेली दिसली. तिची ती दैदिप्यमान कांति नाहींशी होऊन आंगावर पांढुरकी आली होती. जरी सुखोपभोगाच्या उग्रसेनानें सर्व तजविजी करून ठेविल्या होत्या तरी मीनकेतनाचे ठायीं तिचें चित्त लागलें असल्यामुळें त्या सर्व तिला दुःखद वाटत. अशी ती विरहिणी चारुगात्री मीनकेतनाविषयीं तमळळ करीत भुईवर निजली आहे असें पाहून उग्रसेन तिच्या जवळ गेला. पाहिलें तों त्या सुंदरीस गाढ झोंप लागली होती. तिचा तो नाजूक सड पातळ बांधा नीट नेटके अवयव पाहून तो मनांत ह्मणाला विधात्या, तुझ्या चातुर्याची सीमा झाली. हिच्या ह्या

मनोहर वपूंत अणुमात्र देखील दोष ठेवण्यास त्वां जागा ठेविली नाहींस. त्या भिकारड्या मीनकेतनावर तिचा लोभ बसला आहे, त्याच्या वियोगजन्य दुःखानें तिच्या सुकुमार तनूवरील तारुण्याची सर्व लाली व टवटवी हरण केल्यामुळें पांढुरकी आली आहे, तरी ती किती रमणीय दिसत्ये! मीनकेतना, तूं भाग्यशाली खरा, ह्मणूनच असें हें स्त्रीरत्न तुझ्या कपाळीं पडलें. हिचा स्पर्श तरी किती मृदु असेल असें ह्मणत तिचा हात धरणार, तों ती मोठ्या त्वेशानें वरळत उठली. तिची मुद्रा पाहून भयाभीत होऊन उग्रसेन मागें सरला व कांहीं अंतरावर जाऊन तिकडे पहात राहिला. कांही वेळानें ती सावध होऊन अजूबाजूंस पाहूं लागली तों उग्रसेनाची मूर्ति तिच्या दृष्टीस पडली. त्यास पहातांक्षणीं विगलित झालेलें आलें वस्त्र सावरून ती उभी राहिली. हे पाहून उग्रसेनास कांहींसा धीर येऊन तो ह्मणाला:—

**उग्रसेन**०—प्रिये पुरे, आतां फार श्रम कशास घेतेस? येथें कोणी परकें कां आहे? तुझी मर्यादा व तुझा सुस्वभाव मला माहित आहे, मग ह्या सुंदर तनूस व्यर्थ कां भागवित्येस? हा मी तुझा दास तुज जवळ उभा आहे. तूं अशी भांबावल्या सारखी दिसत्येस ह्यावरून निद्रेंत तुला कांहीं दुःस्वप्न पडलें असावें असें वाटतें; परंतु हा मी तुझा रक्षक तुजजवळच असल्यामुळें आतां भीति बाळगण्याचें कारण नाहीं. प्रिये, अशी ये पाहूं; तुझ्या अधर प्रांताचा मधुर रस मला चाखूंदे?

**नवमालिका**०—मनुष्य वेशधारी लांडग्या, उग्रसेना, तुझीं सर्व कवटाळें मला समजलीं आहेत. यःकश्चित् माझ्या

लाभासाठीं त्या निरपराधी प्राण्यास अकस्मात घाला घालून बंदींत टाकिलेसना? आग लागो तुझ्या त्या शौर्यास व वाणीस! ज्या सिंहीचे नखाग्रहि तुझ्या दृष्टीस पडावयाचें नाहीं तिचा अभिलाश धरणाऱ्या मुर्खास ह्मणावें तरी काय? नराधमा, तुझी ही पशुवत् करणी पाहून तुला मानवी प्राणी ह्मणण्यास मोठी शंका वाटत्ये. मदांधा, ज्या वाणीनें परस्त्री अधरामृत प्राशन करण्याची इच्छा त्वां प्रदर्शित केलीस, ती झडो तुझी जिव्हा, अथवा मद्यपी जो तूं त्या तुला स्वपर् ओळखण्याचें ज्ञान कोठून असणार? तुझी ही कृति सहाजीकच आहे; हींत ज्यास्त कांहींच नाहीं, मग ईश्वर निर्मितवाणीस तरी दोष कां द्यावा? निर्लज्जा, चल नीघ येथून, तूं आपलें कृष्ण करून चालता हो कसा?

**उग्रसेन**०—प्रिये, व्यर्थ कां त्वरें तूं आपल्या नाजुक शरिरास त्रास देत्येस? मीनकेतन बंदमुक्त होऊन पुन: तूं सुख अनुभविशील हें स्वप्नीं देखील मनांत आणूं नको. त्याचा कदाचित् अंतहि झाला असेल, किंवा तो त्या पंथास लागला असेल. आतां त्याची आशा कशास पाहिजे? तशांत तुला सर्व कांहीं अनुकूल करून ठेविलें आहे. आतां माझ्या ह्मणण्यास रुकार दे ह्मणजे तुझ्या सुखास पारावार नाहीं. वारा वाहील त्या प्रमाणें पाठ देणें शहाण्याचें काम आहे, मग तुला काय वाटत असेल तें नकळे. असो. प्रिये, चुंबन राहिलें, पण प्रेमालिंगन तरी! ( नवमालिकेस स्पर्श करण्याकरितां हात पुढें करितो ).

**नवमालिका**०—अनार्या, मला तूं स्पर्श करणार काय? चांडाळा, आग लागो तुझ्या ह्या हातास! चल, होतोसकीं

ठाणे

नाहीं मागें, कीं ह्या जिवाचा तुजपुढेंच नाश करूं ?— ( असें ह्मणून ती पलंगाच्या खुरा जवळच खालीं बसली ).

नवमालिकेच्या पातिव्रत्याचें तेज, तिची रागानें झालेली आरक्त वर्ण कांती व नेत्र व तिची ती भयानें कांपणारी तनु पाहून उग्रसेन भयाभीत झाला, व आतां आपण येथें हिच्या समूर राहिल्यास ही खरोखर आपल्या प्राणाचा घात करील, मग आपले विचार जागच्या जागींच रहा-तील असें मनांत आणून तो आपल्या मंदिरीं जाता झाला. आरामासाठीं तो मंजुळ सुगंधी वायू झरोक्यांतून वहात होता तेथें पडला, परंतु नवमालिका त्याच्या मनांत विहार करित होती ह्यामुळें त्यास समाधान वाटेना. विजय त्याच्या प्रितींतला व विश्वासू असा नोकर होऊन बसला होता ह्मणून वर लिहिलेंच आहे. तो आपल्या जवळच उभा आहे असें पाहून त्याच्या तरी साह्यानें कांहीं वळल्यास प्रयत्न करून पहावा ह्मणून विजयास हाक मारून ह्मणाला; विजया, मला कांहीं महत्वाचें कृत्य करणें आहे व तें तुजसारख्या विश्वासू मनुष्यावांचून पार पडणार नाहीं. कसें काय तुझी तयारी असल्यास मी तें तुला कळवीन. काम तर मोठें अवघड आहे, फार युक्तीनें केलें पाहिजे, नाहीं तर भलतेंच कांहीं व्हावयाचें. तें ऐकून विजय ह्मणाला महाराज, आपल्या चरणाचा दास आपल्या सेवेंत सदां तत्पर आहे, काय आज्ञा असेल ती करावी, मग प्रयत्न करण्याचें काम माझें आहे. ती त्याची हुशारी पाहून हा आपलें काम खरोखर बजावील असा भरंवसा त्यास पटल्या-वर त्यानें नवमालिकेच्या प्राप्तीचा प्रयत्न करण्यास त्यास सांगितलें. तें ऐकून विजय ह्मणाला, महाराज, इतकेंच

ना ? ह्यांत कठीण तें काय ? आपल्या पायांच्या पुण्याईनें ह्या विजयानें ह्यापेक्षांहि दुःसाध्य कामें तडीस नेलीं आहेत. तशांत ती आपल्या बंदींत आहे, मग हो कशाची अडचण ? मात्र मी सांगेन त्या प्रमाणें आपण ऐकिलें पाहिजे. आपली नवमालिकेस दहशत बसली आहे, तेव्हां आपण मात्र तेथें येतां उपयोगी नाहीं. ह्या विजयास परमेश्वरानें अशी कांहीं शक्ति दिली आहे कीं थोड्याच दिवशीं ती आपणास राजी आहे अशी शुभवार्ता ह्या विजयाच्याच मुखानें आपण ऐकाल. सरकार, कांहीं दिवस आपल्या मनाचा आवर करून उतावळी एकीकडे ठेवा. सरकार आपण सांगितलें कीं तिचें अंतःकरण मीनकेतनावर फार आसक्त आहे; असें जर आहे तर मग आपण आज्ञा द्याल तर कोणत्या तरी मार्गानें त्याचा अंत करून तसें झाल्याविषयीं वार्ता तिच्या कानीं गेली ह्मणजे तिची निराशा होऊन आपणास वश होण्यास हरकत होणार नाहीं. मला ह्या कामास जरूर लागणाऱ्या मांत्रिक विद्येचेंहि परिज्ञान आहे. मात्र मजवर भरंवसा ठेवून मीनकेतन व नवमालिका ह्या उभयतांस माझे स्वाधिन करा ह्मणजे आपलें काम झालेंच समजा.

उग्रसेनासही विजयाची युक्ति पसंत पडून तो त्याच्या ह्मणण्यास कबूल झाला. "कामातुराणां नभयन्नलज्जा" ह्या सुजनवाक्यान्वयें उग्रसेनाची सदसद्विचार शक्ति नष्ट झाली होती ह्मणून, विजयाच्या योजनेस रुकार देण्यास किंचित्‌हि किंतु त्याचे मनांत आला नाहीं. त्यानें लागलेंच तुरुंगावरील अमलदारास बलावून आणून मीनकेतनांस विजयाचे स्वाधीन करण्याचा हुकूम दिला, व ज्या

महालांत नवमालिकेस ठेविलें होतें तिकडील पहारेकऱ्यां
विजय तेथें केव्हांही जाऊं लागला असतां हरकत क
नये वगैरे हुकूम देऊन, त्यास (विजयास) ह्मणाला
काम तूं बजाविल्यास मी तुला उत्तम बक्षिस देईन. ह्य
प्रमाणें अश्वासन देऊन आपण स्वस्थ झाला.

आपल्या मनाप्रमाणें घडून आलें असें पाहून विजया
जो आनंद झाला त्याचें अनुमान करण्याचें काम म
आपल्या वाचकाकडे सोंपवितों. आतां आपल्या प्रिय स्वाम
स्वामिनीस हरयुक्तीनें मुक्त करूं हे विचार त्याचे मनां
घोळूं लागल्यामुळें त्यास फर्मांविलेलें काम हा खास करी
अशी त्याची खातरी झाली. सुप्रभातीं विजय जागृ
झाला व उग्रसेनाची आज्ञा घेउन प्रथम कारागृहांत गेल
त्यापूर्वी तेथें उग्रसेनाशिवाय दुसऱ्या कोणासहि जाण्या
परवानगी नसल्यामुळें विजयास तेथें जातां आलें नव्ह
ज्या खोलींत मीनकेतनास ठेविलें होतें ती अंधार कोठ
असून तींत पुष्कळ वर्षांचा केरकचरा पडला होता.
रेच दिवस त्या जागेची दुरुस्ती नसल्यामुळें जागोज
भिंतीचे गिलावे सुटून त्या अगदीं मोडकळीस आल्य
होत्या. अशा ठिकाणीं ढेकूण, चिलटें, उंदीर, वगैरे
पद्रविक प्राण्याची समृद्धि असते.

ज्या कारागृहांत पडल्यापासून त्या बिचाऱ्या मीन
तनास सूर्यकिरण कसें तें माहित नव्हतें, अशा स्थ
एका चटईवर मीनकेतन भुईवरच पडला आहे असें पा
विजयास पराकाष्टेचें दुःख झालें. ज्या मीनकेतनास
मृदु शय्येवर पलंगीं मश्चूच्या अथवा किनखापी गाद्य
निजण्याची सवय, तो तळमळ करीत एका हातर

पडलेला पाहून त्या कारागृहावरील अधिकाऱ्यांस, जरी ते पाषाण हृदयाचे होते तरी, मनापासून फार वाईट वाटतें; मग विजय हा त्या उभयतांची खरी कळकळ बाळगणारा होता, तेव्हांपासून त्याची स्थिती त्रें कशी झाली असेल? त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. थोड्या अवकाशानें मीनकेतन जागृत होऊन पहातो तों विजय याचे दृष्टीस पडला. बऱ्याच दिवसांत विजयास पाहिलें नसल्यामुळें व त्याचा ह्या स्थळीं येण्याचा संभवहि नसल्यामुळें प्रथमतः हा कोणी किल्लेदार अधिकाऱ्यांपैकीं असून आपणास नित्या प्रमाणें छळण्यास आला असेल असें मीनकेतनास वाटून तो ह्मणाला, बाबानों, या तर मग. नित्यक्रम सुरू करण्यास कां थांबतां? गड्यानों, राजाज्ञे प्रमाणें प्रत्यहीं प्रातःकाळीं उठून तुह्मास ह्या कामाकरितां येथें यावें लागतें, त्या पेक्षां माझी एक विनंती आहे, ती ऐकून उचित असल्यास मान्य करा; ती ही कीं, मला आतां ह्या भोगाचा व माझ्या दुःसह जीविताचा कंटाळा आला आहे, ह्मणून एकदांच ह्याचा अंत करून मला मोकळें करा, ह्मणजे प्रत्यहीं प्रातःकाळीं उठून ह्या कामगिरी करितां तुह्मास येथें यावें लागणार नाहीं. हें मीनकेतनाचें भाषण ऐकून विजयानें धांवत जाऊन मीनकेतनाचे चरण धरिले, व हात जोडून मोठ्या नम्रतेनें त्यास ह्मणाला, सरकार, मला नीट निरखून पहा. मी किल्लेदार नव्हे, तर हेमनगरींतील आपला दीन दास विजय आहे मला आपण ओळखिलें नाहीं वाटतें? विजयाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच जसा एखादा निद्रिस्थ मनुष्य अकस्मात्त जागा व्हावा तसा मीनकेतन जागृत होऊन विजयाकडे एक सा-

. रखा पाहूं लागला. नंतर ओळख पटल्यावर तो विज
यास ह्मणाला, वा, विजया तूं इकडे कोणीकडे व हेमनग
येथील वर्तमान कसें काय आहे तें सांग पाहूं? सूक्ष्म आ
तंतूमुळें माझें जीवित राहिलें आहे; नाहीं तर प्राण ह
कुडीस सोडून कधींच गेला असता. तें ऐकून विज
ह्मणाला; सरकार, आपण उग्रसेनाचे हस्तगत झालां अ
वार्ता हेमनगरी येथें येऊन दाखल होऊन फार वेळ झाल
नाहीं तों तो दांडगा उग्रसेन या नगरीवर चवताळलेल
सिंहाप्रमाणें चाल करून आला. आपल्या लोकांनीं शि
कस्त करून पाहिली परंतु त्यांचें कांहीं एक चाललें नाह
आपल्या बहुतेक विरांचा मोड होऊन सेनापती वगैरे लो
रणांगणीं पतन पावले. मग नवमालिका बाई साहेबां
जी अवस्था झाली त्याचें वर्णन करण्यास माझी वा
असमर्थ आहे. हल्लीं बाईसाहेब आपणा प्रमाणेंच
उग्रसेनाच्या महालीं बंदींत आहेत. त्यादुष्टानें त्यांस
करण्याचा आज पुष्कळ दिवस प्रयत्न चालविला आ
पण तो निष्फळ होऊन अखेर तें काम त्यानें मजव
सोंपविलें आहे व आपला माझा संबंध त्यास माहित न
त्यामुळें प्रथम आपला अंत करण्याची सूचना मी
केली आहे. सरकार असें कळविल्यानें मजविषयीं त्या
मनांत शंका येणार नाहीं. आपल्या सुटकेकरितां
पल्या उभयतांचे ठायीं माझी निष्ठा परमेश्वराप्रमाणें
म्हणून मी त्या तजविजीस लागतों. आपण ह्या कारा
तून चालते होऊन गोपिनाथ गाजीपुराचा राजा झाला अ
म्हणून त्या नगराचा मार्ग धरावा. झाल्यास वाहन
वगैरे तजवीज करीन. नवमालिका बाईसाहेब खुश

त. त्यांच्या मुक्ततेची तजवीज करून त्यांस बरोबर
मीहि गाजीपुरास आपल्या मागों माग येतों. असें
मीनकेतनाच्या खाण्यापिण्याची, निजण्याबसण्याची
ली सोय करून नवमालिकेच्या महालीं गेला. पाहिलें
ती सुंदरी दुःख करीत बसली आहे. विजय महालांत
तांच नवमालिकेस ऊग्रसेन आलासें वाटलें, ह्मणून तिनें
ोक्तत्यावर शिव्यांचा वर्षाव केला; तेव्हां विजय तिज-
ठ जाऊन ह्मणाला, बाईसाहेब, हें भलतेंच काय क-
? आपणांस वेडतर लागलें नाहीं ना? हा आपला
विजय येथें आला आहे. हें ऐकतांच नवमालिकेनें
उघडून पाहिलें तों विजय आपल्या समूर उभा आहे.
तिला आनंद होऊन ती ह्मणाली, बा विजया तिक-
वर्तमान कसें काय आहे तें सांग पाहूं? मला तर
जीव नकोसा झाला आहे, व त्या चांडाळाचें मुख
स पडलें कीं माझ्या आंगाची दाह होते. नंतर वि-
नें थोडक्यांत मीनकेतनाविषयीं हकीकत कळविली.
ऐकून त्या साध्वीच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या
ां विजय ह्मणाला, बाईसाहेब, आपलें नष्टचर्य संपलेंच
ता. ह्या दुष्ट उग्रसेनास मी असें खासें फसवितों कीं
पण मनांत मजविषयीं गांठच मारील कीं असा व-
द प्राणी हाच एक मला भेटला. बाईसाहेब आतां
काचें मूळ संपलें. आपण आनंदानें स्वस्थ रहा. हा वि-
आपल्या केसासहि धक्का बसूं देणार नाहीं. आपल्या
यतांच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त चांगला ठेवितों.
आठ दिवसांनीं अमळ हुशारी आल्यानंतर आपण
र्गी ह्या चांडाळाच्या हातावर तुरी देऊन रलसार पुरीं

तून चालते होऊं. आतां मी येतों. मला फावेल तितव
वेळां मी आपल्या व सरकारांच्या भेटीकरितां येईन. व
साहेब, आपणाकरितांच ह्या दुष्टाचे नोकरीस राहून अ
पल्या मुक्तता रूपी इमरतीच्या तजविजीस लागलों अ
हल्लीं उग्रसेनानें मला आपणास वश करण्याचें कामीं
जिलें आहे. आतां मीं येतों. सायंकाळीं परत ये
असें ह्मणून विजय चालता झाला. नवमालिकेनें वि
येथें आला व त्याच्या साह्यानें लवकरच आपल्या मुक्तते
संभव आहे, असें पाहून परमेश्वराचे फार आभार मानि

नवमालिकेच्या महालांतून विजय तिची आज्ञा घे
त्यावर उग्रसेनाकडे आला. कां विजया, काम फत्ते झ
असें मला वाटतें; कसें काय? एकदाचें सर्व वर्तमान
दे पाहूं? तें ऐकून विजय ह्मणाला, महाराज हा वि
ज्या कामांत पडेल त्या कामांत अपजय येईलसें सरका
वाटतें काय? थोडे दिवस धीर धरा. नवमालिकेची व
विशाद! स्त्रियांची बुद्धितो किती असणार? चुली
तीचना? मीनकेतनाविषयीं खटपट अद्यापि सुरू के
नाहीं. दोन चार दिवसांत तेंहि काम आटोक्यांत आणि
आपण कांहीं दिवस धीर धरून स्वस्थ रहा, असें सां
विजयानें त्याचें तोंड बंद केलें.

अल्पकालांत विजयाचे चांगले देखरेखीमुळें मीनके
व नवमालिका हीं हुशार झालीं. त्यांच्या प्रकृति इत
सुधारल्या कीं मार्गाचे कसेहि श्रम पडले तरी ते सोसण
पुरती त्यांस शक्ति आली असें पाहून त्या उभयतां
विद्यमानें तेथून जाण्याचा दिवस विजयानें ठरविला.
तो जाण्याच्या तयारीस लागला. तिघां करितां तीन

नगरा बाहेर गुप्त ठिकाणीं त्यानें आणून ठेविले. तसेंच तीन फकिरांचे पोशाखहि तयार करविले. सर्व सिद्धता झाल्यावर ते त्रिवर्ग संकेताच्या दिवसाची मार्ग प्रतिक्षा करीत बसले.

वाचकहो, आतां हेमनगरी व तेथील राज्य व्यवस्था ह्या विषयीं कांहीं विचार करूं या. नवमालिका हस्तगत झाल्यावर कांहीं दिवसांनीं उग्रसेनानें आपला स्नेही कामप्रिय ह्यास तेथील राज्य कारभार पहाण्यासाठीं पाठविलें. त्याच्या हातीं कारभार येतांच त्यानें अशी कांहीं व्यवस्था चालविली कीं थोड्याच दिवसांत प्रजाजन कामप्रिय महाराजाच्या कारकिर्दीस त्रासून गेले. तशांत उग्रसेनाच्या आज्ञेवरून तो मीनकेतनाच्या वेळच्या लहान मोठ्या नोकरांस छळूं लागला. मग ज्यास जो मार्ग दृष्ट दिसला तो त्यानें धरिला. अशा ह्या अणिबाणीच्या प्रसंगीं सकरूण, ज्याजवर विजया प्रमाणेंच मीनकेतन व नवमालिका ह्या उभयतांचें प्रेम होतें तोहि, आतां ह्या ठिकाणीं अब्रूनें दिवस काढण्याची सोय राहिली नाहीं असेंपाहून, रत्नसारपुरींत आपल्या धन्याची व धनीणीची कशी काय व्यवस्था आहे तें पहाण्याकरितां तेथें गेला. शिवाय त्याचा व विजयाचा मोठा स्नेह होता. मीनकेतन व नवमालिका हीं उभयतां हेमनगरींतून रत्नसार येथें गेल्यावर विजयहि त्यांचे मागून चालता झाला हें सकरूणानें पाहिलें होतें. बऱ्याच दिवसांत ह्या त्रिवर्गाचा शोध नाहीं हें पाहून त्याच्या मनांत त्यांचें वृत्त कळण्याची फार जिज्ञासा उत्पन्न झाली होती; ह्मणून ह्याच संधीस तो रत्नसार येथें जाण्यास निघाला; तेव्हां आपल्या

परिचयाचें रत्नसार येथें कोणी मिळाल्यास आपली उघडीकहोईल, ह्यामुळें त्यानें शहाणपणानें वैराग्याचा वेश प्रथमतःच धारण केला. ह्या प्रमाणें वैरागी बनलेला सकरुण रत्नसार येथें दाखल होतांच विजयाची व त्याची मार्गांत गांठ पडली. उभयतांच्या ओळखी पटल्यावर परस्परांचे बेत परस्परांस कळले. नंतर विजय ह्मणाला, मित्रा सकरुणा तूं येथें ह्याच वेशानें रहा. सरकार व बाईसाहेब ह्यांच्या मुक्ततेचा घाट घालून त्यांस येथून पार करण्याची वेळा समीप आली आहे. तुझें ह्या कामीं साह्य पाहिजे तें असें कीं तूं येथेंच राहून आह्मी त्रिवर्ग येथून गेल्यावर आह्मास धरण्याविषयीं अथवा दुसरी कांहीं खटपट झाल्यास त्या बद्दल सूचना आह्मास गाजीपूर येथें तावडतोब कळविण्याची तूं स्वतः तसदी घे. मात्र इतकें कर कीं येथून निघते वेळीं पुरापुर भेद काढून नंतर जें काय करणें त्या करितां झट ह्मणजे झालें. येथें तुझ्या रहाण्याची कशी काय सोय आहे ह्मणून विजयानें त्यास प्रश्न केल्यावर सकरुण ह्मणाला, दादा, मी गांवाबाहेरील खंडोबाच्या देवाल्यांत उतरलों आहे. जवळ एक पैसाहि नसल्यामुळें खाण्या पिण्याचें काय विचारतोस? हें ऐकून विजयानें थोडें द्रव्य खर्चाकरितां देऊन त्यास तेथेंच रहाण्यास सांगून आपण आपल्या बिऱ्हाडीं चालता झाला. नंतर तेच दिवशीं सायंकाळीं विजयानें मीनकेतनाची भेट घेऊन उदईक येथून गाजीपुरास मार्गस्थ व्हावयाचा संकेत कळविला. तेव्हां मीनकेतनास फार हर्ष वाटला; परंतु अशा बंदोबस्ताचे ठिकाणांतून कधीं कसें बाहेर पडावें, अशा विषयीं शंका मीनकेतनाच्या मनांत आल्यावरून त्यानें वि-

जयास प्रश्न केला कीं, वा विजया, ह्या कारागृहांतून बाहेर पडण्याची व गाजीपुरास जाण्याकरितां वाहन पाहिजे आहे त्याची व्यवस्था कशी काय केली आहेस ते सांग पाहूं ? तें ऐकून विजय ह्मणाला, सरकार, आपल्या करितां मी एक घोडा आणून ठेविला आहे, तो उद्यां सूर्यास्तानंतर सज्ज करून ठेवितों. सरकार, आपला सकरूण ह्या नगरींत आला आहे.त्यानें बैराग्याचा वेश धारण केला असून येथून नजीक असलेल्या खंडोबाच्या देवालयांत उतरला आहे. उद्यां सायंकाळीं तो आपणा करितां आणिलेल्या घोड्यास घेऊन आपली वाट पहात नगरा बाहेरील आंबराईंत राहील. आपणा करितां मी फकिराचा वेश आणून ठेविला आहे; हे आपले कपडे घ्या. कांहीं तरी युक्तानें आपल्या कारागृहावरील पहारेकऱ्यास मादक पदार्थ देतों, त्याच्या योगानें ते आपल्या कामावरच कैफांत गुंग होऊन पडतील. ही संधी पाहून आपणाकरितां आणिलेला वेश धारण करून निर्धास्त रीतीनें नगराच्या तटाच्या दक्षिण बाजूनें गांवाबाहेर पडा, ह्मणजे संकेता प्रमाणें सकरूण आपणास आंबराइत भटलच. त्याच्या जवळ असलेल्या घोड्यावर बसून आपण चालतें व्हावें. त्यास गाजीपूरचा रस्ता माहित आहच; आपणास अडचण पडणार नाहीं. ह्या नगराच्या उत्तर दिशेस उग्रसेनाचा एक बाग आहे त्यांतील महालांत नवमालका बाईसाहेबांस ठेविलें आहे; तेथून त्यांची सुटका करून मी त्यांस बरोबर घेऊन सवड मिळाल्यास आपणास भेटण्यास येईन. आपण कांहीं वेळ माझी वाट पहावी परंतु विलंब लागल्यास थांबूं नये, पुढें चालतें व्हावें. आतां मी नवमालिका बाईसाहेबांकडेस जातों, तिकडे ही

सूचना देऊन तजविजींत असलें पाहिजे, असें ह्मणून मीनकेतनाची आज्ञा घेऊन तो नवमालिकेच्या मंदिरीं चालता झाला. तेथें गेल्यावर मीनकेतनाबरोबर झालेला निश्चय तीस कळवून विजय ह्मणाला, बाईसाहेब, उदईक रात्रौ नाण्याच्या तयारींत असा बरें? रचिलेल्या इमारतीचा पाया न ढासळतां परमेश्वर कायम राखो ह्मणजे झालें. बाईसाहेब रात्र बरीच झाला, आतां मला जाण्यास रजा द्या. उद्यांचे खटपटीस मला लागलें पाहिजे. हें त्याचें बोलणें ऐकून नवमालिका ह्मणाली बरें पण विजया, तिकडील प्रकृति श्रम सोसण्याजोगी तरी हुशार झाली आहे का? विजय ह्मणाला बाईसाहेब, सरकारची तबियत हल्लीं बरीच सुधारली असून स्वमोचनाविषयीं ते इतके उत्सुक झाले आहेत, कीं कसेंहि संकट आलें तरी तें सोसण्यास कबूल आहेत. आतां येतों असें ह्मणून विजय स्वस्थलीं गेला.

दुसरे दिवशीं प्रातःकालींच उठून विजय तजविजीस लागला. सर्व तयारी झाल्यावर तो मीतकेतनास भेटण्याकरितां गेला. ज्या कारागृहांत मीनकेतनास ठेविलें होतें त्यावरील पहारेकऱ्यांची व त्याची दाटीची ओळख पडली होती. शिवाय देवर्षीपणाची विद्या विजयास अवगत असल्यामुळें पिशाची नडीचा त्याचे मार्फत त्यांनीं बंदोबस्त करविला होता. ह्या संकेताचे दिवशीं त्या सर्वांस बोलावून आणून आंगांत देव आणून तो अवतरूं लागला. नंतर सर्वांचा बंदोबस्त करून कांहीं मादक पदार्थ मिश्र केलेली मिठाई त्यांस विजयाच्या आंगच्या देवानें दिली व सांगितलें कीं, ही सायंकाळीं खाऊन आपल्या कामावर जा, हिच्या योगानें ज्या कोणास आपत्य होत नसेल त्यास होईल,

ज्या कोणास पिशाची नड असेल, ती सर्व दूर होईल व रोगातें रोगमुक्त होतील. ह्याप्रमाणें पहारेकऱ्यांचा बंदोबस्त झाल्यावर विजय मीनकेतनाजवळ जाऊन ह्मणाला सरकार पहारेकऱ्यांचा तर बंदोबस्त केला आहे. सायंकाळीं त्या सर्वांनीं त्यांस दिलेला मादक पदार्थ सेवन केला ह्मणजे आपापल्या कामावर कैफानें गुंग होऊन पडतील. असें झाल्यानंतर आपणास दिलेला फकिराचा वेश धारण करून निःशंकपणें ह्या कारागृहांतून चालते व्हा. ह्या आपल्या ठिकाणापासून तटाचा दरवाजा जवळ आहे. आपल्या वेशामुळें आपणास कोणी ओळखणार नाहीं ह्मणून त्या दरवाज्यांतून बाहेर पडा. बाहेर आल्यानंतर आपणास एक आंबराई दृष्टीस पडेल तेथें सकरूणास बरोबर घोडा देऊन पाठवितों. सकरूणाची भेट झाल्यावर कांहीं वेळपर्यंत मार्गप्रतिक्षा करा ह्मणजे नवमालिका बाईसाहेबांस बरोबर घेऊन मी तेथें येईन ह्मणजे आपण त्रिवर्ग मार्ग क्रमूं लागूं; परंतु सवड सांपडल्यास मी येईन, नाहीं तर ज्या उत्तर दिशेच्या दरवाज्यानें आह्मास बाहेर पडावयाचें तेथून गाजीपुरास सरळ मार्ग जातो, त्यानें पुढें चालते होऊं. आपण उगाच फार वेळ थांबूं नका. विलंब झाल्यामुळें पुनः शत्रूच्या हातीं आपण सांपडल्यास नवमालिका व मी कपटानें पार पडलों हें पाहून आपल्या प्राणावर ही बेतेल, ह्मणून हें काम फार सावधगिरीनें करा. आतां मी येतों. आपल्या ध्यानांत सर्व आलें ना? हे घ्या आपले कपडे असें ह्मणून विजयानें कपडे देऊन मीनकेतनाची आज्ञा घेऊन नवमालिकेकडे जाता झाला. तिच्या मंदिरांत आल्यावर विजय आला असें पाहून नवमालिका ह्मणाली.

"बा विजया, तिकडील सर्व ठीक आहेना; संकेताचा दिवस तर येऊन ठेपला सर्व तजवीज करून ठेविली आहेसना? ऐत्या वेळीं फशी पडशील असें करूं नको; कारण, जर का आपला उद्देश त्या दुष्ट उग्रसेनास विदित होऊन पुनः आपण त्याच्या हातीं लागलों तर आपली त्रिवर्गांची काय दशा होईल तें सांगवत नाहीं. हे ऐकून विजय ह्मणाला, बाईसाहेब, आपण त्या विषयीं काळजी करूं नका; मी सर्व तजवीज नीट लाविली आहे. रात्र पडल्यावर मी येथें येईन, आपण मात्र त्या वेतानें तयारींत असा ह्मणजे झालें. ह्या प्रमाणें नवमालिकेस संकेताची सूचना केल्यावर तिचा निरोप घेऊन विजय सकरुणास खंडोबाच्या देवालयांत भेटला व त्यास बरोबर घेऊन ज्या खेड्यावर त्यानें घोडे ठेविले होते तेथें गेला. नंतर त्यास घोडे दाखवून त्यां पैकीं एक मीनकेतनाकरितां सूर्यास्त झाल्यावर तयार करून रत्नसारपुरीच्या तटाच्या दक्षिण बाजूच्या दरवाज्या बाहेर जी आंबराई आहे तींत घेऊन बैस ह्मणजे मीनकेतन येतांच त्यास घोड्यावर बसवून उभयतांनीं कांहीं वेळ पर्यंत माझी वाट पाहून विलंब झाल्यास गाजीपूरचा रस्ता धरावा वगैरे सांगून रत्नसार पुरींत परत आला तों सायंकाळ झाला. घरीं आल्यावर त्यानें जें थोडें बहुत द्रव्य संपादन केलें होतें त्याचा मार्गांत कांहीं उपयोग घडेल ह्मणून तें बरोबर घेऊन संकेत वेळा येऊन पोहोंचतांच विजय नवमालिकेच्या महालीं गेला. तेथें नवमालिकेस फकिराचा वेष धारण करण्यास सांगून अंधार पडलासें पाहून महालाचा दरवाजा बंद करून विजय नवमालिकेसह तटाच्या दरवाज्यापाशीं आला. पाहिलें तों महाला वरील पहारेकरी लोक कैफांत गुंग होऊन जागच्या

जागीं पडले होते. वेश पालटल्यामुळें तटाच्या दरवाज्यावर त्यांस कोणीं ओळखिलें नाहीं. ह्या प्रमाणें नगरा बाहेर पडल्यावर दोघां करितां दोन घोडे तयार होतेच त्या पैकीं एकावर नवमालिकेस बसवून व दुसऱ्यावर आपण बसून नवमालिका व विजय हीं उभयतां चालतीं झालीं. केल्या कृत्याची उघडीक दुसऱ्या दिवशीं होतांच उग्रसेनाचे सेवकजन आपणास धरण्यास येतील ही भीति विजयाचे मनांत असल्यामुळें, मीनकेतनास भेटण्या करितां उगाच वेळ दवडूं नये, नाहीं तर केले श्रम व्यर्थ जाऊन पुनः तो दुष्ट उग्रसेन आपलें काय करील तें नकळे वगैरे विचार विजयाच्या मनांत घोळत असल्यामुळें मीनकेतनास भेटण्यास जाण्याचें त्याच्या मनांत येईना; ह्मणून जितकी त्वरा करवेल तितकी करून त्या उभयतांनीं घोडे हांकिले. इकडे मीनकेतन सायंकाळ होतांच आपल्या कारागृहाच्या खिडक्यांतून खालीं पाहूं लागला, परंतु सर्व हुशार असून आपल्या कामावर हजर होते ह्यामुळें त्यास बाहेर पडतां येईना; परंतु सुमारें दहा वाजतां त्यांची हालचाल बंद झाली व ते सर्व आपापल्या कामावरच जागच्याजागीं सुस्त पडले. आतां विलंब करून उपयोगाचा नाहीं असें जाणून विजयानें दिलेले कपडे आंगांत घालून मीनकेतन दक्षिण दरवाज्यानें त्या शहरचे बाहेर आला, तेव्हां साक्षात् यमपुरींतून आपली सुटका झाली असें वाटून त्यानें परमेश्वराचे फार आभार मानिले. नंतर तो आंबराईत आला व पहातो तों एक मनुष्य हातीं घोडा धरून उभा आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. जवळ जातांच सकरूण ह्मणाला, सरकार, आतां मध्यरात्रीचा समय

होत आला. इतका वेळ नगरांतून बाहेर पडण्यास का बरें लागला? विजय बाईसाहेबांस घेऊन अद्यापि आला नाहीं त्यावरून तो त्यांसह चालता झाला असें मला वाटतें; चला तर मग घोड्यावर बसा. त्या दुष्टा उग्रसेनाच्या हातीं सांपडण्याची भीति आहेच. हें ऐकतांच मीनकेतन घोड्यावर बसून सकरुण त्याच्या बांजूनें पायीं चालला. मीनकेतनास रस्त्याची माहिती नसल्यामुळें सकरुणावांचून त्यास त्वरेनें घोडा हाकितां येईना, व सकरुण पादचारी तशांत अनेक दुःखें व विपत्ति भोगिल्यामुळें भग्नवीर्य झालेला तो घोड्याबरोबर किती चालणार? प्रातःकाळ पर्यंत त्यांनीं जेमतेम दहा बारा कोश मजल काढिली.

इकडे रत्नसारपुरींत सुप्रभातीं उग्रसेन जागृत होऊन विजयाची मार्ग प्रतिक्षा करूं लागला. सूर्योदय होऊन दिवस वर आला तरी विजय नित्याप्रमाणें नवमालिकेविषयीं खबर देण्याकरितां येत नाहीं असें पाहून तो अगदी उतावीळ झाला; तशांत नुकतेंच नवमालिका आपणास वश होईल असें त्यानें त्यास कळविलें होतें. नऊ वाजण्याचा सुमार होत आला तरी विजय येत नाहीं असें पाहून उग्रसेनानें आपला सेवक नवमालिकेच्या मंदिरीं विजयाच्या शोधाकरितां पाठविला. त्यानें मंदिरांत जाऊन पाहिलें तो पहारेकरी सुस्त पडले असून नवमालिका व विजय हीं उभयतांही तेथें नाहींत; तेव्हां भयभीत होऊन नवमालिका कोठें दृष्टीस पडली नाहीं ह्मणून उग्रसेनास वृत्त निवेदित केलें. तें ऐकून त्यास फार आश्चर्य वाटून मनांत मोठा धक्का बसला. त्यानें लागलेंच एका सेवकास विजयाच्या शोधाकरितां पाठविलें; परंतु थोड्याच वेळानें

तोहि परत आला व त्यानें कळविलें कीं विजय बिऱ्हाडीं नसून कारागृहांत मीनकेतन व विजय हे उभयतांहि नाहींत. हें ऐकून उग्रसेनाची पांचावर धारण बसली. त्यानें लागलेच त्रिवर्गांच्या तपासा करितां नगरांत दूत पाठविले; परंतु त्यांचा कांहीं पत्ता लागला नाहीं, हें पाहून विजयानें आपणाशीं कपट करून मीनकेतन व नवमालिका ह्यांची सुटका केली, आतां पुनः आपणास नवमालिकेची प्राप्ति होणें कठीण असें वाटून तो अत्यंत खिन्न झाला. विजयावर भरंवसा ठेवून त्यानें आपला असा घात केला हे विचार त्याच्या मनांत सदैव घोळत असल्यामुळें त्यास आपल्या करणीचा पश्चात्ताप झाला व नवमालिका आपल्याच मूर्खपणानें नाहींशी झाली ह्मणून त्यास तिची फार चटपट लागून गेली. त्यास कांहीं सुचेनासें झालें इतकेंच नाहीं तर तिची अनुपम मूर्ति त्याच्या नजरे समूर जेव्हां जेव्हां उभी राही तेव्हां तेव्हां तो वेड्याप्रमाणें बरळूं लागे. शेवटीं क्लेश सहन न होऊन त्यानें आपल्या पदरच्या कांहीं निवडक हुशार स्वारांस बोलावून आणून हुकूम केला कीं जो कोणी ह्या त्रिवर्ग पळपुट्यांस धरून आणील त्यास उत्तम बक्षीस देऊन शिवाय मोठ्या हुद्याची जागा दिली जाईल. ह्याप्रमाणें समज देऊन त्यानें आपल्या स्वारांस त्यांच्या शोधार्थ रवाना केलें. हें वर्तमान उग्रसेनाचे मंत्री मंडळास समजलें तेव्हां ते त्याचें शांतवन करण्यास आले. त्यांस पहातांच उग्रसेन रागानें दांत ओंठ चावून ह्मणाला, प्रधानजी, पाहिलाना गुलामा विजयाचा कावा ? कसा ह्यानें माझा घात केला. ? बरें आतां त्रिवर्ग माझ्या हातीं सांपडले पाहिजेत, ह्मणजे न्यायइनसाफ कांहीं न करितां त्यांस लागलेच दे-

हांत प्रायःश्चित्त देईन. ही त्याची स्थिती प्रधानादि मंडळींनें पाहून त्यास कांहीं सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या व ह्मणाले कीं सरकार आपण काळजी करूं नका. पाठविलेले स्वार हुशार असून ते खचित त्यांस धरून आणितील, आपण स्वस्थ असा. इतकें जरी झालें तरी त्याची चळवळ राहीना. त्यानें जोतिष्यांस बलावून आणून नवमालिकेची पुनः प्राप्ती होईल काय ह्मणून प्रश्न केला तेव्हां त्या कार्य साधु जोतिष्यांनीं पंचांगें व पुस्तकें उघडून कांहीं अंक मांडून उग्रसेनास सांगितलें कीं सरकार अल्पकालांतच आपणास तिची प्राप्ती होईल. त्यांच्या सांगण्या वरून कांहींसा विश्वास पटल्यामुळें तो स्वस्त बसला.

आतां नवमालिका व विजय हीं काय करितात तें पाहिलें पाहिजे. रत्नसार येथून निघाल्या पासून तीं उभयतां जरी अति त्वरेनें मार्ग क्रमूं लागलीं, तरी गाजीपुरास जाण्यास त्यांस पूर्ण दहा दिवस लागले. सायंकाळीं गोपिनाथराव यांची स्वारी दरबारांतून आपल्या वाड्यांत येतांच सेवकानें त्यास खबर पोहोंचविली कीं कोणी विजय नांवाचा जासूद बरोबर एक सुरूप स्त्री घेऊन मीनकेतनाकडून आलों असें ह्मणत असून आपल्या दर्शनाची इच्छा प्रदर्शित करीत आहे. महाराजांची आज्ञा असेल तर त्यास आंत येऊं देतों.

मीनकेतनाचें नांव कानीं पडतांच जसा एखादा मनुष्य गाढ निद्रेत असतां स्वप्नांत कांहीं प्रिय वस्तु पाहिल्यानें हर्षित होऊन खडबडून अकस्मात जागृत होतो तसा होऊन विजयास ह्मणाला, माझ्या मीनकेतनाकडून तूं आलास काय ? तो कोठें आहे तें अगोदर मला कळीव. तें ऐकून विजय ह्मणाला, महाराज मीनकेतन सरकार

तके दिवस रत्नसार येथील राजा दुष्ट उग्रसेन ह्याचे
दींत भार्येसह होते, मी त्यांचा दीन सेवक आहें. स-
कारची ती वार्ता माझ्या कानांवर आल्यावर मी तेथें
ाऊन युक्ति प्रयुक्तीनें त्या उभयतांची सुटका होण्याचा
यत्न केला; त्यांत परमेश्वर कृपेनें व आपल्या सर्वांच्या
आशिर्वादानें यश आलें. मी आपल्या बरोबर आणिलेली स्त्री
ीनकेतन सरकारांची प्रिय भार्या आहे. ह्यांचें नांव
नवमालिका असें आहे. सरकाराहि मुक्त झाले असून
ागाहून येत आहेत. उद्यां सायंकाळ पर्यंत तरी एथें
ेऊन दाखल होतील. एका काळजींतून परमेश्वरानें मला
ार पार पाडिलें. असेच उद्यां सरकारहि एथें आले
कीं मग मी आपणास धन्य मानीन. ह्या प्रमाणें विजय
ुखें मीनकेतनाचें वर्तमान कळल्यानंतर, मीनकत-
ास जीं दुःखें सोसावीं लागलीं त्याविषयीं व उग्रसेनाच्या
कारागृहांत राहिल्या वेळीं जी विपत्ती भोगावी लागली
्या बद्दल त्यास पराकाष्ठेचें वाईट वाटलें व नवमालिकेस
ंबोधून तो ह्मणाला, वहिनी, आपणा उभयतांस जीं दुःखें
भोगावीं लागलीं त्या विषयीं मला फार खंती वाटते..
असो, झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. त्या दुष्ट उग्रसेनास
ुह्मांस दिल्या दुःखाबद्दल चांगलें शासन करून तुमच्या
ड़ोळ्यांचें पारणें फेडीन. तुह्मी आतां स्वस्थ असा, अ-
से ह्मणून दासीस आपली भार्या वसुमती हीस बोलाविण्यास
सांगितलें. वसुमती आली असें पाहून गोपिनाथ ह्मणाला
प्रिये, माझा परम स्नेही मीनकेतन, ज्या विषयीं तुला मी
वारंवार सांगत होतों त्याची भार्या माझी वहिनी ही नव-
मालिका आहे; समजलेंना ? हिचे ठायीं मजपेक्षांहि अ-

धिक प्रीति त्वां करावी. • अनेक संकटें भोगिल्यामुळें ही फार कृश झाली आहे, त्यास औषधोपचाराची उद्यांचे उद्यांच तजवीज करितों. बाकीची सर्व व्यवस्था ठेवणें तुजकडेस आहे. हें पतीचें भाषण ऐकतांच अत्यानंद पावून नवमालिकेसह ती अंतःपुरांत जाती झाली.

आतां मीनकेतन व सकरूण ह्यांविषयीं विचार केला पाहिजे. रत्नसार येथून रात्रीं निघून प्रातःकालपर्यंत दहा बारा कोश मजल काढून दुसरे दिवशीं रात्रीं एका खेड्यावर वस्तीस राहिले. भोजना नंतर ते उभयतां रस्त्याविषयीं कांहीं गोष्टी बोलत बसले आहेत इतक्यांत घोडे स्वारांची दवड तेथें येऊन पोहोंचली. तो गलबला ऐकून मीनकेतनाचे पोटांत धस्स झालें, व त्यानें सकरूणास, हें काय तें पहाण्यास सांगितलें. सकरूण बाहेर पडून गांवकामगाराकडे तपासास गेला इतक्यांत मीनकेतनास चतुर्भुज करून स्वार चालते झाले. सकरूण पूर्वस्थलीं येऊन पहातो तों मीनकेतन जागेवर नसून घोडा मात्र जवळ बांधिलेला आहे. हें पाहून सकरूण वेड्या सारखें करूं लागला. तेव्हां गांवकरी लोकांनीं मीनकेतनास धरून नेल्याचें वर्तमान त्यास कळवून सांगितलें कीं, बाबा, आतां शोक करून उपयोग काय ? झाल्या गोष्टीस इलाज नाहीं, आतां तूं आपला मार्ग सुधार ह्मणजे झालें. निरूपाय झाल्यामुळें सकरूणास ती गोष्ट सयुक्तिक दिसली व त्यानें लागलाच्च गाजीपूरचा रस्ता धरिला. रत्नसार येथून मीनकेतन ज्या घोड्यावर बसून निघाला होता तो इतका वेगवान होता कीं दोनतीन दिवसांत तो गाजीपुरास येऊन दाखल झाला, व तेच दिवशीं त्यानें विजयाची भेट घेऊन मीनकेतनास

रत्नसार येथील स्वारांनीं पुनः छळून नेल्याविषयींची हकिकत कळविली. ती ऐकून विजय फार दुःखित झाला, तथापि आतां अवधी लाविली असतां तो दुष्ट खरोखर मीनकेतनाचा घात करील अशी शंका त्यास आल्यावरून, त्यानें सर्व वर्तमान गोपिनाथास विदित केलें. मग काय विचारावें? ह्या उग्रसेनाच्या दुष्ट कृत्याचा सूड कधीं घेईन असें त्यास झालें, त्याचें सर्व देहभान नाहींसें झालें, सर्व शरीर वीरश्रीनें कांपूं लागलें, व नेत्र आरक्त दिसूं लागले. त्यानें समशेरसिंग नांवाच्या आपल्या सेनापतीस बोलावून आणून सांगितलें कीं मध्यरात्र उलटल्यावर येथून रत्नसार नगरीवर स्वारी करण्याकरितां मला जाण्याचें आहे ह्मणून मोठे झुंझार निवडक पंचवीस हजार स्वारांसह तुह्मीं मजबरोबर चलावें. प्रातःकालीं जरूर तितके लोक राज्य रक्षणा करितां ठेवून तोफखान्यासह पायदळ आपल्या मागोमाग पाठवून देण्याविषयीं सक्तीचा हुकूम प्रधानजीस देण्यांत येईल. ह्यांत कोणाकडून कसूर झाल्यास तो तत्क्षणींच तोफेच्या तोंडीं उडविला जाईल ह्मणून करडा हुकूम दिला. चला, समसेरसिंग उठा सैनिकांचीं चिलखतें वगैरेचा बंदोबस्त नीट राखा, असें सांगून तो आपल्या आयुधागारांत गेला व उत्तम शस्त्रें काढून तीं चांगलीं साफ करवून मध्य रात्रीची वाट पहात बसला. संकेताप्रमाणें सर्व सिद्धता असून सैनिकसह मी नगराबाहेर सरकार स्वारीची मार्गप्रतिक्षा करीत आहे ह्मणून दूतमुखें निरोप दाखल होतांच गोपिनाथ वसुमतीची भेट घेण्याकरितां तिच्या मंदिरीं गेला तों नवमालिका पलंगावर पडली असून वसुमती मोठ्या मर्यादेनें तिच्या

बाजूस उभी राहून समाधानाच्या गोष्टी बोलत आहे असें त्यानें पाहिलें, तेव्हां त्यास मोठा आनंद झाला. गोपिनाथ येतांच दोघीहि उठून उभ्या राहिल्या तें पाहून तो ह्मणाला, वहिनी, मीनकेतनराव इकडे येत असतां पुन: उग्रसेनाच्या हातीं सांपडल्यामुळें बंदींत आहेत तेव्हां त्यांच्या मुक्ततेकरितां हा मी रत्नसार नगरीवर स्वारी करण्यास निघालों आहें. तुमची मला आज्ञा असावी. मीनकेतन पुन: उग्रसेनाच्या हातीं लागल्याविषयीं वातमी नवमालिकेस कळतांच ती फार खिन्न झाली, तथापि गोपिनाथ स्वत: त्याच्या सुटकेकरितां निघाला आहे तेव्हां अशासमयीं. अश्रु गाळणें वाजवी नाहीं. असा विचार करून ती ह्मणाली, तात्या, तुमच्या प्रयत्नास परमेश्वर साह्य करो. तुह्मी आपल्या जिवास जपा व माझ्या प्रियाची भेट लवकर करवा आतां या; वसुमतीनेंहि नेत्र कटाक्षांनीं त्यास आपला रुकार कळविला. नंतर गोपिनाथ नवमालिकेस नमस्कार करून निघाला व नगराबाहेर येऊन सैन्यांत मिसळल्या नंतर सैन्यानें चाल केली. ही स्वारी इतक्या त्वरेनें निघाली कीं पूर्ण दोन दिवसांत पहाटेच्या सुमारास सैन्य रत्नसार नगरीच्या तटाखालीं येऊन थडकलें. गोपिनाथाच्या बरोबर विजय व सकरुण हे होतेच. सकरुणास मीनकेतनाविषयीं भेद काढण्याकरितां गोपिनाथानें पाठविलें तो पूर्ववत् वैराग्याचा वेश धारण करून नगरांत शिरला. तपास केल्यावर त्यास कळलें कीं दुसरे दिवशीं सूर्योदयाचे समारास उग्रसेनानें मीनकेतनास सुळीं देण्याचा हुकूम फर्माविला असून सर्व नगरांत दवंडीही पिटविली आहे. प्रात:काल होत आला होता तों ही

बातमी घेऊन सकरूण परत आला. गोपिनाथाची कडेकोट तयारी होतीच. उजाडतांच तुरुंगाचे अंमलदार मीनकेतनाकडेस आले व त्यास गाडींत घालून नगराबाहेर घेऊन गेले. तेथें एका मोठ्या मैदानांत लोखंडाचा सूळ करविला होता त्यापाशीं त्यास त्यानीं नेऊन उभें केलें. इतक्यांत उग्रसेनहि तेथें आला व सर्व लोकांसमक्ष आपल्या प्रधानास मीनकेतनावर आलेला आरोप वाचून दाखविण्याची आज्ञा केली. मीनकेतन, आतां आपला मृत्यु बिनतोड रितीनें आला असें पाहून इष्ट देवतेचें स्मरण करीत होता, इतक्यांत गोपिनाथाच्या स्वारांनीं अकस्मात हल्ला करून उग्रसेनाच्या शिबंदी लोकांची कत्तल उडवून उग्रसेन व इतर मंडळी ह्यांस कैद केलें, व जो सूळ मीनकेतनाकरितां तयार करविला होता त्यावर उग्रसेनास सुळीं दिलें. मीनकेतनास सैनिकांकरितां तयार केलेल्या एका तंबूत ठेवून विजय सकरूण वगैरे जे लोक त्याच्या परिचयाचे होते त्यांस, आपण हेमनगरींतून परत आल्याशिवाय, मीनकेतनाजवळ जाऊं देऊं नये असा बंदोबस्त करून आपण हेमनगरीकडे वळला. ह्या घाईंत गोपिनाथास मीनकेतनानें ओळखिलें नव्हतें. हा भयंकर वार्ता उग्रसेनाचे सैनिकांस कळतांच जो तो आपापला प्राण वांचवून स्वस्थ राहिला. गोपिनाथानें तेथील किल्ला सरकरून मीनकेतनाच्या नांवाची द्वाही तेथें फिरवून हेमनगरीवर चाल करून गेला. उग्रसेनानें कामप्रियनामा आपला स्नेही तेथील राज्यकारभार पहाण्याकरितां पाठविला होता; त्यानें आपली ठाकुरकी राखण्याविषयीं पुष्कळ यत्न केला परंतु तो सर्व निष्फळ होऊन तो रणांगणीं पतन पावला. नंतर लागलेंच तें शहर हस्तगत करून घेऊन

तेथेंहि मीनकेतनाच्या नांवाची द्वाही फिरविली. मीनकेतना
नांव हेमनगरींतील रहिवासी लोकांनीं ऐकतांच ते आनंदो
करूं लागले. नंतर तेथील प्रधानादि मंडळी बरोबर घेऊ
गोपिनाथ रत्नसारपुरींत आला. तेथें शहरचे मध्य भाग
एक मोठा मंडप तयार करवून त्यांत मीनकेतनाकरि
एक सिंहासन बनविलें, तसेंच राजवस्त्रेंहि आणविलीं होतीं
परिधान करण्याविषयीं सेवकांनीं मीनकेतनास सांगितल
वरून तो विस्मित झाला व मनांत ह्मणाला, हें सर्व गू
काय आहे तें कळत नाहीं. वस्त्रें कशाचीं, उग्रसेन मला सू
देणार इतक्यांत गर्दी कशाची झाली व ती कोणी के
मला ह्या तंत्रूंत कोणी कशा करितां आणून ठेविलें ह्या
कांहींच अनुमान करितां येत नाहीं. असो दैवांत आण
काय काय सोहळे भोगावयाचे आहेत ते कोण जाणे? अ
ह्मणून दिलेलीं वस्त्रें परिधान केलीं. इकडे प्रधान वगैरे
डळी आपापल्या माना प्रमाणें आसनस्थ झाल्या नंतर ग
पिनाथ पुढें हात जोडून उभा राहिला व मोठ्या नम्रतेनें
णाला, मीनकेतनराव, मला आपण ओळखिलें काय?
आपला स्नेही गोपिनाथ आहे. हा प्रकार पाहून का
वेळ आपण स्वप्नांतच खास आहों असा त्याला भास झा
तथापि एकवार गोपिनाथाकडे व हेमनगरींतील प्रधाना
मंडळी कडे पाहून त्याचें संशय पटल नाहींसें झालें व
तीचा खरा कळवळा त्याच्या मनांत उत्पन्न होऊन त्यानें
पिनाथास कडकडून प्रेमालिंगन दिलें. नंतर तेच दिव
हेमनगरी व रत्नसार ह्या दोन्ही राज्यांचा मालक त्यास ठर
राज्याभिषेक केला. हेमनगरी येथील प्रधान प्रौढवया
अनुभविक राजव्यवस्थेंत निष्णात असल्यामुळें त्याचे हवा

सर्व कारभार करून उभयतां मित्र गाजीपुरास आले. मार्गांत नवमालिका आपल्याकडे सुखरूप असल्याचें वर्तमान गोपिनाथानें मीनेकतनास कळविलें. गाजीपूर येथें आल्यावर नवमालिका व मिनकेतम ह्यांची परस्पर भेट होतांच दुधांत साकर पडल्या प्रमाणेंझालें. नंतर ह्या दोघां मित्रांनीं कांहीं दिवस रमणीय गाजीपुरांत काढिल्यावर मीनेकतनास आपल्या प्रिय मातापितरांचें व आपली जन्म भूमिका जे रामपूर त्याचें स्मरण झालें व त्यांचें दर्शन घेण्याची विलक्षण जिज्ञासा उत्पन्न होऊन दोघेहि आपल्या भार्यांसह रामपुरास गेले. वृद्ध बिचारा रविकांत मीनकेतनाविषयीं निराश झाल्यामुळें मोठ्या कष्टानें भार्येसह आपल्या आयुष्याचे दिवस मोजीत होता. मीनकेतन व गोपिनाथ अशा लौक्रिकास चढून आपणास भेटायास आले हें पाहून त्या मातापितरांस जो आनंद झाला त्याचें अनुमान करण्याचें काम ग्रंथ विस्तारामुळें मी आपल्या वाचकांवर सोंपवितों. नगरांतंहि जेकडे तिकडे आनंदोत्सव सुरू झाला. अशा रितीनें कांहीं दिवस रामपुरास राहून रविकांतासह मीनकेतन हेमनगरी येथें जाता झाला. गोपिनाथानेंहि रविकांताची आज्ञा घेऊन गाजीपुराची वाट धरिली व पुढें उभयतां मित्रांनीं आपलीं कामें दक्षतेनें चालवून विमल व विशाल अशी कीर्ति मिळवून आपल्या प्रजेस सुखप्रद होते झाले.

समाप्त.

# वाचकांस प्रार्थना.

श्लोक. (शा० वि० वृ०)

कष्टातें करुनी जिहीं अनुपमा विद्यास्वयें साधिली ॥
जे ह्या आर्य भुमीस वाटत मला रत्नें जणूं लाधलीं ॥
ज्यांची ह्या अवनीवरी सुविमला कीर्ती असे गाजली ॥
त्या विद्वज्जन रंजनार्थचि असे ही मत्कृती अर्पिली ॥ १ ॥

श्लोक. (पृ० वृ०)

जरी असति दोष ते तरि तुम्ही न आणा मना ॥
क्षमा मज करा अशी करितसें तुम्हां प्रार्थना ॥
रसज्ञ मनरंजना क्षम गमो अशी कामना ॥
वसे मनिं, करी सदां सुफळ ती जगज्जीवना ॥ २ ॥

आर्या.

ज्या माझ्या स्नेह्यांनीं । केलें मज साह्य थोर ह्या कामीं ॥
उपकार कीं तयांचे । झाले ऐसेंचि मानितों हा मी ॥ ३ ॥

श्लोक. (शा० वि० वृ०)

माझा जन्म प्रसिद्ध चौबल कुळीं कल्याण ग्रामीं वसे ॥
जें ठावें बहुतां जनांस मजला वाटे सदा गोडसें ॥
ताताचें अभिधान केशव असे मन्नाम नारायण ॥
ग्रंथा ह्या करुनी तुम्हा बुधजना मी कीं करी अर्पण ॥ ४ ॥

---